MARATHI HISTORY AND HISTORICAL RESEARCH

POTDAR

मराठी इतिहास व इतिहाससंशोधन

(विहंगम-निरीक्षण)

प्रो. दत्तो वामन पोतदार, बी.ए.

प्रकाशक,
विष्णु पांडुरंग नेने, बी. ए.,
६५ बुधवार, पुणें २

किंमत १२ आणे

मुद्रक,
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखान
९४७ सदाशिव पेठ, पुणें शहर.

अगोदरचे दोन शब्द

'मराठी इतिहास आणि इतिहाससंशोधन' या विषयावरील धावता आढावा या छोट्या पुस्तकांत घेतला आहे. हें काम मजकडून करून घेण्याचें सर्व श्रेय माझे मित्र बडोद्याचे श्री. वि. पां. नेने व येथील श्री. चिं. ग. कर्वे यांना आहे.

असा एखादा आढावा पुष्कळ दिवसांपासून लिहावा असें मनांत होतें. अधिक स्वस्थता लाभली असती तर याहून व्यवस्थित स्वरूपांत तो पुढें मांडतां आला असता. आहे या स्थितींतहि तो उपयुक्त वाटेल असें वाटतें.

या आढाव्याला जोडून एक संपूर्ण सटीक यादी द्यावयाचा विचार मनांत होता. परंतु ती यादी बरीच मोठी होऊं लागल्यामुळें तो विचार यावेळीं तरी रहित करावा लागला आहे.

चरित्रविभागाचें ऐतिहासिक वाङ्मयांत अतोनात महत्त्व आहे. परंतु या आढाव्यांत चरित्रांचा विचार केलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. कांहीं उल्लेख आले आहेत, परंतु ते ओझरतेच आहेत. याचें कारण प्रस्तुतचा आढावा 'अर्वाचीन मराठी साहित्य' या ग्रंथासाठीं लिहिला. या ग्रंथांत चरित्र-वाङ्मयावर निराळाच आढावा यावयाचा होता. त्यामुळें या लेखांतून तो भाग वगळून ठेवला. प्रो. श्री. ना. बनहट्टी यांनीं चरित्रलेखनाचा आढावा 'अर्वाचीन-मराठी साहित्यां'त घेतला आहे. त्यांच्यापुढें अर्थातच केवळ ऐतिहासिक चरित्रेंच नव्हतीं. शिवाय त्यांनीं इ. स. १८७५ चे पूर्वीचा भाग आढाव्याच्या संकल्पित कालमर्यादेंत येत नसल्यामुळें विचारांत घेतला नाहीं. बाकी ऐतिहासिक चरित्रें १८७५ पूर्वी क्वचितच होऊं लागलीं होतीं. त्यांचा आढावा प्रस्तुतच्या आमच्या आढाव्यांतील पद्धतीपेक्षां निराळ्या पद्धतीनें घेतलेला आहे. तथापि आतां या ग्रंथांत चरित्रपर नवा मजकूर जोडण्याचा विचार जुळला नाही. पुनः आढावा घेण्याची संधि लाभल्यास ती उणीव भरून काढूं.

या ग्रंथांतील संकल्पित प्रकरणें लिहून संपविल्यावर ग्रंथांत नमूद करण्याजोग्या आणखी बऱ्याच बाबी लक्ष्यांत आल्या. तेव्हा 'राहिलेंसाहिलें' हें कलम अखेरीं-अखेरीस, छपाईसाठीं मजकुराची जुळणी झाल्यावर, जोडलें! आणखी कांहीं स्मरणांत

आलें तेव्हां पुरवणी जोडली ! तरीहि वस्तुग्रंथसंग्रहांत औंधचे सुविद्य व इतिहास-भक्त रसिक अधिपति श्री. बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधि यांच्या बहुमोल संग्रहाचा उल्लेख राहून गेला, हें नजरेस आलें ! राजवाडे यांजपासून घेतलेलीं १,७०० हस्त-लिखितें, तसेंच शेंकडों जुनीं चित्रें, व विशेषत: प्राचीन चित्रादिकांसंबंधांचे दुर्मिळ ग्रंथ यांचें हा संग्रह म्हणजे एक भांडारच आहे. हा संग्रह विद्वान् व अभ्यासू जन यांच्या उपयोगास श्रीमंतांकडून उदारपणें उपलब्ध असतो. हा निरंतर पिढ्यानु-पिढ्या असाच जनोपयोगार्थ निश्चयेंकरून उपलब्ध होईल, अशी पक्की व्यवस्था श्रीमंतांकडून होईल अशी आम्हांस दृढ आशा आहे.

इतर संस्थानांमध्येंहि कमीअधिक महत्त्वाचे व कमी अधिक आस्थेनें जतन करून ठेवलेले संग्रह आढळतात. त्यांत अक्कलकोटचा शस्त्रसंग्रह, पाहिलेले लोक फार वाखाणतात. आणि निदान दक्षिणेंत तरी त्यास तोड नाहीं असें म्हणतात. ग्वालेर, सावंतवाडी, बडोदें वगैरे संस्थानांत वस्तुसंग्रहालयें आहेत. कोल्हापुरास नवीनच ' आयर्विन ' संग्रहालय स्थापन झालें आहे. मुंबईसहि पुष्कळ संग्रह खाजगी व सार्व-जनिक आहेत. प्रिन्स् ऑफ् वेल्स म्युझियममध्यें माबजींच्या संग्रहांतील अनेक वस्तु आहेत. छत्रपतींचें म्हटलेलें सिंहासनहि त्यांत आहे.

कै. शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी यांचा खाजगी संग्रह केवळ अपूर्व होता. शेट मावजी मराठ्यांच्या इतिहासाचे–विशेषतः शिवाजी महाराजांचे–निःस्सीम भक्त होते. या भक्तिपायीं हजारो रुपये त्यांनीं खर्चिले. एक मोठे राष्ट्रीय संग्रहालय काढ-ण्याची त्यांची फार मनीषा होती. आतां त्यांचे ते मोठाले मनोरथ त्यांचे बरोबरच गेले ! आणि असें म्हणण्याची पाळी आली आहे कीं, होता संग्रह तोच जर जतन करून ठेविला तरी पुरे !

रे. फादर हेरस या ख्रिस्ती पंडितानें मुंबईच्या सेंट झेविअर कॉलेजांत एक ऐतिहासिक शोधसंस्था चांगलीच नांवारूपास आणली आहे. तिचा वस्तुग्रंथसंग्रहहि फार वाखाणण्याजोगा आहे. मुंबईत नवीन ऐतिहासिक चैतन्य हेरस यांनी उत्पन्न केलें आहे. शिष्यहि पुष्कळ तयार केले आहेत.

प्रो. थूथी वगैरेंचे पात्रादिंचे संग्रह प्रेक्षणीय आहेत. पण पाटणा येथें बॅ. माणुक व रावबहादुर जालान् यांच्याकडे जे संग्रह पाहण्याचा योग आम्हांस आला तसे संग्रह पुण्यामुंबईकडे कोठें आढळले नाहींत ! फलटणास कागदपत्रांचा संग्रह मोठा आहे आणि जमखिंडीसहि नाणीं, शस्त्रें व पोथ्यांचा संग्रह चांगला आहे. आजच्या-

पेक्षां या संग्रहांची जोपासना या संस्थानांकडून निराळ्या रीतीनें व्हावयास पाहिजे.

दौलतीदप्तरांत मळेदप्तर महत्त्वाचें व मोठें आहे. त्यांचा शास्त्रीय पद्धतीनें सांभाळ करणें अगत्याचें आहे. थोडा सालिना खर्च वाढवून आणि तज्ज्ञ मंडळींचें साहाय्य घेऊन त्यांच्या सल्लामसलतीनें जर संस्थानें हा उद्योग करून घेतील तर सहज काम होऊन जाईल. दहावीस वर्षांत पुरी होईल अशी सोईची योजना आखून काम केलें तर लहान लहान संस्थानांना एकदम खर्चाचा बोजा वाटणार नाहीं. इकडे सर्व संस्थानिक व इतिहासप्रेमी मंडळी लक्ष पुरवतील अशी आशा आहे.

या ग्रंथांत परामर्ष घ्यावयास पाहिजे होता असा आणखी एक महत्त्वाचा विषय राहिला. तो म्हटला म्हणजे महाराष्ट्रांत झालेले **ऐतिहासिक वाद**. या वादांच्या कामीं केसरी, ज्ञानप्रकाश प्रभृति वर्तमानपत्रें आणि अनेक मासिकें, त्रैमासिकादि नियतकालिकें यांनीं पुष्कळ चालना दिलेली आहे. या पत्र-नियतकालिकांतून पुष्कळ उपयुक्त माहितीहि प्रसिद्ध झालेली आहे. परंतु वादाचें रंगण मात्र या पत्र-मासिकांचें साहाय्य नसतें तर कसें रंगलें असतें ?

अगदीं प्रथमपासून झालेल्या या सर्व वादांचा परामर्ष घेणें मनोरंजक व उद्बोधक होईल. परंतु ठळकठळक वाद, चर्चा व चर्चिक यांचा येथें निर्देश करण्यापलीकडे अधिक मजल या प्रास्ताविकांत गांठतां येणार नाहीं.

खरे व नातू यांचीं नाना महादजींवरील चरित्रें प्रसिद्ध झाल्यानें या दोन थोर पुरुषांच्या योग्यतेबाबत बरीच भवति न भवति 'केसरी' प्रभृति पत्रांतून भानूप्रभृति लेखकांनीं केली. तो वाद अद्यापिहि संपला नाहीं, आणि मधूनमधून तो आपलें डोकें काढीत राहील, असें दिसतें. तथापि या वादांमुळें पुष्कळ उलटसुलट माहिती, प्रमाणें व युक्तिवाद पुढें येऊन जनता विचक्षण व विवेचक बनते, अभ्यासहि वाढीस लागतो व ज्ञानांतहि भर पडते. तथापि अशा वादांत पुष्कळ बैठेच खेळाडू डाव टाकीत असतात, आणि पुष्कळदां व्यर्थ शब्दावडंबर माजवून वादाला वितंडाचें स्वरूप आणितात.

याच वेळीं अनेक लहानमोठ्या बाबींवर 'केसरीं'तून चर्चा करणारे एक इतिहासव्यासंगी श्री. श्री. वि. आठल्ये, बी. ए. यांचा सादर उल्लेख येथें केला पाहिजे. रा. आठल्ये यांनीं वाढता व्यासंग ठेवून ग्रंथरचना करावयास हवी होती.

दुसरा वाद ब्रह्मेंद्रस्वामींच्या योग्यतेबाबत. यांत रा. पारसनीस व राजवाडे हे धुरंधरयोद्धे दोन बाजूला होते. ग्रंथमालेंत राजवाडे यांस पारसनीस व अळेकर

यांनीं दिलेलीं उत्तरें व विजापूरकर यांनीं लिहिलेलें संपादकीय स्फुट अवश्य वाचण्यासारखें आहे.

बाजीराव व मद्यप्राशन याबद्दलहि असाच वाद चालू होता. यांत अनुमानानें ताणून केलेलें बोलणें नवीन पुराव्यानें लटकें पडलें आहे. आणि आतां हा प्रश्न किरकोळांत जमा होऊन वादातीत झाला आहे.

आनंदीबाई आणि 'ध'चा 'मा' हा वादहि मध्यें बराच रंगला होता. अजून पुन: वेळ पाहून धुमसेल!

वेदोक्तवाद हा एक फार मोठा वाद महाराष्ट्रांत गाजला! ऐतिहासिक बाजू हा त्याचा एक लहान भाग होऊन राहिला, आणि विद्यमान कालांतील भीषण सामाजिक विग्रहाचें स्वरूप त्याला आलें! तथापि ऐतिहासिक विभागांत हा प्रश्न वादग्रस्त राहील असें दिसत नाहीं. मधूनमधून कोणी 'केलादिविजय' पुढें करून किंवा एकाद्या पाद्रीबोवांच्या आड दडून कांहीं चिमटे काढण्याचा खुळा प्रयत्न करतील इतकेच!

केळकरांचें 'मराठे व इंग्रज' प्रसिद्ध झाल्यावर मराठशाहीच्या विनाशाच्या महत्त्वाच्या प्रश्नावर मोठें रण माजलें. परंतु हा वाद उच्च भूमिकेवरूनच झाला. कै. प्रो. लिमये, रा. भा. रा. भालेराव, प्रस्तुत लेखक, इत्यादिकांनीं याबर लहानमोठे लेख किंवा लेखमाला लिहिल्या आणि कांहींनीं छोटींछोटीं वाचनीय पुस्तकें प्रसिद्ध केलीं. प्रश्नच तसा महत्त्वाचा आहे. त्याचा पुष्कळच खल व अभ्यास करून व्हावयास पाहिजे आणि यावर एक—नव्हे अनेक दृष्टींनीं लिहिलेले मोठमोठे विवेचक ग्रंथ अधिकारीमंडळीकडून व्हावयास पाहिजेत.

राजवाडे यांनी गागाभट्टाचा कायस्थ-धर्मदीप सटीक प्रसिद्ध केला. त्याच्या निमित्तानें चांद्रसेनीय कायस्थ प्रभुमंडळाच्या भावना खवळून टाकण्यांत आल्या. ऐतिहासिक ज्ञानांत कांहीं भर या वादानें पडली नाहीं. पोकळ गर्जितें मात्र गरजलीं!

शिवाजी व रामदास हा एक जुना वाद आहे. आणि याचेहि वेदोक्त-वादाप्रमाणें परिणाम दूरवर पोचले आहेत. लोकांनीं केलेला गिल्ला सोडला तरी या वादांतील अलीकडील एक पक्षकार आमचे मित्र रा. नरहर रघुनाथ फाटक यांनीं आपली कुशाग्रबुद्धि, सूक्ष्म अध्ययन व वादकौशल्य यांचा चांगला प्रत्यय आणून दिला. त्यांच्या लिखाणांत प्रतिपक्षखंडणाचाच भाग विशेष आला आहे. परंतु रामदासाच्या योग्यतेवरील फाटकांचा उत्तरखंड प्रसिद्ध होईल तेव्हां उभय-

पक्षांतली मतभेदाची फुगवटी बरीच कमी झालेली दिसेल. देव-राजवाडे प्रभृतींचा एक व फाटक-बर्दे प्रभृतींचा दुसरा हे दोन पक्ष दोन टोकें मानलीं तर सत्य मध्यें, पण देवपक्षाच्या अधिक जवळ, बसलेलें आढळून येईल, असा आमचा तर्क आहे.

आतां अगदीं अलीकडे गाजलेला मोठा वाद म्हटला म्हणजे शिव-जन्मतिथीचा. याला छत्रपतीच्या त्रिशतसांवत्सरिक महोत्सवाच्या कल्पनेमुळें व्याव-हारिक दृष्ट्या आनुषंगिक महत्त्व फार मिळालें! आणि वादहि कसून झाला. व्यवहाराची गढूळ दृष्टि वादांत शिरली कीं, मग विजिगीषेचा पगडा वादीप्रति-वादींच्या मनांवर बसून डांवपेच चालूं लागतात! मनुष्यस्वभाव आहे, काय करणार? एवढा दोष सोडला तर एकंदर शिवचरित्रांतील अनेक बाबींची सूक्ष्म छाननी करण्याचें काम या ओढाताणींत चांगलें झालें! हत्यार घासलें म्हणजेच धार चांगली लागते! धार लावतांना ठिणग्या उडतात आणि भावनेचा पाला-पाचोळा जवळ असला तर क्षणभर होळीहि पेटते! तसें तज्ज्ञांच्या वादानें होतें. रा. द. वि. आपटे, रा. ज. स. करंदीकर, रा. स. म. दिवेकर, रा. शं. ना. जोशी, रा. वा. सी. बेंद्रे, रा. चिं. वि. वैद्य, रा. गौरीशंकर ओझा, रा. बि. स. वाकसकर, रा. दा. ना. आपटे, रा. गो. स. सरदेसाई प्रभृति अनेक विद्वानांनीं व चिकित्सकांनीं या वादांत भाग घेतला. वादाची खुमखुम मागें नसती तर आज जेवढा शिवचरित्राचा बारीक अभ्यास होत आहे, तो कदाचित् तितक्या तत्परतेनें झाला नसता. बाह्य भाषांतून नवे नवे पुरावे धुंडण्याची व पाहण्याची आवश्यकता ज्यास्त वाटून तसे शोध अधिक होऊं लागले. मागील सर्व वादांपेक्षां विद्वत्तेच्या व सूक्ष्मतेच्या दृष्टीनें हा वाद वरचढ व फलदायी ठरला.

याशिवाय प्राचीनवाङ्मयसंशोधनाच्या क्षेत्रांतहि पुष्कळ वाद रंगून गेले! तुकोबांच्या प्रयाणाची मिति, ज्ञानेश्वरीची संहिता व ज्ञानेश्वर एक का दोन (भिंगारकर–भारदे), दासबोधाचा काळ व कर्ता, वामन पंडित एक का अनेक, असे कित्येक विषय वादासाठीं पुढें येऊन गेले. हल्लीं सर्वांत मोठें कुतूहल महानु-भावी वाङ्मयाच्या शोधावरून निघणाऱ्या अनेक प्रश्नांबाबत उत्पन्न झालें आहे. त्यांत कालनिश्चितीच्या प्रश्नांना विशेष महत्त्व आहे. आणि तसें असणेंच योग्य आहे. निरंजन माधव व रघुनाथ पंडित यांचे वादहि पुढें आले आहेत. वामन पंडिताबाबतहि वाद लवकरच रंगेल, अशीं चिन्हें दिसत आहेत. कवींच्या जुन्यांत जुन्या व खऱ्यांत खऱ्या संहिता मिळविण्याविषयीं प्रयत्न वाढत आहेत. हें सर्व

खरें असलें तरी या शाखेंत आजच्यापेक्षां अधिक जोराची हालचाल व्हावयास पाहिजे आहे.

रा. य. न. केळकर यांचा वसई संग्रामाचा एक इतिहास छापत आहे. त्यांत भोये संस्थानचे रा. नाईक यांच्या ग्रंथाचा व पूर्वी कै. रावबहादुर. पु. बा. जोशी या विद्वान् व शोधक गृहस्थांनीं लिहिलेल्या व प्रसिद्ध केलेल्या माहितीचा विचार–निदान वसई पुरता तरी–होईल व इतरहि सर्व उपलब्ध साधनांचा परामर्ष त्या ग्रंथांत व्हावयाचा आहे. आणखीहि कांहीं ग्रंथ तयार होत आहेत; संकल्पितहि कांहीं आहेत; परंतु केळकर यांचा ग्रंथ बराच छापून झाला आहे म्हणून त्याचा येथें उल्लेख केला आहे.

असो; हा आढावा घेतांना सत्य व न्यायबुद्धि हीं जागरूक ठेवून आम्हीं आमचें काम केलें आहे. कोणाला मुद्दाम वगळलें नाहीं. इतकेंहि करून कोठें कांहीं उणें राहिलें असेल तर त्याबद्दल सर्वांनीं उदारपणें क्षमा केली पाहिजे.

वर अनुल्लेखाबद्दल क्षमा मागितलीच आहे. परंतु मताभिव्यक्तिप्रसंगामुळें स्वबुद्ध्यनुसार जें कांहीं लिहिलें त्यानें कोणास दुःख झालें, तर कर्तव्यप्रसंगानेंच तसें घडलें एवढें त्यांनीं मनांत वागवावें व लेखकाच्या सद्धेतूविषयीं व प्रामाणिकते-विषयीं कसलीहि शंका मनांत ठेवू नये, एवढी प्रार्थना आहे.

भाद्रपद वद्य १० शके १८५७
पुणें, २९।९।१९३५

दत्तो वामन पोतदार

मराठी इतिहास व इतिहाससंशोधन

(विहंगमनिरीक्षण)

एका दृष्टीनें प्रस्तुत विषयाला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रांत गेल्या शतकांत झालेल्या विशेष कामगिरीविषयीं विचार केला तर असें म्हणावें लागेल कीं, महाराष्ट्रांत इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांतच कांहीं टिकाऊ स्वरूपाचें व इतरत्र न झालेलें असें काम झालें व होत आहे. ही जी अभिमानास्पद, अखंड आणि महनीय अशी कार्यपरंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली तिचा धांवता आढावा या लेखांत घेण्याचें योजिलें आहे.

ज्याला इतिहाससंशोधन असें आपण मराठींत म्हणत असतों तो ज्ञानाचा आणि शोधाचा प्रकार स्थूल रूपानें जरी फार प्राचीन आहे असें म्हणतां येईल तरी त्याचें हल्लींच्या युगांतील जें विकसित स्वरूप दृष्टीस पडत आहे त्या स्वरूपांत त्याचा अवतार पाश्चात्य लोकांच्या संशोधनानेंच हिंदुस्थानांत झाला असें म्हणावयास चिंता नाहीं. एखादा कल्हण किंवा एखादा इब्न-खालदून् याच्याकडे बोट दाखवून या विधानांतील सत्य बाधित करतां येण्यासारखें नाहीं. इतिहासाला पांचवा वेद मानण्याची प्रथा फार जुनी आहे. तथापि काळाच्या कोष्टकांत सर्व घटितें (Facts) पक्कीं बसवून मानव समाजाच्या कर्तृत्वाचें मंदिर यथार्थ रीत्या पाहणें हें जें इतिहासाचें मुख्य कार्य तें, कालक्रमाचें अनुसंधान जर सुटलें तर, साधूं शकत नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत कित्येक हजार वर्षांपासून आमच्यापेक्षां अधिक सत्यतेनें व निश्चितीनें हें मानवदर्शन तिकडील विद्वान् घेत आले आहेत आणि कालक्रमाचें अनुसंधान सुटल्यामुळें आमचे इकडील विद्वान् व्यर्थ चाचपडत राहून भलतीकडेच वाहवले आहेत. पाश्चात्य व प्राच्य यांच्यामध्यें असलेले इस्लामी विद्वान् पाश्चात्यांपेक्षां कमी परंतु प्राच्यांपेक्षां किंचित् अधिक प्रमाणांत इतिहासदृष्टी आहेत.

डफूचें युग

आपल्या मराठ्यांचा इतिहास घेतला तर त्याची रचना खुद्द मराठी राज्य भरभरांटीत असतांना केवळ व्यापाराच्या मिषानें आलेल्या कित्येक पाश्चात्यांनीं करून ठेवलेली आढळते. ग्रँट् डफ्ला मराठ्यांचा पहिला इतिहासकार समजतात, पण त्याच्याहि पूर्वी मराठ्यांचा इतिहास लिहिणारे, स्प्रेंगेल् (१७९१) हा जर्मन् आणि स्कॉट् वेअरिंग् (१८१०) हा इंग्रज, असे इतिहासकार होऊन गेलेले आहेत. अनुषंगानें ज्यांच्या ग्रंथांवरून आपणास मराठ्यांच्या इतिहासाविषयीं कांहीं माहिती मिळवितां येईल असे ग्रंथ तर, मराठी फौजा हिंदुस्थानभर दौडत असतांना, पाश्चात्य देशांतील मुद्रणालयांतून शेकडों बाहेर पडले होते. अनेक पाश्चात्य प्रवासी, व्यापारी व नोकर अशा लोकांनीं हें लिखाण लिहिलेलें आहे. घटितांचें वर्णन कालक्रमानुसार मानवी पद्धतीनें करण्याचे प्रयत्न पुष्कळांनीं या ग्रंथांतून केलेले आहेत. तशा तऱ्हेचे प्रयत्न आमच्याकडे मराठी राज्यांत झालेले नाहींत.

कैफियती, बखरी, करीने, कुळकटें, व महजरें यांतून घराण्यांच्या संबंधानें किंवा इतर घटितांसंबंधानें कालक्रमवार कांहीं टिपणें सांपडतात. पण याहिपेक्षां मोठें आणि संबद्ध असें विरचन बखरींतून आढळतें. बहुतेक मराठी बखरी पेशवाईच्या उत्तरार्धांत लिहिलेल्या ठरतात. शेवटचे सातारचे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांनीं इंग्रजांची पद्धत उचलून त्या नमुन्यावर पुष्कळ सुधारणा करण्याचें आरंभिलें होतें. खुर्ची-टेबल मांडून नियमितपणें कामकाज करण्याचा हव्यास त्यांनीं धरिला होता; नवीन नवीन नियम व शिरस्ते बांधून देण्याची सुरुवात केली होती; युद्धाचे नवीन व्यूह रचिले होते, व नकाशे तयार केले होते. यांतच माधवराव मुनशीसारख्या पुरुषाकडून आरायेश-ए-महफील् यासारख्या ग्रंथांचीं सभारंजनीप्रमाणें मराठींत भाषांतरें करण्याचा उपक्रम त्यांनीं केला होता. मल्हार रामराव चिटणीस हेहि बहुतकरून हें नवीन वारें लागल्यामुळेंच आपल्या बखरी लिहिण्यास प्रवृत्त झाले असावे. या चिटणीशी बखरी म्हणजे आपले प्रारंभींचे इतिहास म्हणून समजले जात असत. चिटणीसांच्या या बखरींत ऐतिहासिक शास्त्रीय ग्रंथामध्यें जे गुण असावे लागतात,

ते नाहींत. तथापि रसाळ कथा या दृष्टीनें कोणतीहि चिटणीशी बखर वाचावीशी वाटते. अर्थात् चिटणीस लिहीत होते त्या वेळीं रावबाजींचें नांव पेशवे या नात्यानें कसेंबसें चालत होतें व छत्रपतीहि आपलीं बिरुदें थोडीं तरी मिरविण्यास समर्थ होते; म्हणून हे सर्व बखरी लिहिण्याचे प्रयत्न इंग्रजी अमलाच्या पूर्वीच्या काळांत जमा धरावे लागतात.

इंग्रजी अमलाच्या सुरुवातीला मराठी इतिहासाला एक इंग्रज इतिहासकार लाभला, त्याचें नांव ग्रँट् डफ्. कैक वर्षेपर्यंत याचा History of the Mahrattas हा ग्रंथ केवळ इंग्रजच नव्हे तर हिंदुस्थानांतील नेटिव्ह सुद्धां प्रमाणभूत मानीत. यामुळें या ग्रंथाची मागणी पुरविण्यासाठीं याच्या कित्येक आवृत्त्या काढाव्या लागल्या आहेत. ग्रँट् डफ्च्या बरोबरीनें प्रिन्सेप्, टॉड् वगैरे इतिहासकर्ते उत्तर हिंदुस्थानांत आपआपल्या विषयांचा इतिहास लिहिण्याविषयीं खटपट करीत होते. ग्रँट् डफ्ला मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठीं निदान सातारचीं तरी साधनें सुलभ होतीं. शिवाय इतर ठिकाणचेहि कागदपत्र ग्रँट् डफ्च्या पाहण्यांत आले होते.

ग्रँट् डफ्नें आपल्याकडून मेहनत चांगली केली आणि जरी त्याचा इतिहास हल्लींच्या मानाला चालण्यासारखा नाहीं, तथापि पहिला प्रयत्न, आणि तोहि मराठ्यांच्या प्रतिपक्षांतील एका लष्करी माणसानें केलेला, म्हणून जर त्याकडे पाहिलें तर ग्रँट् डफ्चें कोणीहि कौतुकच करील. खुद्द महाराष्ट्रांत देखील बरींच वर्षे ग्रँट् डफ्चाच इतिहास प्रमाण मानण्यांत येत असे. ग्रँट् डफ्च्या इतिहासाचीं भाषांतरें व सारांश पुढें लवकरच मराठींत प्रसिद्ध झाले. कप्तान केपिन व बाबा साने यांनीं तयार केलेलीं हीं भाषांतरें शिळा छापावर छापलेलीं (१८२९) अद्याप जुन्या घराण्यांतून संग्रह करून ठेवलेलीं सांपडतात. इंग्रजीवरून भाषांतर केल्याकारणानें अशा पुस्तकांतून बांदल देशमुखाचे 'बंडाळ देशमुख' असे अपभ्रंश केलेले आढळतात. हे अष्टागरांतील भाषांतरकर्ते मावळ व देशभागांतील घराण्यांशीं, त्यांच्या नांवांशीं व इतिहासाशीं अपरिचित होते. डफ्, एल्फिन्स्टन् किंवा माल्कम् यांनीं आपले इतिहास-ग्रंथ इंग्रजीमध्यें लिहिले, परंतु आपल्याकडील विद्वानांनीं शाळांसाठीं त्यांचीं नुसतीं

भाषांतरें केलीं. यापलीकडे त्यांनीं फारसे श्रम केले नाहींत. प्राचीन इतिहासाचें किंचित् संशोधन बाळशास्त्री जांभेकर व भाऊ दाजी यांनीं केलें. परंतु शिवकाल किंवा पेशवाईकाल यांकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. पेशवे दप्तराची व्यवस्था प्रथम कमिशनरकडे व नंतर अमानतदारांच्या मार्फत चालत आली होती. परंतु त्या दप्तराचा इतिहासदृष्टीनें कांहीं विशेष उपयोग या वेळीं करून घेण्यांत आला नाहीं.

अशीं कांहीं वर्षे गेलीं. शिक्षणप्रसार वाढत राहिला. इंग्रजी शाळा निघाल्या. महाविद्यालयें निघालीं. विद्यापीठें स्थापण्याचा विचार सरकारनें कायम केला. मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधर मंडळींतील महादेव गोविंद रानडे व त्यांचे सहाध्यायी कीर्तनेबंधू यांनीं मात्र मराठ्यांच्या इतिहासाचें अध्ययन निराळ्याच रीतीनें केलें आणि नीळकंठराव कीर्तने यांनीं आपणांस पंख फुटतात न फुटतात तोंच, ग्रँट् डफ्चा ग्रंथ अपुरा व अधुरा आहे असें धीटपणें डेक्कन कॉलेजांत प्रतिपादन (१८६७) केलें. याचा परिणाम विद्वान् लोकांच्यावर बराच झाला. सामान्य लोक, जुने घरंदाज लोक व विद्वान् शास्त्री वगैरे लोक, यांचें इतिहासाकडे दुर्लक्ष्यच होतें. इंग्रजी शिकलेले सुशिक्षित लोक या ग्रंथाकडे थोडें जास्त लक्ष देत असावे. स्प्रेंगेल्, स्कॉट् वेअरिंग् व ग्रँट् डफ् या तिघांनीं ग्रंथांत आधार देण्याचा प्रशंसनीय प्रयत्न केला आहे. नीलकंठराव कीर्तन्यांच्या पूर्वी एक वर्ष (१८६६) भिडे यांचा शिळेवर छापलेला अष्टप्रधानांचा इतिहास तयार झाला. या लेखकास परंपरागत बरीच माहिती अवगत असावी असें दिसतें. कारण ते पंतसचिव यांच्या निसबतीस होते. विष्णुपंत भिडे यांनीं आपला हा ग्रंथ सातारच्या दप्तरांतील माहितीवरून लिहिला, असें स्पष्ट म्हटलें आहे. सातारा राज्य खालसा झालें त्या निमित्तानें रंगो बापूजी वगैरे मंडळी विलायतेस गेली होती व त्यांनीं सातारा राज्याच्या विशेषतः या शेवटच्या घालमेलीबद्दल कैफियतीदाखल थोडाफार मराठी मजकूर प्रसिद्ध केलेला आढळतो. याहि पूर्वी सरकारी 'हैंद शिक्षा मंडळी'च्या प्रसिद्धिपत्रकांत शिकंदरनामा, ऑर्मचा इतिहास, ऐने अकबरी वगैरे ग्रंथांचीं भाषांतरें करून घेण्याचा इरादा प्रकट केलेला होता. परंतु ती उमेद तेथेंच जिरली.

बखरीचें युग

काव्येतिहाससंग्रह

या सर्व लिहिण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, इंग्रजी अंमल सुरू होऊन पांच-पन्नास वर्षे लोटलीं तरी सुद्धा ग्रँट् डफ्च्यापुढें फारशी मजल गेली नाहीं. कीर्तने यांच्या टीकेपासून इतिहासविषयाच्या विचारास मराठींत नवी कलाटणी मिळाली; आणि दाजीसाहेब सरंजामे यांनीं लिहिलेला अलिजाबहादुर शिंदे यांचा इतिहास किंवा विष्णु गोविंद भिडे यांचा अष्टप्रधानांचा इतिहास असे दोनच ऐतिहासिक ग्रंथ उल्लेख करण्याजोगे असे या काळांत तयार झाले. लोकहितवादी यांना ऐतिहासिक गोष्टी जमा करण्याचा नाद प्रथमपासूनच होता. परंतु इतिहासक्षेत्रांत पहिली जोराची जागृति निबंधमालेंत विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं लिहिलेल्या 'इतिहास' या निबंधा-वरूनच झाली. त्यापूर्वी विविधज्ञान-विस्तारांत कांहीं ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध होत असे. भाईसाहेब गुप्ते यांनींहि 'कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें' प्रसिद्ध केलीं होतीं. चिपळूणकर यांना शाळिग्राम, साने आणि मोडक अशा मंडळींचें साहाय्य मिळून "काव्येतिहाससंग्रह" जन्मास आला (१८७८). इतिहास-संशोधनाचा खरा ठसठशीत आरंभ या 'काव्येतिहास-संग्रहा'नेंच झाला. साने यांनीं कसोशीनें संपादन केलेल्या मराठ्यांच्या बखरी या मासिकांत प्रसिद्ध होऊं लागल्या. यामुळें इतिहासाविषयीं पुष्कळ माहिती मिळून गोडीहि लागली. साने यांचें संपादन फार उच्च दर्जाचें झालें आहे. त्यांत चालढकल नाहीं. टीपा, शुद्धाशुद्ध इत्यादि सर्व गोष्टींविषयीं साने यांनीं फारच मेहनत घेतली आहे. त्यांत दोषच काढावयाचे झाले तर मुख्यतः इतिहास-संशोधनाची शास्त्रीय बाजू आणि इतर भाषांतील माहितीची भाषापरिचयाभावीं कोताई असे दोन दाखवितां येतील. पेशव्यांची बखर, भाऊसाहेबांची बखर, चिटणिसांची बखर वगैरे उत्कृष्ट बखरी 'काव्येतिहाससंग्रहां'तच प्रसिद्ध झाल्या. लोकांच्या मनांत निबंधमाले-पासून नवीन क्रांति होऊं लागली होती; आणि स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म यांविषयीचा अभिमान वाढूं लागला होता. आपलें तें सर्व वाईट, असें म्हणण्याचा

मागचा काळ जाऊन त्याच्या उलट प्रतिक्रिया सुरू झाली होती; आणि आपलें तें आपलें, या अभिमानाची वृत्ति फोफावूं लागली होती. अशा वेळीं आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचीं रसभरित वर्णनें ज्यांत केलीं आहेत अशा बखरी प्रसिद्ध होऊन वाचण्यांत आल्यामुळें लोकांच्या भावनांना अधिक जोर चढला व व्याख्यानांतून, कीर्तनांतून, पुराणांतून आणि कवनांतून या अभिमानाचें वारें सर्वत्र जोरानें खेळूं लागलें. नाटकांची प्रथा आपल्याकडे याच वेळीं जोरानें वाढीस लागत होती. तेथेंहि शिवाजी किंवा बाजीराव-मस्तानी अशा विषयावर नाटकें व लहानमोठ्या कादंबऱ्या रचण्यांत येऊं लागल्या. एवंच ग्रँट् डफनें इतिहास लिहिल्यानंतर चाळीस वर्षांत जेवढी जागृति झाली नव्हती तेवढी जागृति पौराणिक पद्धतीनें लिहिलेल्या या चटकदार बखरवाङ्मयाच्या प्रसिद्धीनें अवघ्या दहा पंधरा वर्षांत झाली आणि अद्यापहि त्या वाङ्मयाचा असा परिणाम होतच आहे.

काव्येतिहाससंग्रहामध्यें जरी पुष्कळसें बखर-वाङ्मयच प्रसिद्ध झालें आहे तरी बखरींचें युग संपून कागदपत्रांचें युग जें पुढें सुरू झालें त्याचा किंचित् आरंभ ‘ काव्येतिहाससंग्रहां ’तच झाला. बखरींच्या बरोबरच शोधकांकडून जुने कागदपत्र पुढें येऊं लागले. हळुहळू या पत्रांचें महत्त्व मनांत भरूं लागल्यानें काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनीं पत्रें, यादी वगैरे नांव देऊन पत्रव्यवहाराचा एक संकीर्ण खंड प्रसिद्ध केला. तेथून सुरुवात होऊन पुढें आज, पत्रव्यवहारांतहि तत्कालीन आणि पश्चात्कालीन असे भेद पडून, तत्कालीन अथवा समकालीन पत्रव्यवहाराचा शोध व प्रसिद्धी या कामांत आपण आतां नुकतेंच कोठें गुंतलों आहोंत !

काव्येतिहाससंग्रहाच्या प्रसिद्धीमुळें कित्येक हौशी व जिज्ञासु शोधक मंडळीस प्रोत्साहन मिळालें. या मंडळीपैकीं सुदैवानें रा. काशिनाथ कृष्ण लेले हे आजहि विद्यमान आहेत आणि धार दरबारच्या इतिहासलेखनाचें काम दरबारच्या प्रोत्साहनानें, ऐशीं वर्षें उलटून शरीर भुईला लागावयास लागलें तरी, करीत आहेत ही खरोखरच फार कौतुक वाटण्याजोगी गोष्ट आहे. पत्रें, यादी वगैरेंतील कित्येक अस्सल पत्रें रा. लेले यांनीं मिळवून पाठविलीं होतीं. रा. लेले यांच्या-

प्रमाणेंच कै. कृष्णाजी विष्णु आचार्य या सातारा जिल्ह्यांतील शिक्षकानें बरीच माहिती मिळवून प्रसिद्ध केली. तिसरे पैठणचे कै. भगवंतराव तोडेवाले. चौथे रा. वीरमाडकर, या व इतर अशा मंडळींचें काव्येतिहाससंग्रहाच्या किंबहुना एकंदर शोधकाच्या कार्यांत चांगलें साहाय्य होत असे. कै. शंकर तुकाराम शाळिग्राम हे पोवाडे जमविण्याचें काम करीत. परशुरामपंत तात्या गोडबोले व डुकले यांचा 'सर्वसंग्रह' (१८६०) किंवा त्यापूर्वीचा 'ज्ञानचंद्रोदय' (१८३८) यांतून जुन्या मराठी कवींच्या कवितेचें प्रसिद्धीकरण चालू असे. तो उपक्रम कमी अधिक प्रमाणांत चालूच राहिला. 'काव्येतिहाससंग्रह' बंद पडल्यावर मग कित्येक दिवस 'काव्यसंग्रह' या नांवानें जुनी मराठी कविता प्रसिद्ध होत राहिली.

सुमारें बारा वर्षे उत्कृष्ट कार्य करून 'काव्येतिहाससंग्रह' बंद पडला. तथापि त्यानें एकदां पेटविलेली ज्योत कांहीं विझली नाहीं. मिरजेचे वासुदेव-शास्त्री खरे यांच्या ठिकाणीं मूळचीच रसिकता व स्वाभिमान जागृत होता. पुणें सोडून मिरजेस जावें लागल्यावर एक सद्भाग्याचा योगच म्हटला पाहिजे कीं, त्यांचें लक्ष मळा-दप्तराकडे म्हणजे पटवर्धन दप्तराकडे गेलें. नाना फडणवीस यांच्या चरित्राकडे खरे शास्त्री यांचें लक्ष जाऊन त्यांनीं त्या विषयावर एक नवीन पुस्तक प्रसिद्ध केलें. नवीन म्हणण्याचें कारण यापूर्वी कॅप्टन् मॅग्डोनल्ड् यानें नानांचें एक सचित्र चरित्र प्रसिद्ध केलें होतें. त्याचा अनुवादहि मराठींत झाला होता (१८५२). शास्त्रीबोवांनीं नानांचें चरित्र लिहितांना मराठी कागदपत्रांचा उपयोग केला हें विशेष होय. नाना फडणवीसांचा विषय हा लोकांचा आवडता व भक्तिरसास पोषक असा विषय होता. चित्रशाळेनें आरंभीं त्यांचें चित्र प्रसिद्ध केलें हेंच त्याचें एक गमक.

मुंबई युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेली ग्रॅजुएट लोकांची जी पहिली चौकडी, त्यांपैकीं महादेव गोविंद रानडे व विठ्ठल नारायण पाठक यांना मराठी इतिहासाचा चांगला नाद होता. पैकीं रानडे हे मराठी इतिहासाचे द्रष्टे आचार्य या कोटींत पडण्याजोगे आहेत. रानडे यांच्या सहाध्यायांपैकीं कीर्तने बंधु यांनाहि मराठी

इतिहासाचा चांगला नाद होता. पैकीं नीलकंठराव कीर्तने, ज्यांनीं ग्रँट् डफ्च्या इतिहासावर पहिली मराठी टीका प्रसिद्ध केली, त्यांनींच शिवाजी महाराजांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र म्हणजे चिटणीशी बखर छापून प्रसिद्ध केली होती. या बखरीप्रमाणें त्यांनीं इतरहि बखरी जमा केल्या होत्या. विनायकराव कीर्तने यांनीं माल्कम्च्या Memoirs of Central India च्या आधारें मध्य हिंदुस्थानचा इतिहास मराठींत प्रसिद्ध केला आणि एवढ्यावरच पुढें हा इतिहासविषय जवळ जवळ सोडून दिल्यासारखा केला. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीवर यांनीं लिहिलेलें सुरस नाटक अद्यापिहि वाचण्यासारखें आहे.

पेशवे दप्तरांत पहिला प्रवेश

माधवराव रानडे यांचें मात्र इतिहासावरील लक्ष्य केव्हांच उडालें नाहीं किंवा कमी झालें नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाला अतिशय उपयोगी पडणारी अशी अपरंपार सामग्री पेशवे दप्तरामध्यें अवश्य सांपडली पाहिजे, ही गोष्ट माधवराव यांनीं उत्तम प्रकारें ओळखिली होती. आणि म्हणून पेशवे दप्तरांतील सामग्री तपासण्यास मिळून तिची प्रसिद्धी व्हावी, या प्रयत्नांतहि ते मनापासून लक्ष घालीत असत. पेशवेदप्तर हातीं येतांच त्याची व्यवस्था चॅपलिन् साहेबांच्या कमिशनरींत अगदीं आरंभींच लावण्यांत आली होती. पुढें दप्तर सरकारानें देशी अमानतदारांच्या हवाली केलें. त्यानंतर कर्नाटकांत गाजलेले गॉर्डन्साहेब हे येऊन दप्तरांत नेटिव्हांचा प्रवेश त्यांनीं बंद केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. इनाम कमिशनचे एक अधिकारी म्हणून लोकहितवादी रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख यांचा कांहीं संबंध दप्तराशीं राहिला. तथापि एकंदरींनें लोकहितवादीसारख्या इतिहासप्रिय, जिज्ञासु व परिश्रमी* गृहस्थाचा सरकारी नोकरीच्या निमित्तानें पेशवे दप्तराशीं जो संबंध आला त्याचा म्हणण्यासारखा फायदा संशोधनाच्या कार्यास झाला नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. या घटनेचा सर्व वृत्तांत आज

* 'शतपत्रीं'त रावबहादुर लोकहितवादींचा पेशवे दप्तराबाबत एक वाचनीय लेख प्रसिद्ध झालेला आहे.

उपलब्ध नाहीं. तथापि पेशवे दप्तर यानंतर जें लोकदृष्टीआड झालें आणि सरकारी कडीकुलपांत जाऊन बसलें तें परवां परवांपर्यंत तसेंच पक्कें बसून राहिलें !

कागदपत्रांचें युग

अशा बंदोबस्तांत अडकून राहिलेल्या पेशवे दप्तरांत प्रवेश मिळविण्याची खटपट डेक्कन् व्हर्न्याक्युलर् ट्रान्सलेशन् सोसायटीच्या मार्फत त्या सभेचे अध्यक्ष डॉ. भांडारकर हे असतांना रावबहादुर महादेव गोविंद रानडे यांच्या वजनानें व सूचनेनें करण्यांत आली. काथवटे-साने-प्रभृति विद्वान् सरकारी सेवकांच्या द्वारें तपासणी करण्याची ही जी खटपट सुरू होती ती यशस्वी होण्याच्या वेळीं रोज दप्तरांत जाऊन सूचने-प्रमाणें तपासणी करील असा एक तरुण मनुष्य कै. दादासाहेब करंदीकर यांच्या शिफारशीनें सोसायटीस मिळाला. हेच कै. रावबहादूर दत्तात्रय बळवंत पारसनीस होत. खुद्द सरकारानें दप्तरांतील इतिहासोपयोगी माहिती निवडून काढण्यासाठीं कै. रावबहादुर गणेश चिमणाजी वाड यांची नेमणूक केली होती. या सर्व खटा-टोपांतून पेशवे रोजनिशींतील माहितीचे १४।१५ खंड, वाड व पारसनीस यांच्या नांवें प्रसिद्ध झाले. पुढें पारसनीस यांना कै. पुरुषोत्तम विश्राम मावजी शेट या मरा-ठ्यांच्या इतिहासाच्या अभिमानी अशा श्रीमान् भाटिया गृहस्थांचें साहाय्य मिळालें आणि मावजी व पारसनीस यांच्या नांवानें आणखी कांहीं तसले खंड प्रसिद्ध झाले.

पारसनीस

पेशवे दप्तरामध्यें पारसनीस यांनीं जें एकदां पाऊल टाकलें तें आपल्या अंगच्या अनेक गुणांनीं सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी सुप्रसन्न ठेवून अखेरपर्यंत कायम ठेविलें. सुमारें पंचवीस तीस वर्षांच्या या अवधींत पारसनीस यांनीं सुमारें आठ दहा हजार पत्रें निवडून नकलवून ठेविलीं. त्यांच्या हाताखालीं कांहीं फारशी माणसें नव्हतीं व स्वतः ते पुण्यास सतत राहूं शकत नसत. रोजनिशींतून व इतर कांहीं दप्तरांतून निवडलेले कित्येक कागद मागें सांगितल्याप्रमाणें डेक्कन् व्हर्न्याक्युलर् ट्रान्स्ले-शन् सोसायटी व मावजी शेट या उभयतांच्या मेहनतीनें छापून निघाले. तथापि रावबहादुर पारसनीस यांनीं मावजी शेट यांच्या मदतीनें सातारकर राजे आणि नाना

फडणवीस यांच्या वंशजांकडून बरेच महत्त्वाचे कागद व वस्तु विकत (?) घेव-विल्या होत्या. आणखीहि कित्येक ऐतिहासिक घराण्यांतून माहिती जमा केली होती. या माहितीचा उपयोग पुढें पारसनीस यांनीं ' इतिहास-संग्रह ' नांवाचें मासिक पुस्तक कित्येक वर्षें चालवून त्यांत केला. ' इतिहास-संग्रह ' हें नांवावरून पाहिलें तर ' काव्यसंग्रहा'चें भावंड व ' काव्येतिहाससंग्रहा'चेंच अपत्य ठरतें. सहा सात वर्षांच्या अवधींत या मासिक पुस्तकांतून दिल्ली वगैरे ठिकाणचीं राजकारणें, महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, पेशव्यांच्या धुमे, सेवकराम वगैरे परराष्ट्रीय वकिलांचे पत्रव्यवहार व अनेक प्रकरणांतील ल्हानमोठीं महत्त्वाचीं पत्रें, स्फुटें, चित्रें वगैरे अशी मनोरंजक माहिती पारसनीस यांनीं प्रसिद्ध केली. अगदीं आरंभीं पारसनीस यांनीं डेक्कन् व्हर्न्याक्युलर् ट्रान्स्लेशन सोसायटीच्या खटपटीनें ' भारतवर्ष ' या नांवाचें ऐतिहासिक पुस्तक सुमारें दोनतीन वर्षें चालवून त्यांत कांहीं उपयुक्त कागद-पत्रें व कांहीं ऐतिहासिक विवेचनपर लेख प्रसिद्ध केले. तसेंच धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामी यांच्या चरित्रासह फार महत्त्वाचा जुना पत्रव्यवहार स्वतंत्रपणें प्रसिद्ध केला. यांत बाजीराव, चिमाजी अप्पा, स्वतः ब्रह्मेंद्रस्वामी, आंग्रे वगैरे अनेक मुत्सद्यांचीं व वीरांचीं शेंकडों अस्सल पत्रें आहेत. असा पत्रव्यवहार आपल्या रसाळ प्रस्तावनेसह प्रसिद्ध करून पारसनीस यांनीं इतिहाससंशोधक म्हणून आपल्या आयुष्याची पहिली कीर्ति केली. याच सुमारास पारसनीस यांनीं झांशीच्या सुप्रसिद्ध लक्ष्मीबाई या संग्रामशूर आणि उज्ज्वलचारित्र्य राणीची जीवनकथा आपल्या प्रौढ भाषेंत वर्णन करून सांगितलेली होती. अद्यापहि हें चरित्र पुनर्मुद्रित करण्यासारखें आहे. पारसनीस साताऱ्यास कांहीं दिवस म्हणजे आपल्या साहित्यिक जीवनाच्या प्रारंभीच्या काळांत ' महाराष्ट्र कोकिळ ' नांवाचें मासिक चालवीत असत. त्यांतहि त्यांची इतिहासप्रीति स्पष्ट दिसून येते.

रावबहादुर पारसनीस यांनीं A Note on the Sangli State, Poona in By-gone Days आणि Mahabaleshwar अशीं कांहीं पुस्तकें इंग्रजींतून प्रसिद्ध केलीं होतीं. ग्वाल्हेरचे कै. श्रीमंत माधवराव महाराज यांच्या आज्ञेनें ग्वाल्हेर

रियासतीच्या उपयोगाचे व प्रायशः नाना फडणवीस यांच्या मेणवली दप्तरांतून निघडलेल्या कागदपत्रांचे पांच खंड पारसनीस यांनीं खास महाराजांसाठीं छापून दिले. आतां ते निराळे मिळण्याची सोय झाली आहे. दक्षिणच्या इतिहासाला उपयोगी पडेल असें पुष्कळ मुद्रित परंतु दुर्मिळ ग्रंथसाहित्य रा. ब. पारसनीस यांनीं श्रमपूर्वक आपल्या बहुमोल ग्रंथालयांत एकत्रित केलें होतें. त्यांना विलायतेस जाण्याचा योगहि आला होता. तिकडे दुर्मिळ ऐतिहासिक पुस्तकें विक्रीस निघालीं असतां तीं मिळविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. त्याचप्रमाणें रावबहादुर यांनीं हातांनीं काढलेल्या जुन्या रंगित कलमी चित्रांचा अपूर्व संग्रह केला होता. त्यांचें बहुतेक आयुष्य साताऱ्यास गेलें. साताऱ्याचा त्यांस फार अभिमान असे आणि मराठ्यांच्या या जुन्या राजधानींत एक मोठें संग्रहालय स्थापून त्यांत आयुष्यभर खटपट करून मिळविलेला आपल्या जवळील संग्रह लोकोपयोगासाठीं लावून ठेवावा अशा प्रकारची योजना आंखून ती सिद्धीस नेण्यासाठीं आपल्या आयुष्याचीं अखेरचीं बरींच वर्षे पारसनीस झगडत होते. त्यांचा हा अखेरचा प्रयत्न बऱ्याच अंशीं सिद्धीस गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. रावबहादूर पारसनीस हे सुमारें १० वर्षांपूर्वी वारले. महाराष्ट्रीय इतिहास-संशोधकांत त्यांचें नांव मोठें आहे आणि त्यांनीं जमा केलेली व प्रसिद्ध केलेली सामग्री अफाट आहे. पारसनीस यांची वाणी अत्यंत मधुर असल्यामुळें ते आपल्या वाणीनें लोकांवर तावडतोब मोहिनी पाडीत. इतिहास-संशोधनाचा रूक्ष व्यवसाय करून रुबाबदारीनें जीवितयात्रा सफल करणारा पारसनीस यांच्यासारखा दुसरा कोणीहि पुरुष महाराष्ट्रांत झाला नाहीं, असें म्हणावयास चिंता नाहीं. त्यांनीं एका दृष्टीनें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

खरेशास्त्री

इ. स. १८९५ ते १९०० पर्यंत महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाच्या कार्याला नवीन दिशा लागली आणि बखरींचें युग संपून खतपत्रांचें युग (Age of Documents) सुरू झालें. पारसनीस आणि डेक्कन् व्हर्न्याक्युलर् ट्रान्सलेशन् सोसायटी यांनीं या काळांत या दृष्टीनें केलेल्या कामगिरीविषयीं वर उल्लेख

केलाच आहे. परंतु व्यक्तिशः पारसनीस किंवा संघशः डेक्कन् व्हर्नाक्युलर् ट्रान्सलेशन् सोसायटी यांच्यापेक्षाहि ज्यांची कामगिरी वरचढ लागेल असे दोन प्रसिद्ध इतिहास-संशोधक याच वेळीं या क्षेत्रांत प्रामुख्यानें चमकूं लागले. पैकीं रा. वासुदेवशास्त्री खरे हे वयानें पुष्कळ वडील असून आपल्या नाना फडणविसांच्या चरित्राच्यायोगानें प्रसिद्धीस आले. मिरजेजवळील पटवर्धनांचें मळे-दप्तर हा अमूल्य सांठा त्यांच्या हातीं लागला. मळेदप्तराचा परामर्ष हा वासुदेवशास्त्र्यांना जन्मभराचा व्यासंग म्हणून पुरून उरला. मळेदप्तरांत, साधारणपणें पटवर्धन मंडळी नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीपासून राजकारणांत पुढें येऊं लागली तेव्हांपासूनचे, कागद आहेत आणि ते बहुतेक सुरक्षित आहेत. हल्लीं त्यांची व्यवस्थाहि चांगली आहे, अशी ग्वाही रा. यशवंतराव खरे यांनीं दिलेली आहे. पटवर्धन हे पेशव्यांचे विश्वासांतील सरदार, पेशव्यांच्या हालचालींची दक्षिणेकडील बाजू सांभाळणारे हुशार, बुद्धिमान् आणि शूर असे निघाल्यामुळें त्यांनीं साहजिकच पुणें दरबारांत बातमीसाठीं व राजकारणासाठीं वकील ठेविले. पटवर्धनांच्या ठिकठिकाणच्या वकिलांनीं व कारकुनांनीं लिहिलेलीं हजारों बातमीपत्रें मळे-दप्तरांत आहेत. यांतून कै. वासुदेवशास्त्री यांनीं सुमारें चार लक्ष कागद वाचून पांच सात हजार कागद निवडून व नकलून घेतले. इतकेंच नव्हे, तर त्यांचे सारांश काढून, त्यांवरून निरनिराळ्या प्रकरणांची हकीकत संगतवार मांडून, निबडक मूळ कागद टीपा देऊन, ठळक ठशानें आणि धांवत्या अनुक्रमांकानें क्रमशः, खंडशः प्रसिद्ध केले. सुमारें तीस चाळीस वर्षे शास्त्रीबोवांनीं या कामांत व्यतीत केलीं. आपला प्रपंच सांभाळून, कोणाजवळहि तोंड न वेंगाडता, आपला अभिमान व बाणा कायम ठेवून, सतत चिकाटीनें मिरजेहून मळ्यास हेलपाटे घालून, मान मोडून नकला करून आणून, जो हा महदुद्योग खरेशास्त्री यांनीं केला तो एकंदर इतिहास-संशोधक-मंडळींत, जगांतहि फार उच्च दर्जाचा असा समजला जाईल. शके १६८० ते शके १७४० पर्यंतच्या पन्नाससाठ वर्षांतील पेशवाई इतिहासांतील घडामोडी पटवर्धन दप्तरानें पुष्कळच तपशीलवार आणि सुसंगत समजतात. पटवर्धन हे पेशव्यांचे पक्षपाती असल्याकारणानें त्यांच्याकडील दप्तरांत

माहितीच्या दृष्टीनें एकच बाजू कळत किंवा नकळत अधिक रंगविलेली सांपडली तर त्यांत विलक्षण असें कांहीं नाहीं. पटवर्धनांच्या विरुद्ध पक्षांतील मंडळीकडील दप्तरेंहि सुसंगत लाविलेलीं सांपडलीं तर सत्यनिर्णय करण्यास त्यांचा पुष्कळ उपयोग झाल्याबांचून राहणार नाहीं. या काळीं दुर्दैवानें तसा योग जुळून आला नाहीं. पटवर्धनांप्रमाणें किंबहुना त्याहून अधिक घरोबा पुरंदरे व पेशवे यांचा होता. हा घरोबा अगदीं प्रथमपासून असल्यामुळें पुरंदरे दप्तरांत फार महत्त्वाची ऐतिहासिक माहिती आढळून येणें अपरिहार्य होईल. परंतु आपल्या दुर्दैवानें तें दप्तर मळेदप्तराप्रमाणें व्यवस्थित व सुरक्षित राहूं शकलें नाहीं. तथापि आजलाहि त्यांतील जो भाग उपलब्ध झाला आहे, त्यायोगानें आपल्याला पुष्कळच नवीन माहिती समजत आहे. पुरंदरे दप्तराचे तीन खंड प्रसिद्ध झाले असून आणखीहि तितकेच प्रसिद्ध होण्याजोगे आहेत. पुरंदरेदप्तराप्रमाणें दाभाडे, विंचूरकर, शितोळे, प्रतिनिधि वगैरेंचीं दप्तरें शिल्लक राहिलीं असतीं आणि शिल्लक आहेत तीं हातीं आलीं असतीं तर आपल्या माहितींत भर व दृष्टिकोनांत बदल झाल्याशिवाय राहिला नसता.

नाना फडणविसांच्या चरित्राशिवाय शास्त्रीबोवांनीं मोठा असा एखादा इतिहासग्रंथ लिहिला नाहीं. ‘अधिकारयोग’ या नांवाचें लहानसें पुस्तक (१९०८) प्रसिद्ध केलें. तेंहि वास्तविक नाना फडणविसांच्या चरित्राला दुरुस्तीरूप किंवा पुरवणीरूप असेंच आहे. शास्त्रीबोवांनीं आपल्या ‘ऐतिहासिक लेखसंग्रहा’च्या निरनिराळ्या खंडांना लिहिलेल्या प्रस्तावना त्यांच्या चिरंजीवांनीं एकत्र करून छापिल्या आहेत. त्यायोगें मराठी साम्राज्याच्या उत्तरार्धाचा इतिहास पुष्कळ सुसंगत समजून येतो. भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या संमेलनांत शास्त्रीबोवांनीं कांहीं महत्त्वाचे निबंध वाचलेले प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत मालोजी व शहाजी हा त्यांच्या विवेचन-शक्तीची चांगली साक्ष देणारा असा निबंध आहे. एकंदरींत राजवाड्यांनीं म्हटल्याप्रमाणें वासुदेव शास्त्र्यांसारखीं प्रचंड माहितीचीं माणसें क्वचितच निर्माण होतात. स्वतः त्यांनीं कसूर न करतां आपली शक्ति व बुद्धि सर्वस्वीं आपल्या कार्याला वाहिली, परंतु त्यांचा

उपयोग त्यांच्या देशबांधवांनीं म्हणजे आम्हीं जसा करून घ्यावयास पाहिजे तसा करून घेतला असें बिलकुल म्हणतां येणार नाहीं.

राजवाडे

आतां यानंतर ज्यांचें नांव यावयाचें आहे आणि ज्यांच्या कामगिरीचें वर्णन करावयाचें आहे, त्यांनीं केलेली कामगिरी महाराष्ट्रांतच नव्हे तर एकंदर इतिहास-संशोधकांतहि कांहीं दृष्टीनें अद्वितीय अशी आहे. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं आपलें सर्व आयुष्य या एकाच कार्यास निश्चयपूर्वक वाहिलें. इतिहाससंशोधन हाच त्यांनीं आपला प्रपंच केला आणि आपली सर्वगामी बुद्धिमत्ताहि त्यांनीं याच कामीं लाविली. आपल्या स्वार्थत्यागाचें सर्व बळ त्यांनीं याच कामीं खर्च केलें. या अपूर्व तपस्येमुळें राजवाडे यांनीं महाराष्ट्रांत इतिहास-संशोधनाची जागती ज्योत लावून सर्व बाजूंनीं मागें पडत चाललेल्या महाराष्ट्रास एक अभिमानाचें आणि विश्वासाचें स्थान निर्माण करून दिलें. समर्थ रामदासस्वामींबद्दल लिहितांना विठोबाअण्णांनीं लिहिलेला श्लोक राजवाड्यांनाहि उत्तमोत्तम लागू पडतो. ‘ अकिंचनवरेण्योऽपि समर्थपदवीं गतः । ’ आणि कै. प्रो. भानू हे राजवाड्यांस नेहमीं ‘ रामदास ’ म्हणत असत.

‘ भाषांतर ’ मासिकांत अनेक युरोपीय इतिहासादि ग्रंथांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध करून मराठी लोकांच्या बुद्धीस पौष्टिक खाद्य अर्पण करण्याचा उद्योग दैवी कोपानें बंद पडण्याच्या सुमारास राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाकडे लक्ष पुरविलें. प्रथमतः वाईस त्यांच्या हातीं एरंडे दप्तर आलें. या दप्तरांत फारच महत्त्वाचीं पत्रें इतक्या बंदोबस्तानें कातड्यानें मढविलेल्या पेटाऱ्यांत ठेविलीं होतीं कीं, हीं पत्रें जशीं कांहीं काल लिहिलीं आहेत अशीं दिसावीं. त्यांवरील वाळू, शाई आणि कागदाचा रंग हीं अगदीं लिहिलीं तेव्हां जशीं होतीं तशीं दिसत. हीं पत्रें सर्व मराठी इतिहासांत लोकप्रसिद्ध असा जो पानपताचा विषय त्या वीरसंगराचे नायक जे भाऊसाहेब पेशवे त्यांचा व गोविंदपंत बुंदेले यांचा जो पत्रव्यवहार झाला त्यांतलींच बहुतेक आहेत. या खंडामुळें पानपतच्या प्रकरणावर येथून तेथून नवा प्रकाश पडला !

हीं पत्रें राजवाड्यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' खंड १ ला म्हणून छापून प्रसिद्ध केलीं (१८९८). राजवाड्यांचा हा खंड जसा क्रमानें पहिला तसा गुणानेंहि पहिला आहे. या खंडांतील पत्रेंच फार महत्त्वाचीं आहेत असें नाहीं, तर या पत्रांचा परामर्ष घेणारी जी पल्लेदार प्रस्तावना राजवाडे यांनीं लिहिली आहे तीहि महत्त्वाची आहे. या प्रस्तावनेंत एकंदर मराठ्यांच्या इतिहासाचें विवेचन करण्याचा नवाच दृष्टिकोन महाराष्ट्रास मिळाला आहे. राजवाडे यांची सूक्ष्म दृष्टि, व्यापक अध्ययन आणि कणखर देशाभिमान हीं सर्व या प्रस्तावनालेखांत ठेंचून भरलेलीं दिसतात. राजवाड्यांच्या भाषेंतील प्रौढी या प्रस्तावनेंत उत्कृष्ट प्रकारें चमकत आहे. निबंधमालाकारांच्या लिहिण्यानें अथवा जिनसीवाले यांच्या बोलण्यानें राजवाडे यांचें लक्ष मराठी इतिहासाच्या विषयाकडे वळलें आणि राजवाडे यांनीं तो विषय आपलासा करून पूर्वी कधींहि न लाभलेला भारदस्तपणा आणि मोठेपणा या विषयाला आणून दिला. येणेंप्रमाणें आरंभ करून राजवाडे यांनीं आपली अखेरी कशी साधली याचें वर्णन आतां जरा विस्तारानें करूं.

राजवाडे यांनीं आपला आवडता व्यवसाय सुमारें तीस पस्तीस वर्षें केला आणि शके १८४८ त ते दिवंगत झाले. इतक्या अवधींत मागें वर्णन केलेल्या पानिपत प्रकरणावरील पुस्तकापासून त्यांच्या मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें या मालेला प्रारंभ झाला. या मालेचे एकंदर बावीस खंड राजवाडे यांनीं छापिले. यांतील पहिला खंड त्यांनीं आपल्या अंगावर छापला आणि त्या खटाटोपांत होती नव्हती ती माया ते संपवून बसले! त्यांचा घरगुती मायापाश यापूर्वीच तुटला होता. तदनंतर आमरण व्रती राहून त्यांनीं आपल्या आयुष्याचा उद्योग आपलें सर्वस्व पणाला लावून जोरानें चालू केला. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनीं जवळ जवळ हिंदुस्थानभर प्रवास केला आणि अनेक ठिकाणें जातीनें पाहिलीं. सह्याद्रीची कोंकणपट्टी त्यांनीं तीन वेळ पायानें हिंडून इतिहासाच्या दृष्टीनें तपासून पाहिली. एकदा खलाटीनें, एकदा वलाटीनें आणि एकदा मधून. अनेक किल्ले, गांवें, देवळें, मशिदी, रस्ते, लेणीं, भुयारें त्यांनीं हिंडून पाहिलीं. या पर्यटणांत जुनीं ऐतिहासिक घराणीं शोधून

काढिलीं. ज्यांच्या ज्यांच्या जवळ कागदपत्रांचा गळाठा सांपडेल त्यांचें त्यांचें मन वळवून तो तपासणें किंवा मिळविणें हें काम त्यांचें नेहमीं चालू असे. इतिहासासंबंधानें त्यांची कल्पना अत्यंत व्यापक असल्यामुळें त्यांच्या समोर केवळ राजकीय इतिहासच नव्हता. एकंदर महाराष्ट्रीय लोकांचें निरनिराळ्या क्षेत्रांतील जीवन तपासणें हा त्यांचा हव्यास होता. त्यामुळें आर्थिक, कार्षिक, वैयापारिक, सांस्कृतिक, धार्मिक, सारस्वतिक इत्यादि लोकजीवनाचीं विविधांगें तपासणें आणि त्यांतून साहित्य मिळविणें ही त्यांची खटपट असे. बरींचशीं शास्त्रें राजवाडे यांना अवगत होतीं. गणित, प्रमुख भौतिक शास्त्रें, लिपिशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांचें अवलोकन त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें केलें होतें. ते मोडी कागदपत्र वाचीत यांत तर नवल नाहींच, पण प्राचीन ताम्रपट व शिलालेखहि लीलेनें वाचीत ! फारसीचाहि प्राथमिक अभ्यास त्यांचा झाला होता आणि पुढें पुढें पाणिन्यादि वैयाकरणांचे ग्रंथ त्यांनीं कसून अभ्यासिले. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं महाभारत व वेदवेदांगांचाहि अभ्यास बारकाईनें केला होता. किंबहुना निरुक्त शास्त्राच्या आधारें महाराष्ट्राच्या वसाहतकाळाच्या इतिहासाचा छडा लावण्याचा पाया या अभ्यासाच्या बळावर त्यांनीं घातला. ऐतिहासिक मूळ साहित्य जमवितांना त्यांची विविध व व्यापक दृष्टि असल्यामुळें व सतत तोच उद्योग एकचित्तानें चालू असल्यामुळें त्यांचें काम फार भरदार असें झालें. हें सर्व काम त्यांनीं जवळ द्रव्यबळ कांहींहि नसतांना कसें सिद्धीस नेलें ही अचंबा वाटण्यासारखी गोष्ट आहे, एवढेंच येथें सांगितल्यास पुरें होईल !

राजवाडे यांना प्रथमारंभीं मनोभावानें साहाय्य करणारे कै. प्रो. विजापूरकर हे होत. यांनीं आपल्या 'ग्रंथमाले'त राजवाडे यांच्या मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें या मालेचे खंड क्रमशः देण्यास सुरुवात केली. क्रमांक दोन, तीन, पांच, सहा आणि आठ असे या मालेचे पांच खंड 'ग्रंथमाले'त प्रसिद्ध झाले. हे सर्व खंड फार महत्त्वाचे आहेत. चौथा खंड चित्रशाळेनें कसाबसा गवती कागदावर छापून काढला होता! चित्रशाळेचे रा. वासुदेवराव जोशी यांचा लोभ राजवाडे यांच्यावर प्रथमपासून होता. राजवाडे यांचे 'राधामाधवविलासचंपू' आणि 'महिकावतीची बखर' हे अलीकडील

दोन ग्रंथ त्यांनीं आपल्या चित्रशाळेंत प्रसिद्ध केले आहेत. राजवाडे यांच्या पश्चात् त्यांच्या 'ऐतिहासिक प्रस्तावना' आणि इतर लेख यांचे दोन तीन खंड व म. इ. साधनें खंड चवथ्याची द्वितीयावृत्ति हे ग्रंथ चित्रशाळेनेंच प्रसिद्ध केले आहेत. याप्रमाणें चित्रशाळेचा आधार राजवाडे यांस होता. राजवाडे यांचें आणखी एक आश्रयस्थान म्हणजे मुंबईस कांहीं वर्षें चालत असलेलें 'श्रीसरस्वतीमंदिर' नांवाचें द्वैमासिक होय. राजवाडे यांचे 'मराठी छंद' वगैरे विषयांवरील विद्वत्तापूर्ण निबंध व कित्येक शोधटिपणें हीं यांतून प्रसिद्ध झालीं आहेत. 'केसरी'चा तर राजवाडे यांना सतत पाठिंबा असे. त्यांचे अनेक लेख 'केसरी' नें प्रसिद्ध केलेले आहेत. 'राष्ट्रोद्धार', 'विश्ववृत्त', 'प्राची प्रभा' वगैरे मासिकांनीं राजवाडे यांचे बरेच लेख व शोध प्रसिद्ध केले आहेत. धुळ्याच्या 'सत्कार्योत्तेजक सभे' नें जसा दासबोध प्रसिद्ध केला, तशीच तिनें अतिशय जुनी 'ज्ञानेश्वरी'हि प्रसिद्ध केली. ही ज्ञानेश्वरीची फार जुनी प्रत बीडपाटांगण येथील मठांतून राजवाडे यांनीं मिळविली होती व तिला ते मुकुंदराजी मानीत असत. ही प्रत आणि तिला लिहिलेली विस्तृत, विवेचक व गहन प्रस्तावना राजवाडे यांचा दांडगा उद्योग आणि जाडी विद्वत्ता यांची भव्य साक्ष केंव्हांहि देतील. कवीनें मूळ लिहिलेल्या प्रतीवरून किंवा समकालीन प्रतीवरून त्याचे ग्रंथ मुद्रित करण्याच्या शास्त्रशुद्ध संप्रदायाला राजवाडे यांनींच सुरुवात केली असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि त्याचीं गोड फळें आतां आपणांस सर्वत्र दिसून येत आहेत. राजवाडे यांस या उद्योगाचे महर्षि म्हणण्यास कोणताहि प्रत्यवाय नाहीं.

शके १८३२ सालीं राजवाडे यांनीं इतिहाससंशोधनाच्या निरनिराळ्या द्वारांनीं आणि निरनिराळ्या व्यक्तींच्या मार्फत होणाऱ्या कार्याला संघटित स्वरूप देण्याच्या हेतूनें पुण्यास भारत-इतिहास-संशोधक मंडळ नांवाची संस्था स्थापन केली. याच वेळीं मुख्यतः राजवाडे यांच्या प्रेरणेनेंच धुळ्यास देव, चांदोरकर व भट या त्रिवर्गाचें संशोधनाचें काम चालू होतें. सत्कार्योत्तेजक सभा हिचा मूळ प्रारंभ सन १८९३ मध्यें झाला. दासबोधाची समर्थकालीन प्रत या सभेनें प्रथमतः शके

१८२५ मध्यें प्रसिद्ध केली. रा. देव प्रभृतींची राजवाडे यांच्यावरील भक्ति अनन्य-साधारण म्हणतां येईल. 'संस्कृत भाषेचा उलगडा' या नांवाचें राजवाडे यांचें पुस्तक सत्कार्योत्तेजक सभेनेंच प्रसिद्ध केलें आहे.

राजवाडे यांच्या म. इ. साधनमालेच्या खंडांपैकीं पहिला, तिसरा, सहावा व आठवा या खंडास त्यांनीं विस्तृत विवेचनपर प्रस्तावना जोडिल्या आहेत. त्यांना प्रस्तावना म्हणण्यापेक्षां स्वतंत्र प्रबंधच म्हणणें योग्य होईल. या प्रबंधांपैकीं सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेचा प्रबंध हा अत्यंत महत्त्वाचा असून तो वाचतांना आपण एखाद्या महान् परिणतप्रज्ञ इतिहासतत्त्ववेत्त्याचें ठसठशीत विवेचन वाचीत आहोंत असा प्रत्यय मनास येतो. इतिहासाचें खरें स्वरूप आणि विस्तार किती आणि केवढा आहे याचें अत्यंत मार्मिक व सुयुक्तिक विवेचन या प्रबंधांत जसें आढळतें तसें अन्यत्र क्वचितच आढळेल. राजवाडे यांचें मूलगामी पांडित्य आणि पल्लेदार भाषा-पद्धति यांचें उत्कट दर्शन या प्रबंधांत घडून येतें. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत पानिपत प्रकरणाचा साधार प्रपंच करून राजवाडे यांनीं जो नमुना पुढें ठेविला आहे तो अद्यापिहि मराठींत अनतिक्रांत आहे. त्याच्या जोडीला त्यांच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेचा प्रबंध बरोबरीच्या तोलानें किंबहुना अधिक वरचढ ऐटीनें बसूं शकेल. तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत ब्रह्मेंद्रस्वामीविषयीं पारसनिसांनीं केलेलें गोडबें व भोळें विवेचन राजवाडे यांनीं भुसाप्रमाणें उडवून दिलें आहे. तें वाचतांना प्रतिपक्षाची दाणादाण करण्याची राजवाड्यांची शक्ति व खोचक भाषाशैली वाचकाला आपल्याबरोबर त्या वेळेपुरती तरी वाहवून नेते. राजवाडे यांच्या या प्रस्तावना आणि उत्तर आयुष्यांत धुळ्याच्या 'इतिहास व ऐतिहासिक' या मासिक-पुस्तकद्वारें त्यांनीं प्रसिद्ध केलेले संशोधनशास्त्राविषयींचे व भाषाशास्त्राविषयींचे लेख यांत राजवाड्यांचें स्वरूप त्यांच्या अंगच्या गुणदोषांच्या उत्कटत्वासुद्धां याथार्थ्यानें प्रतिबिंबित झालें आहे. असीरिया व आपलीं पुराणें, ही त्यांची केसरींतील लेख-माला त्यांची संशोधक दृष्टि किती दूरवर अप्रतिहत संचारत असे याचा उत्कृष्ट पुरावा होय. ऋग्वेदावरून वृत्राविषयीं वगैरे डॉ. प्राणनाथ आज जे सिद्धांत जोरानें

पुढें मांडीत आहेत ते वाचणाऱ्यांस राजवाडे यांचे हे लेख वाचून कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. राजवाडयांच्या या लेखांचें इंग्रजी भाषांतर मराठा पत्रांत १९१२ सालीं आम्हीं प्रसिद्ध केलें होतें.

राजवाड्यांच्या कामगिरीचें यथार्थ वर्णन करावयाचें म्हटलें तर तें या लहानशा प्रबंधांत आटपणार नाहीं. त्याला एक निराळा ग्रंथच लिहावा लागेल. राजवाड्यांच्या गुणांचें वर्णन येथें केलें आहे. पण त्यांचे कित्येक गुण आवकलेल्या आंब्याप्रमाणें दोषरूपाला चढलेले होते. इतर विद्वानांस तुच्छ लेखणें आणि आपल्या आवडत्या कल्पनांना कल्पना न म्हणतां सिद्धांत म्हणणें या दोन खोडी त्यांच्या ठायीं अमूपत्वानें वास करीत होत्या. त्यांचा रसरसलेला देशाभिमान त्यांच्या ठिकाणीं शत्रुमित्रभाव नेहमीं प्रखर स्वरूपांत जागृत ठेवी. आपल्या देशबांधवांनीं आपली योग्य कदर केली नाहीं याविषयींची उद्विग्नता त्यांच्या बोलण्यांत तितकी नाहीं तरी मनांत काचत असली पाहिजे असें त्यांच्या निकट सहवासांत राहून सूक्ष्म नजरेनें पाहणारास पक्केपणीं दिसून येई. राजवाड्यांची कामगिरी फार विविध स्वरूपाची व क्रांतिकारक असल्यामुळें त्याविषयीं एवढा प्रपंच येथें करावा लागला. आतां लेखणी आवरली पाहिजे. तथापि तसें करतांना अलीकडे महानुभाव पंथाचें जें अभिनव दालन महाराष्ट्र सारस्वतांत उघडलें आहे आणि सांकेतिक लिपीचा कोश हस्तगत करून जें महानुभावी वाङ्मय-भांडार हातीं लागलें आहे व लागत आहे त्या प्रयत्नाची पहिली शिडी लावणारे धाडसी, यशस्वी वीर म्हणून राजवाडे यांचेंच नांव सत्यप्रिय लेखक सदैव घेण्यास चुकणार नाहींत हें येथें सांगितलें पाहिजे. भा. इ. सं. मंडळापुढें राजवाडे यांनींच मानभावांचे गुप्त संकेत आपल्या बुद्धिबलानें लावून अपूर्व क्रांति करून दाखविली.

असा राजवाडे यांच्या कर्तृत्वाचा काल शके १८१५ पासून शके १८४८ पर्यंत सुमारें तीस वर्षांचा धरितां येईल. इतिहाससंशोधनाच्या दृष्टीनें या काळास **राजवाडे-युग** म्हणण्यास हरकत नाहीं. राजवाडे यांनीं नुसते लेख लिहिले व शोध लाविले इतकेंच नाहीं तर आपल्या दिव्य प्रतिभा-प्रभावानें आपली जागती

परंपरा निर्माण केली. जागोजागीं अनेक लहानमोठी मंडळी संशोधनाच्या कार्यांत राजवाड्यांनीं गुंतविली. ज्यांना मूळचाच थोडा नाद होता त्यांना राजवाड्यांच्या उद्योगानें जोराचें प्रोत्साहन मिळालें. राजवाड्यांच्या प्रस्तावनांतून इतिहाससंबंधानें व इतिहासशास्त्रासंबंधानें जें अभिनव प्रतिपादन झालें आहे तें अनेकांस मार्गदर्शक झालें आहे. वा. दा. मुंडले, पां. न. पटवर्धन, मिया आतार, बाबा चांदोरकर, शं. ना. जोशी, कृ. पां. कुलकर्णी, वा. सी. बेंद्रे, य. खु. देशपांडे वगैरे अनेक तरुण संशोधक मंडळी राजवाडे यांना गुरुस्थानीं मानितात. खुद्द त्यांच्या पिढींतील किंवा वडील पिढींतील इतिहासभक्त राजवाड्यांस फार मोठा मान देत. साने, भानु, मेहेंदळे, भावे, गद्रे प्रभृति मंडळींची राजवाड्यां-विषयीं तीच भावना असे. स्वतः राजवाडे यांनीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्थापन केलें तर राजवाडे संशोधनमंदिर, शारदाश्रम इत्यादि संस्था त्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून स्थापन झालेल्या आहेत. ज्या मॉमूसेनचा उद्धार राजवाडे कधीं कधीं आदरानें करीत असत त्याच्यापेक्षां किंबहुना एका दृष्टीनें त्याहून अधिक कार्य राजवाडे यांनीं करून साऱ्या हिंदुस्थानास उदाहरण घालून दिलें आहे. 'गेल्या तीनशें वर्षांत असा माणूस झाला नाहीं' असें राजवाड्यांचे प्रखर टीकाकार ठाकरे यांनीं त्यांच्या मृत्यूनंतर दिलदारपणानें व प्रांजलपणानें उद्गार काढिले ! परवां अखिल भारतीय आधुनिक परिषदेचे अध्यक्ष सर शफाआत यांनीं महाराष्ट्र संशोधकांविषयीं जे प्रांजळ व थोर उद्गार काढले त्याचें पुष्कळसें श्रेय राजवाडे यांच्या प्रयत्नांसच द्यावें लागेल !

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाची स्थापना करून आणि त्याच्या धोरणाची दीर्घ दृष्टीनें रचना करून राजवाडे यांनीं तें कार्य दुसऱ्यांच्या अंगावर टाकून दिलें. त्यांनीं स्थापिलेल्या या मंडळाची गेल्या पंचवीस वर्षांत क्रमशः अभिवृद्धिच होत गेली आणि केवळ लोकाश्रयावर खुद्द या संस्थेनें व संस्थेच्या पुरस्कारानें सुमारें पाऊणशें ग्रंथ प्रसिद्ध झाले ! हे ग्रंथ अनेकविध उपयुक्त माहितीनें खच्चून भरले आहेत आणि महाराष्ट्राच्या भावी इतिहासकारास त्यांचा उपयोग केल्याशिवाय गत्यंतर

नाहीं. कागदपत्रें, ताम्रपट, शिलालेख, नाणीं, वस्त्रें, पात्रें, शस्त्रें, चित्रें, व्युत्पत्ति, गाणीं, म्हणी, आख्यायिका, स्थलवर्णनें, नकाशे, मूर्ती इत्यादि शेंकडों प्रकारचें साहित्य जमवून, वर्णून, संरक्षून, विभागून इत्यादि षड्‍विध पद्धतीनें जागापुढें ठेविलें आहे. धुळ्याच्या 'सत्कार्योत्तेजक सभे'चें कार्य असेंच विपुल आहे. परंतु तें रामदास व रामदासी या विषयावरच अधिक केंद्रीभूत झालेलें आहे. असें एकाच विषयावर आपलें लक्ष केंद्रीभूत करणाऱ्या अनेक संस्थांची अद्याप गरज आहे. यवतमाळचा 'शारदाश्रम' आणि नागपूरचें 'मध्यप्रांत-संशोधन मंडळ' साहजिकच महानुभाव व त्यांचें वाङ्मय हे विषय आपलें लक्ष्यकेंद्र बनवीत आहेत. सातारा येथील 'वस्तुसंग्रहालय' आजच्यापेक्षां अधिक उपयुक्त स्वरूपांत महाराष्ट्राची सेवा पुढें करूं लागेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

राजारामशास्त्री

इतिहासक्षेत्रांत अधूनमधून झालेल्या वैयक्तिक व सांधिक अशा इतर प्रयत्नांकडे आतां येथें वळूं. बडोद्यास नंदुरबारकर आणि मंडळी यांनीं शिवदिग्विजय (१८९५) व शिवाजीप्रताप या दोन बखरी प्रसिद्ध केल्या. पुण्यास व्ही. एस्. यांनीं आपल्या मार्मिक लेखांचे दोन गुच्छ (१८९४–९६) प्रसिद्ध केले. कै. प्रो. भानु यांनीं नाना आणि महादजी यांवर आपलें विवेचन प्रसिद्ध केलें. केसरींत पुष्कळ ऐतिहासिक माहिती, चर्चा वगैरे सारखी प्रसिद्ध होत असे आणि दिवेकर, पारसनीस, राजवाडे, पांगारकर, भावे, आठल्ये, गद्रे प्रभृति मंडळींचीं पुष्कळ पत्रें या वेळीं त्या वर्तमानपत्रांत आलेलीं आढळतात.

मुंबईचे सुप्रसिद्ध विद्वान् कै. प्रो. राजारामशास्त्री भागवत यांचें प्राचीन इतिहासाप्रमाणेंच अर्वाचीन इतिहासाकडेहि विशेष लक्ष असे. मराठ्यांच्या इतिहाससंबंधानें त्यांनीं कित्येक लहानमोठे लेख प्रसिद्ध केले आहेत. त्यांतून त्यांनीं मांडलेली विचारसरणी स्पष्टवक्तेपणाची असून, पटण्याजोगी नसली तरी विचार करण्याजोगी आहे. हें विधान भागवतांच्या पुष्कळ लेखांसंबंधानें सामान्यतः करतां येईल. त्यांची विद्वत्ता, बहुश्रुतता, बुद्धीची सूक्ष्मता, विचारांची स्पष्टता आणि मांडणींतील

सडेतोडपणा व बाणेदारपणा हे गुण विशेषतः स्पष्टपणें मनांत भरतात. परंतु आग्रह व एककल्लीपणा या दोषांमुळें, पिसा येथील मनोरे ज्याप्रमाणें झुकलेले आहेत तसे, त्यांचे लेख जरा झुकलेले वाटतात. 'ब्राह्मण पण हिंदु नव्हे' अशा सहीनें ते लेख लिहीत. एवढ्या लहानशा अभिधानांत सुद्धां त्यांचे गुणदोष किंवा त्यांचीं मतें सांठविलेलीं आढळतात. एकंदरींत मुरारिमिश्रांप्रमाणें त्यांचा साराच तृतीय पंथ होता यांत शंका नाहीं.

त्यांच्या सर्व पुस्तकांत 'मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्‌गार' (१८८७) हें पुस्तक विशेष वाखणण्यासारखें आहे. मऱ्हाटे लोक व मऱ्हाटे राष्ट्र यांसंबंधानें त्यांचा कळवळा या पुस्तकांत सर्वत्र दिसून येतो. राजारामशास्त्र्यांची राजवाड्यांशीं पुष्कळ बाबतींत तुलना करतां येईल. दोघेहि नैरुक्तिक होते. दोघेहि इतिहासपंडित होते. दोघेहि लोकांस विक्षिप्त वाटत. दोघेहि सडेतोड व बाणेदार होते. मऱ्हाटी व मऱ्हाटे यांचा जाज्वल्य अभिमान दोघांच्या ठायीं उत्कृष्ट होता. दोघांची भाषासरणी व विचारसरणी स्वतंत्र होती. साधी राहणी व उच्च विचारसरणी या कोटींत दोघेहि पडतात. दोघांचेंहि जगाशीं पटत नसे. असें असतांहि मराठी वाङ्मयाची व महाराष्ट्र समाजाची दोघांनींहि मनोभावें सेवा करून दाखविली. उलटपक्षीं एकास ब्राह्मण्याचा उत्कट अभिमान होता तर दुसरा ब्राह्मणी काव्याच्या कल्पनांनीं व्याप्त झाला होता. एकास युरोपियनांचें वावडें असे तर दुसऱ्यास मिशनऱ्यांच्या सहवासांत आणि सेवेंत आयुष्य कंठणें परवडलें. अशी ही रा. रा. भा. व वि. का. रा. यांची विलक्षण जोडी आपल्या वैलक्षण्यानें व वैशिष्ट्यानें महाराष्ट्रांत चमकून गेली! दोघेहि समकालीन असून 'भेटी नाहीं जन्मवरी' असा प्रकार होता. एकाच पर्वताच्या एकाच सोंडेमुळें दोन अंगाला बनलेल्या दोन खोऱ्यांतून दोन स्वतंत्र प्रवाह निघावे आणि दोन्ही एकाच दिशेनें परंतु एकमेकांस स्पर्श न करतां समुद्रास मिळावे तसाच कांहींसा प्रकार या दोन जबरदस्त विद्वानांच्या लेखनप्रवाहांसंबंधानें झाला असें म्हटलें असतां उचित दिसेल.

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्यांशीं दोघांचाहि संबंध आला. 'भाषांतर'

मासिकाच्या द्वारें रोमन पादशाहीचा ऱ्हास समग्र प्रसिद्ध करण्याची राजवाड्यांची योजना होती. या कामीं श्रीमंत सयाजीराव यांच्या मनांतून मोठी मदत करण्याचें आलें होतें, परंतु तो योग कांहीं जुळून आला नाहीं. पण राजारामशास्त्री यांच्याकडून श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं 'कैसरकडून सुल्तानाकडे' हें पुस्तक लिहून घेतलें. हा विषय स्वतः श्रीमंतांनीं एका इंग्रजी पुस्तकांत ग्रथित केलेला आहे आणि त्याचा सविस्तर अनुवाद भागवतांच्याकडून करून घेतला आहे. गिबनवर श्रीमंत महाराजांची विशेष भक्ति आहे असें दिसतें. ती या विद्वानांच्या दुकलींतून एकाकडून अंशतः तरी पुरी करून घेतां आली याबद्दल श्रीमंतांस खचित समाधान वाटत असेल.

घराण्यांचे इतिहास

सरकारी कामकाजाच्या निमित्तानें व क्वचित् हौशीनें जुन्या ऐतिहासिक घराण्यांतून कोठें कोठें घराण्यांच्या इतिहासाच्या कैफियती, बहुधा इंग्रजींत लिहिलेल्या आढळून येतात. जोशी बारामतकर, गोपाळ संभाजी खांडेकर किंवा बडोदेकर शास्त्री पटवर्धन यांचीं उदाहरणें या प्रकरणीं देतां येतील. या कैफियती बहुधा चोपडेवजाच आहेत. शास्त्री पटवर्धन यांच्या घराण्याच्या इतिहासाचें छोटेंसें इंग्रजी पुस्तकच आहे. पुष्कळ घराण्यांचीं स्वतंत्र मराठी पुस्तकेंहि आहेत. हैद्राबादचे सुप्रसिद्ध राजे रायरायान् यांच्या घराण्याचा एक छोटा मराठी इतिहास 'इतिहासादर्श' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहे. शेंदुर्णीकर पाटणकर दीक्षित यांचे कांहीं कागद व कैफियत मराठींत छापलेली आहे. अलीकडे या घराण्यांतील श्रीमंत सरदार गंगाधर यज्ञेश्वर दीक्षित जहागिरदार यांनीं, आपल्या कुलांतील मुख्य पुरुष, पेशव्यांना गुरुस्थानीं असलेले नारायण दीक्षित, यांचें चरित्र छापिलें आहे. खरें पाहिलें असतां देशाचा मोठा इतिहास तयार करण्यापूर्वी देशांतील जितक्या घराण्यांचा तपशीलवार इतिहास उपलब्ध होईल तितकें तें मोठ्या इतिहासकाराला फायदेशीर असतें. आवश्यक बाबींचे—व्यक्ति, स्थल आणि प्रसंग यांविषयींचे—साधार उल्लेख अशा घराण्यांच्या इतिहासाच्या द्वारें उपलब्ध होतात.

कुलपरंपरा, कुलाचार, देशाचार, वैयक्तिक आणि सामाजिक जीवन म्हणजे खाणें, पिणें, लेणें, देणें, घेणें इत्यादिविषयीं तपशीलवार माहिती घरगुती हिशोबांतून गोळा करतां येते. राष्ट्राच्या दौलतीचा हिशोब आणि समाजांतील निरनिराळ्या थरांतील लहानमोठ्या घराण्यांचे हिशोब हे दोन्हीहि खऱ्या आणि व्यापक इतिहासाच्या रचनेस अभ्यासकास साहाय्यभूत होत असतात. केवळ सरकारी कामकाजानिमित्त किंवा भाऊबंदकीच्या प्रसंगांमुळें लोकांचें लक्ष घरांतील गळाठे चाळून अनुकूल पुराव्याकडे जातें. किंबहुना असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं, अभिमानापेक्षां आशेमुळेंच कागदपत्रांचीं पोतीं अथवा रुमाल घराच्या अडगळींतून सांठवून ठेविलेले असतात. अभ्यासाची दृष्टी फारच विरळा सांपडते. अशा स्थितींतहि कोठें कोठें कांहीं घराण्यांत कित्येक अभ्यासी, अभिमानी आणि परिश्रमी असे बुद्धिमान् आणि दक्ष गृहस्थ आढळून येतात कीं, जे आपल्या घराण्याचीं कागदपत्रें फेरिस्तवार व्यवस्थेनें लावून, तपासून, नकलून किंवा सारांश लिहून ठेवितात; आणि कित्येक त्यांच्या आधारें व्यवस्थित असा वृत्तान्तहि सजवून तयार करितात. असे तयार इतिहास अजूनहि पुष्कळ शोधावयाचे आहेत.

वाड, मावजी आणि पारसनीस यांच्या प्रयत्नांमुळें पेशवे दप्तरांतील जी माहिती प्रसिद्ध झाली तींत वतनपत्रें व निवाडे, तहनामे व करार आणि सनदापत्रें असे तीन खंड घराण्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें उपयुक्त असे प्रसिद्ध झाले आहेत. अलीकडे निघालेल्या पेशवे दप्तराच्या खंडांत घराण्यांच्या इतिहासाचाहि एक खंड निघालेला आहे. राजवाड्यांनींहि शिवकालीन इतिहासाच्या शोधाची तयारी सरकारी दप्तरखान्याच्या अभावीं खाजगी घराण्यांतील कागदपत्रें तपासून, 'शिवकालीन घराणीं' या नांवानें त्यांचे घराणेंवार खंड छापूनच केली आणि अद्यापिहि भारत-इतिहास-संशोधक-मंडळाकडून तें काम चालू आहे.

घराण्यांच्या इतिहासाच्या संबंधांत एका गृहस्थाचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे; आणि ते म्हणजे कै. गोविंद विनायक आपटे हे होत. विशेष शिक्षण किंवा अंगीं विद्या नसतांना आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत या गृहस्थानें घराण्यांचे

इतिहास तयार करण्याचा उद्योग आरंभिला. येथें उद्योग हा शब्द दुहेरी अर्थानें वापरला आहे. म्हणजे त्यांत धंद्याचाहि अंतर्भाव होतो. हा अत्यंत उपयुक्त व कांहीं अंशीं स्वतंत्र असा धंदा रा. आपटे यांच्या बाणेदार व सरदारी थाटाला शोभण्यासारखा होता. एकेक घराणें घेऊन त्यांतील विद्यमान व्यक्तींस भेटून त्यांच्यामार्फत त्या घराण्याच्या निरनिराळ्या शाखांचा तपास लावून, त्यांचीं वेटें आणि बुडें शोधून काढून, कागदपत्रांचाहि त्यांच्या व आपल्या समजुतीप्रमाणें आधार घेऊन, चित्रें, फोटो वगैरे मिळवून, जातीनें गांवोगांव जाऊन तपास करून, छपाईचा व आपल्या उदरनिर्वाहाचा भार त्या त्या घराण्यांतील विस्तारलेल्या शाखापल्लवांवर टाकून रा. आपटे यांनीं आपलें काम केलें. प्रथम त्यांनीं आपटे घराण्याचा इतिहास छापला. नंतर बर्वे घराण्याचा छापला. आणि नंतर गोखले-रास्ते घराण्याचा छापला. फडके घराण्याला त्यांनीं सुरुवात केली होती तोंच दुर्दैवानें त्यांचा अंत झाला. आपटे ह्यांनीं पाडलेली प्रथा सांप्रत तरी खंडित झाली आहे. एखाद्या उत्साही संशोधकानें आपटे यांचा हा व्यवसाय अवश्य पुढें चालविण्यासारखा आहे. रा. आपटे ह्यांच्यासारख्यापेक्षां एखाद्या शास्त्रीय ज्ञानसंपन्न इतिहासवेत्त्या पुरुषानें जर हें काम हातीं घेतलें तर तें अतिशय उच्च प्रतीचें व सार्वराष्ट्रीय इतिहासकारास मार्गदर्शक असें होईल. असें काम 'मुधोळकर घोरपड्यांचा इतिहास' या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाचे संपादक विद्वद्वर्य दत्तोपंत आपटे यांनीं केलें आहे. त्याचा अधिक विचार अन्यत्र केला आहे.

संस्थानांचे इतिहास

बहुतेक संस्थानांनीं इंग्रजी सरकारास पेश करण्याकरितां व जिज्ञासु युरोपियन पाहुण्यांच्या समाधानाकरितां आपले इतिहास इंग्रजींतून प्रसिद्ध करविले आहेत. खऱ्याखुऱ्या इतिहाससंशोधकाला आश्रय देऊन आणि त्याचें साहाय्य मिळवून शास्त्रीय दृष्टीनें लिहविलेले ग्रंथ या वर्गांतहि फारसे सांपडत नाहींत. संस्थानांच्या कुवतीप्रमाणें पदरीं असलेल्या विद्वानांच्या साहाय्यानें या वर्गांतील बहुतेक ग्रंथ तयार करविलेले आहेत. घराण्यांचे काय किंवा संस्थानांचे काय आजवर तयार झालेले हे इतिहास असावे तसे शास्त्रीय नसल्यामुळें हें सर्वच काम पुन्हां एकवार

करावें लागेल. असें आहे तथापि कित्येक स्वतः सुविद्य व जाणिक असलेल्या संस्थानाधिपतींनीं या विषयांतहि आदर्शवत् कामगिरी केली आहे. औंध संस्थानचे विद्वान् अधिपति श्रीमंत बाळासाहेब पंडित प्रतिनिधी यांनीं आकारानें लहान परंतु परंपरेच्या अधिकारानें उच्च असलेल्या अशा आपल्या संस्थानाचा आणि तद्द्वारां प्रतिनिधी घराण्याचा सुविस्तृत, साधार व विवेचक असा इतिहास अनेक खंडांत प्रसिद्ध केला आहे. छत्रपतींच्या घराण्याच्या खालोखाल प्रतिनिधींच्या घराण्याचा मान आहे. यामुळें या इतिहासाचें महत्त्व विशेष आहे. तो करवितांना त्याचे लेखक पंतांचे आश्रित रा. वामन परशराम मेहेंदळे यांजला योग्य प्रकारचें मार्गदर्शन श्रीमंतांनीं जातीनें व तज्ज्ञांकडून करविलें आहे. स्वतः श्रीमंत यांनीं मराठ्यांचा इतिहास प्रेमानें व आस्थेनें अभ्यासिला आहे. यामुळें एकंदरींत हें काम पुष्कळ चांगलें उतरलें आहे. इतरांना त्यापासून चांगलें उदाहरण घेतां येण्यासारखें आहे. सांगली संस्थानचे अधिपति हिज हायनेस श्रीमंत राजे आप्पासाहेब सांगलीकर यांनीं कै. रा. ब. पारसनीस यांच्या इतिहास-संशोधनाच्या कार्याला अत्यंत मनोभावें पाठिंबा दिला होता, व पुष्कळ पैसाहि खर्च केला होता. परंतु सांगली संस्थानाचा आम्ही अपेक्षितों असा इतिहास अद्यापि प्रसिद्ध झाला नाहीं! सांगली, मिरज, मळा, जमखंडी, कुरुंदवाड, तासगांव वगैरे सर्व पटवर्धन मंडळींच्या जहागिरींचा व संस्थानांचा मिळून लिहिलेला इतिहास फारच स्फूर्तिदायक, बोधप्रद व वाचनीय होईल. कै. खरे शास्त्र्यांसारखा खंदा इतिहासवीर कित्येक तपें पदरीं असूनहि इष्ट गोष्ट घडून आली नाहीं, हें महाराष्ट्राच्या इतिहासाचें दुर्दैव समजलें पाहिजे! पटवर्धन मंडळींचें मूळचें यजमान घराणें म्हणजे इचलकरंजी संस्थानचे विद्वान् अधिपति श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांचें घराणें. यांनीं मात्र वासुदेवशास्त्री खरे यांच्या करवीं इचलकरंजी संस्थानचा एक उत्कृष्ट इतिहास तयार करवून प्रसिद्ध केला आहे.

भोसल्यांपैकीं सातारचे छत्रपती आतां नांवाचेच राजे आहेत, तरी देखील आपल्या घराण्याचा इतिहास प्रसिद्ध करण्याइतकी ऐपत त्यांना आहे. परंतु त्या-ऐवजीं आपल्याजवळील इतिहासाचीं साधनें मावजी शेट सारख्यांस त्यांनीं विकण्याची

परिस्थिति निर्माण व्हावी हें पाहून मन घटकाभर विषण्ण झाल्यावांचून राहत नाहीं. भोंसल्यांची दुसरी शाखा नागपूरची. सातान्याप्रमाणेंच नागपूरचीहि कथा ऊर्फ रडकथा आहे. तेथेंहि नांवाचे भोंसले राजे आहेत. अजूनहि वाडेहुडे, बागा, मळे, गांवें, जहागिन्या त्यांच्याकडे आहेत आणि जुन्या वैभवाची साक्ष देत आहेत. सातारकरांकडे प्रतापगडची भवानी आहे तर नागपूरकरांकडे रामटेकचा रामचंद्र आहे. नागपूरकरांजवळील बहुमोल पाचूच्या रामाच्या मूर्ती कलकत्याच्या बाजारांत मांडल्या जाव्या, असा बनाव नागपूरकरांच्या दैवानें घडवून आणिला! होणाराला असला तरी झालेल्यास मात्र खचित उपाय नाहीं असें म्हणण्याशिवाय आपणांस येथें काय करतां येईल? भोंसल्यांची तिसरी शाखा तंजावरची. तेथेंहि तोच प्रकार. ईश्वरकृपेनें भोंसल्यांच्या विद्याविलासाची भरपूर साक्ष देणारा असा तो प्रचंड सरस्वतीमहाल तंजावरास शाबूत असून त्यांतील हजारों ग्रंथ विद्वानांचे धन्यवाद आजहि घेत आहेत. भोंसल्यांची चौथी शाखा म्हणजे कोल्हापूरचे छत्रपती. हें संस्थान अद्यापि कायम असून छत्रपतींची बिरुदावली मिरवीत आहे. या चारी शाखांत इतिहाससंबंधानें जवळजवळ अंधार आहे, म्हटलें तरी चालेल. 'ग्रंथमाले' च्या द्वारें राजवाड्यांनीं केलेला उद्योग कोल्हापुरास झाला. तंजावरच्या ग्रंथालयाची ओळख राजवाडे यांनीं महाराष्ट्रास पहिल्यानें करून दिली. सातान्यांतील बादशाही फर्मानें धुळयाच्या 'प्रभातां'त प्रसिद्ध झालीं. हींहि राजवाड्यांनींच प्रसिद्ध केलीं. भोंसल्यांची जर ही कथा तर करवीर व सातारा येथील राजमान्यांची काय स्थिति असेल हें सांगावयास नको! प्रतिनिधींचा अपवाद मागें सांगितलाच. बावड्याच्या अमात्यांचा छोटासा इतिहास लिहिलेला आहे. तसा मग खुद्द करवीराचा इतिहास कै. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं लिहिलेला प्रसिद्ध आहे आणि तो बराच मोठाहि आहे. शेंडगांवकर भोंसल्यांची एक बखर कै. भावे यांनीं प्रसिद्ध केली आहे.

भोर, फलटण, औंध वगैरे संस्थानांतून संस्थानांचे इतिहास लिहीत फिरणारे व नुकतेच कालवश झालेले कै. अनंत नारायण भागवत यांची आठवण केल्यावांचून

हा विभाग पुरा होणार नाहीं. कै. भागवत यांची प्रथम इच्छा पारसनिसांच्या मागोमाग पेशवे दप्तरांत शिरावें अशी होती. परंतु सरकारानें त्यांचा प्रवेश तेथें होऊं दिला नाहीं. तथापि चिकाटी न सोडतां रा. भागवत यांनीं वर लिहिलेल्या संस्थानांतून इतिहासलेखनाचें काम वरील दरबारांच्या आश्रयानें करण्याचा उद्योग केला व आपल्या शक्तीप्रमाणें कित्येक इतिहास त्यांनीं पुरे केले. भोर संस्थानचा असा इतिहास छापून झालेला आहे, परंतु तो आतां तितकासा उपयोगी पडणार नाहीं ! रा. भागवत यांना अखेरीस इंदुरास नोकरी मिळून आपला इतिहासाचा आवडता व्यवसाय स्वतःच्याच बळावर करावा लागला. 'भवानी बक्षी यांची रोजनिशी' वगैरे बरेंच उपयुक्त साहित्य 'होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें' या मालेंतून भागवत यांनीं प्रसिद्ध केलें आहे. इंदुरास बिलायतेहून कांहीं कागदपत्रांच्या नकलाहि दरबारानें श्री. सर तुकोजीरावांच्या वेळीं आणून ठेविल्या आहेत. परंतु आतां ते कागद पुसट होत चालले आहेत व लवकरच त्यांची नीट व्यवस्था न झाल्यास ते निकामी होतील अशी भीति वाटते असें आम्हांस समजतें. इंदूरदरबारनें इकडे त्वरित लक्ष पोंचवावें व दरबारचें कार्यक्षम असें इतिहासखातेंच स्थापन करून योग्य दिशेनें आपल्या वांट्याचा कार्यभाग उरकावा.

धार संस्थानांत वयोवृद्ध लेले मास्तर यांना संस्थानानें आश्रय देऊन त्यांच्या श्रमाचें चीज केलें आहे. काशिनाथपंतांनीं कै. ओक यांच्या साहाय्यानें संस्थानच्या इतिहासाचा एक खंड छापून प्रसिद्ध केला आहे व त्यांत पेशवे दप्तरांतील माहिती, धार दप्तरांतील माहिती व इतर ठिकाणची माहिती यांचा समावेश केला आहे. लेले यांचें काम व धारचें इतिहासखातें हीं दोन्हीहि पुढें चालू आहेत, ही फार समाधानाची गोष्ट आहे.

ग्वाल्हेरीचें शिंद्यांचें राज्य हें हल्लींच्या सर्व मराठी संस्थानिकांत श्रीमंत आहे. परंतु इतिहासाकडे या संस्थाननें ऐपतीच्या मानानें कांहींच लक्ष पुरविलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. अलीकडे कांहीं हालचाल दरबारनें सुरू केली असून श्रीमन्महाराज बालराजे शिंदे यांच्या हातीं अधिकार आल्यावर वाटत असलेली ही वरील

उणीव दूर होईल अशी बळकट आशा आम्ही बाळगतों. ग्वाल्हेरीस कै. श्रीमन्माधवराव महाराज शिंदे यांनीं कै. पारसनीस यांच्याकडून पांच खंड छापून घेतले होते ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. नांवाजण्यासारखा असा एक खाजगी प्रयत्नहि ग्वाल्हेरीस चालू आहे व तो म्हटला म्हणजे ग्वाल्हेरचे इतिहासभक्त सरदार श्रीमंत आनंदराव भाऊसाहेब फाळके यांचा होय. कोटा येथें गुळगुळे घराण्यांत कागदपत्रांचा मोठा संग्रह आहे. त्यांतील कागदपत्र व अन्यत्र मिळालेले कागदपत्र शोधून व निवडून व त्यांवर योग्य प्रकारचे संपादकीय संस्कार करून श्रीमंत फाळके यांनीं आतांपर्यंत तीन साधनग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. भारत-इतिहास-संशोधक-मंडळामार्फत रा. दि. वि. काळे यांस बोलावून नेऊन ग्वाल्हेर दरबारनें गोरखींतील आपला पोथीखाना लावून घेतला आणि दप्तरखात्यामार्फत जुने कागद जमविण्याचा उपक्रमहि केला आहे. ग्वाल्हेर संस्थानचे एक पिढीजाद सेवक आणि खंडेराव हरींचे वंशज श्रीयुत भास्कर रामचंद्र भालेराव यांनीं सुमारें १०।२० वर्षांत माळवा प्रांतांत पोथ्यापत्रें जमविण्याचा कांहीं उद्योग केला आहे व पुष्कळ महत्त्वाची सामग्रीहि जमा केली आहे. परंतु स्फुट लेखांतून त्या सामग्रीचा परिचय करून देण्यापलीकडे आणि 'माधव-विलास' वगैरे एक दोन पुस्तकें प्रसिद्ध करण्यापलीकडे रा. भालेराव यांनीं पुढें मजल मारली नाहीं आणि दरबारमार्फत इतिहासखातें चालू करण्याची त्यांची कल्पनाहि सिद्धीला गेली नाहीं. या दोन्ही गोष्टी होऊं नये अशा झाल्या, परंतु आम्हाला उमेद आहे कीं, रा. भालेराव हे आपल्याजवळील संग्रहाच्या संरक्षणाची व प्रकाशनाची यथोचित व्यवस्था करण्यास दिरंगाई करणार नाहींत.

उत्तरेकडील विषय चाललाच आहे, तेव्हां त्या विषयासंबंधानें झालेल्या आणखी कांहीं प्रयत्नांचा परामर्ष येथेंच घेऊं. रा. मुरलीधर मल्हार अत्रे यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी (१८९२) मल्हारराव होळकरांचें एक छोटेंसें चरित्र प्रसिद्ध केलें होतें. दुसरें, इंदुरास मुंतझीमबहादुर कै. मुकुंद वामन बरवे यांनीं इंग्रजीमध्यें बरींच चरित्रें प्रसिद्ध केलीं आहेत. प्रमाणग्रंथ या नात्यानें या चरित्रांची मातब्बरी तज्ज्ञ लेखकाच्या कृतीच्या बरोबरीची ठरणार नाहीं. परंतु एक सुबुद्ध, विद्वान् व हौशी लेखक या नात्यानेंच

मुकुंदरावजी आपला उद्योग करीत असत. तुकोजीराव होळकर, मराठे आणि मोंगल, अहिल्याबाई होळकर, दुसरे तुकोजीराव होळकर व शाहूचरित्र इत्यादि पुस्तकें त्यांनीं इंग्रजीमध्यें प्रसिद्ध केलीं आहेत. यांतील दुसरे तुकोजीराव यांचें विस्तृत चरित्र बरेंच वाचनीय झालें आहे.

उत्तरेकडील व दक्षिणेकडील दोन्ही संस्थानांच्या सेवेंत राहण्याचा योग येऊन जुन्या पिढींतील ज्या कित्येक व्यासंगी लेखकांनीं ग्रंथरूपानें आपल्या व्यासंगाचीं फळें आपल्या देशबांधवांस सादर करण्याचें व्रत अखंडपणें चालविलें होतें अशा लेखकांत कै. माधव व्यंकटेश लेले यांचें नांव आदरपूर्वक घ्यावें लागेल. ऐने अकबरीचें मराठी भाषांतर आणि रॉबर्ट् सेवेल् याच्या विजयानगराबरील इतिहास-ग्रंथाचें 'एक नष्टस्मृति साम्राज्य' या नांवाचें भाषांतर आणि Rulers of India मालेंतील ग्रंथाच्या आधारें बक्षिसार्थ लिहिलेलें एक 'अकबर बादशहाचें चरित्र' असे तीन ऐतिहासिक ग्रंथ माधवरावांच्या[1] नांवावर मोडतात. या तीन्ही विषयांवर नवे विस्तृत ग्रंथ होणें अत्यंत आवश्यक आहे, परंतु ते होईपावेतों निवळ मराठी वाचकांस माधवरावजींच्या ग्रंथांवांचून आपली जिज्ञासा भागविण्यास दुसरें कांहींहि साधन नाहीं.

सर्व संस्थानी इतिहासांत मुधोळचे राजे नानासाहेब घोरपडे यांनीं आपल्या घराण्याचें जें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे तें अग्रस्थानीं शोभतें. भोंसले-घोरपड्यांचे त्यांतील कागदपत्र सर्व दृष्टींनीं अपूर्व आहेत. कारण त्यायोगें भोंसल्यांचें क्षत्रियत्व आणि शिसोदिये वंशाशीं संबंध हीं निःसंशय रीतीनें सिद्ध होत आहेत. मूळ कागदपत्रें हीं अशीं महत्त्वाचीं आणि त्या सुवर्णकणांचा अलंकार बनविणारा कारागीरहि आपल्या कामांत अत्यंत कसबी असा भाग्याचा योग श्रीमंत नानासाहेब राजे मुधोळकर यांनीं साधला आहे. आपल्याजवळील बहुमोल कागदपत्रांच्या संपादनासाठीं योग्य तज्ज्ञ मिळविण्यांत नानासाहेबांनीं पुष्कळ वर्षे खर्च केलीं आणि अखेरीस भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील सुप्रसिद्ध संशोधक दत्तोपंत आपटे यांच्याकडे तें काम सोंपविलें.

---

१. राजतरंगिणीचें एक मराठी भाषांतरहि त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

सविस्तर टीपालेखन, समतोल आणि विद्वत्तापूर्ण विवेचन आणि शास्त्रीय चिकित्सा हे उच्च दर्जाचे संपादकीय गुण आपटे यांनीं केलेल्या व करविलेल्या परिष्कारांत दिसून येतात. ग्रंथांत दिलेलीं चित्रें मुळांत रंगित असावीं असें वाटतें आणि त्यांच्या रंगित प्रतिकृति ग्रंथांत शोभून दिसल्या असत्या. परंतु तसा योग या पुस्तकाला लाभला नाहीं. तथापि आपल्या अंगच्या अपूर्व गुणांमुळेंच हें पुस्तक मराठी इतिहासग्रंथांत मौल्यवान् होऊन बसलें आहे आणि तें प्रसिद्ध करण्याचा योग आणल्याबद्दल श्रीमंत नानासाहेब हे धन्यवादास पात्र आहेत.

फलटणचें निंबाळकर घराणें फार प्राचीन आहे. 'वाठारकर घराण्याचा इतिहास' हा या घराण्याच्या एका शाखेचा त्रोटक इतिहास भा. इ. सं. मं. मालेंत छापलेला आहे. परंतु हल्लींच्या फलटण संस्थानचा विस्तृत असा इतिहास कागदपत्रांच्या साहाय्यानें प्रसिद्ध होणें अवश्य आहे. श्रीमंत नानासाहेब नाईक निंबाळकर हे या कामीं लक्ष घालीत असून थोड्याच वर्षांत ही उणीव फलटणकर भरून काढतील अशी उमेद आहे.

सोंडूर, गुत्ती, अक्कलकोट, जत, जंजिरा, जव्हार वगैरे अनेक लहानमोठ्या संस्थानांचे विस्तृत इतिहास तयार व्हावयास पाहिजेत. रा. दिमोटे यांनीं जव्हारबद्दल एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे आणि अलीकडे फलटण संस्थानचाहि लहान इतिहास रा. पतके यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. भागानगर-हैद्राबादसारख्या मोठया संस्थानांत अद्याप या विषयाकडे जावें तसें लक्ष गेलें नाहीं. मात्र दप्तरखाना लावण्याचें काम तेथें चालू झालें आहे. हा दप्तरखाना पुण्यांतील पेशव्यांच्या दप्तरखान्याएवढा प्रचंड आहे. यांत कित्येक कोटी कागद सांपडतील. हा आम्हीं समक्ष पाहिलेला आहे आणि याचे आस्थेवाईक अधिकारी मेहेरबान सय्यद खुर्शेद अली हे काळजीनें याची जोपासना करीत आहेत. हा दप्तरखाना लावून त्यांतील निवडक कागद प्रसिद्ध झाल्याशिवाय निदान निजामी महाराष्ट्राचा तरी इतिहास यथार्थपणें लिहिणें अशक्य आहे. एवढें या प्रचंड संग्रहाचें महत्त्व आहे. अर्थात् यांत फारसी कागद भरपूर आहेत.

जतच्या डफळे घराण्याचा एक लहानसा इतिहास आमच्या वाचनांत आहे; मोठा इतिहास अदिलशाहीपासूनचा तयार करतां येण्यासारखा आहे. सावंतवाडी संस्थानचा एक सुबोध व सरळ इतिहास रा. पिंगुळकर यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी (१९११) लिहून प्रसिद्ध केला आहे. अलीकडे रावबहादुर वासुदेवराव बांबर्डेकर यांनीं या घराण्याच्या इतिहासाबद्दल एक नवा सिद्धान्त ज्यांत प्रतिपादला आहे असा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे, आणि पिंगुळकर यांचा इतिहास चुकला आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथाचें नांव ' मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत घराणें ' असें आहे व तो भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कृत मालेंत समाविष्ट झालेला आहे. मुंबईचे रा. वालावलकर यांनीं रा. ब. बांबर्डेकरांचें म्हणणें अमान्य करून आपली एक रचना सांगणारा ग्रंथ भा. इ. सं. मंडळाच्याच पुरस्कृत मालेंत प्रसिद्ध केला आहे. असा हा वाद पडला आहे व तो अधिक विश्वसनीय साधनें हातीं येतील तरच तुटेल, एरवीं नाहीं. विंचूरकर घराण्याचा एक इतिहास बऱ्यापैकीं असा रा. गाडगीळ यांनीं लिहिलेला प्रसिद्ध झालेला आहे. आतां त्यांत बरीच भर घालून चांगला नवा इतिहास सहज तयार करतां येईल.

दौलती दप्तरें

हैद्राबाद (दक्षिण) प्रमाणेंच 'पूर्तकाल' सरकारचें दप्तरहि ऐतिहासिक दृष्टीनें फार मोठें व महत्त्वाचें आहे. त्यांतहि कागदपत्रांचीं सुमारें अठ्ठावीस हजार बांधीव पुस्तकें असून अदिलशाहीपासूनचीं कागदपत्रें, तहनामे, बातमीपत्रें वगैरे शेंकडों बाबी त्यांत आहेत. मोठ्या अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे कीं, पणजीचे गव्हर्नर यांनीं दप्तरखाना सुधारण्याचे कामीं लक्ष देऊन प्रोफेसर पांडुरंग सखाराम पिसुर्लेंकर या महाराष्ट्रीय तरुण विद्वानाची दप्तरखान्यावर नेमणूक केली आहे. प्रो. पिसुर्लेंकर यांनीं पोर्तुगीज भाषेंतील साधनांचा उत्तम अभ्यास करून शिवाजी, संभाजी, थोरले बाजीराव इत्यादिकांसंबंधानें पोर्तुगीज भाषेंत निबंध व माहिती प्रसिद्ध केली आहे. माहितीच्या व महत्त्वाच्या दृष्टीनें हे निबंध आणि हें साहित्य अत्यंत आदरणीय आहे. पेशवे-दप्तर, निजामी दप्तर आणि पणजी दप्तर इत्यादि दौलती दप्तरें तसेंच

पुरंदरे दप्तर, पटवर्धन दप्तर, गुळगुळे दप्तर इत्यादि खाजगी दप्तरें हीं सर्व दप्तरें योग्य रीतीनें परामर्षिलीं जातील तेव्हांच पेशवाईच्या उत्तरकालाचा इतिहास बऱ्याच चांगल्या रीतीनें सजवितां येईल. ही सामुग्री अफाट आहे आणि तसाच तो इतिहासहि मोठा विस्तृतच होईल.

जातीय इतिहास

यानंतर जातीय इतिहासाकडे वळूं. हिंदुस्थानदेश हा जातीय देश म्हणून असाधारण लक्षणानें वर्णिला जातो. भविष्यकाळामध्यें कांहींहि होवो, पण इतिहासकाराला भूतकाल सोडतां येत नसल्यामुळें आणि भूतकाळांत जाति ह्या सर्वप्रभावी असल्यामुळें त्यांचा इतिहास यथातथ्य समजावून घेणें आणि समजावून देणें हें इतिहासकाराचें आवश्यक कर्तव्य आहे. जातिबद्ध रचनेपासून हिंदुस्थानचें कल्याण झालें असें इतिहासकाराचें मत होवो किंवा जाती ह्याच त्याच्या अवनतीस कारण झाल्या असें उलट मत असो, जातीचा अभ्यास निर्मत्सर बुद्धीनें करणें दोघांसहि आवश्यक आहे. असें असून, जातीचें जणूं कांहीं बाळकडूच येथल्या लोकांना असतांनाहि, इतिहासदृष्टीच नसल्यामुळें या जिव्हाळ्याच्या विषयाचा अभ्यास अद्यापपर्यंत आमच्याकडे जन्मास आला नाहीं असें जरी म्हणतां येत नाहीं तरी आहे तो अगदीं प्राथमिक व बाल्यावस्थेंत आहे, असें म्हणावें लागतें. जातींचा इतिहास असा शब्द उच्चारतांच कित्येक जातपाततोडक 'बस करा', 'पुरे झालें' म्हणून खवळून उठतील यांत कांहीं शंका नाहीं. नुसत्याच न पाहण्यानें असल्या जाती नाहींशा थोड्याच होतात! रोग्यानें मला कांहींच झालें नाहीं असें मानणें आणि झालेल्या रोगाकडे दुर्लक्ष्य करणें हें जितकें अपायकारक आहे तितकेंच फारसें कांहीं होत नसतांना मला कांहीं तरी असाध्य रोग झाला आहे अशी भावना धरणें हेंहि अपायकारक आहे. तात्पर्य, जातींच्या प्रश्नाला हिंदुस्थानच्या इतिहासकारास डावलून जातां येणार नाहीं. त्याची यथातथ्य परीक्षा करून त्यांतून निघणारीं सत्य प्रमेयें विचारांत घेऊन आपला पुढला मार्ग ठरविला पाहिजे.

जातींच्या जटिल प्रश्नासंबंधानें विशेष विचारपूर्वक लिहिलेलें असें वाङ्मय

अलीकडेच निघूं लागलें आहे. जातींवरील लेखकांत डॉ. केतकर हे प्रमुख आहेत. निरनिराळ्या जातींपोटजातींच्या संघटणा करणारे हिंदु, ब्राह्मण, ब्राह्मणेतर, ज्यू, पारशी वगैरे समाज ज्या खटपटी हल्लीं करीत आहेत त्यांमुळें पूर्वग्रहदूषित असें जरी असलें तरी बरेंचसें जातीय वाङ्मय तयार होत आहे. परंतु शास्त्रीय पद्धतीनें शोध मांडणी करून माहिती देणारें वाङ्मय थोडेंच आहे. निरनिराळ्या जातींच्या व उपजातींसंबंधाच्या ग्रंथांतील इतिहासप्रकरणांत बहुधा कोठल्या तरी पौराणिक आख्यायिका, कांहीं भाकडकथा, थोड्या फार परंपरागत चालत आलेल्या आख्यायिका आणि क्वचित अलीकडील दोनचारशें वर्षांतील अस्सल नक्कल कांहीं चारदोन कागद यांचा समावेश केलेला असतो. अधिक माहिती उपलब्ध नाहीं, याचा दोष एकट्या संपादकांच्याकडे येत नाहीं. परंतु जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढीहि काळजीपूर्वक पाहून, तपासून, निःपक्षपातीपणानें पारखून न दिल्याचा दोष पुष्कळ संपादकांना घेणें भाग आहे. जातिविषयक इतिहास शोधणें व तयार करणें या कामाला संपादक विशेष तयारीचा व लायकीचा असला पाहिजे. त्या तयारीचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु थॅर्स्टन् किंवा एन्थोवेन् किंवा रिसले यांचे जे इंग्रजी ग्रंथ पाहण्यांत येतात त्यांवरून या तयारीची कल्पना सहज येईल. आम्हीं उल्लेखिलेले हे इंग्रजी ग्रंथ सरळ मराठींत आणले तरीहि जातीय इतिहासाबाबत मोठी कामगिरी होईल आणि ज्ञानकोश, शब्दकोश, चरित्रकोश मंडळ यांसारख्या एकाद्या मंडळाची स्थापना करून हें काम कोणीं जाणत्यांनीं अंगावर घेतल्यास जातिविषयक प्रश्नांसंबंधाच्या कल्पनेच्या आणि पूर्वग्रहांच्या निबडुंगांतून इतिहासाच्या आणि वास्तवतेच्या पुष्पोद्यानांत आपण येऊं.

शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण, पळशे ब्राह्मण, भट्टप्रभू ब्राम्हण, देवरुखे ब्राम्हण, दैवज्ञ ब्राह्मण, सोमवंशीय आर्य क्षत्रिय, चांद्रसेनीय कायस्थ प्रभु, कुमावत क्षत्रिय, सहवासी ब्राह्मण, लेवापाटीदार इत्यादि लहानमोठ्या अनेक जातीपोटजातींच्या इतिहास-पुस्तकांतून इतिहाससंशोधकाला थोडीफार माहिती मिळण्यासारखी आहे. शहाण्णव कुळीच्या क्षत्रियांसंबंधानें ‘ क्षत्रियसमाजोन्नतिदर्पण ’ इत्यादि प्रकारचे ग्रंथहि पाहण्यांत

येतात. रा. तारकुंडे यांनीं ब्राह्मण व क्षत्रिय ऐतिहासिक घराण्यांसंबंधीं कांहीं छोटीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. 'मराठा कुळांच्या कैफियती' जमा करून तो इतिहास तीन भागांत रा. गोपाळ दाजीबा दळवी यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी (१९१२) प्रसिद्ध केला होता. डॉ. केतकर यांच्या ज्ञानकोशांत जातींविषयीं बरीच माहिती आली असून त्यांनीं व इतर अनेक लेखकांनीं जातीय प्रश्नांची चर्चा केली आहे. रा. श्री. म. माटे व रा. दिवेकर शास्त्री यांनीं अलीकडे आपल्या समाजसेवेच्या अभ्यासाच्या निमित्तानें कांहीं छोटीं पुस्तकें व लेख प्रसिद्ध केले आहेत. माहितीच्या व मांडणीच्या दृष्टीनें अस्पृश्यांच्या प्रश्नावरील रा. माटे व रा. विठ्ठल रामजी शिंदे यांचे अलीकडे प्रसिद्ध झालेले दोन ग्रंथ उपयुक्त आहेत. परंतु रावसाहेब चापेकर यांनीं लिहिलेल्या 'आमचा गांव ऊर्फ बदलापूर' या अपूर्व ग्रंथांत गांवांतील अनेक जातींची जी पाहणी केली आहे तींत जातींच्याविषयीं पुष्कळ विविध प्रकारची माहिती व्यापक दृष्टीनें संग्रहित केलेली आहे. डॉ. घुर्ये व श्रीयुत करंदीकर इत्यादि महाराष्ट्रीय विद्वानांनीं अलीकडे जातीय प्रश्नाच्या उपयोगीं पडणारीं महत्त्वाचीं पुस्तकें इंग्रजींत प्रसिद्ध केलीं आहेत. स्वकुलसाळी, नामदेव शिंपी, भावसार क्षत्रिय, सांवतामाळी, अशा प्रकारच्या संघटित समाजांसाठीं किंवा पोटसमाजांसाठीं कांहीं मासिकें निघत असतात. त्यांतहि ऐतिहासिक विभाग अलीकडे थोडथोडे येऊं लागले आहेत. त्यांचें स्वरूप साहजिकच अगदीं प्राथमिक असें आहे. राजवाडे यांनींहि जातिविषयक शोधाचे बरेच प्रयत्न केले होते. ठेंगे मत, गोत्रोत्पत्तिविचार, इत्यादि विषयांवर भारत-इतिहास-संशोधक-मंडळांत त्यांनीं महत्त्वाचे निबंध वाचले होते. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या मार्फत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत जातिविषयक इतिहासाला उपयोगी असे कित्येक कागद आहेत. पेशवे दप्तरांत छापलेल्या खंडांतहि या विषयाची बरीच उपयोगी माहिती आढळून येते. कऱ्हाडचे धर्माधिकारी गिजरे यांच्याकडील कागद, राजवाडे व धुळ्याचे रा. भट यांनीं शोधून आणिलेले, कांहीं प्रसिद्ध केले आहेत व कांहीं प्रसिद्ध होत आहेत. जातगंगेनें केलेले शेंकडों निवाडे शोधाअंतीं मिळतील ते जमवून शंकराचार्यादिकांचीं व धर्माधिकाऱ्यांचीं दप्तरें पाहून

एतद्विषयक बरीच सामग्री मिळेल. परंतु तो पुढला प्रश्न आहे. काय झालें एवढेंच आपण येथें पाहत आहोंत. आणि फारच थोडें काम–शास्त्रीय दृष्टीनें पाहतां–झालें आहे, एवढा निष्कर्ष नमूद करण्यास हरकत नाहीं. अभिनिवेशी भारूड पुष्कळ निर्माण झालें आहे. परंतु शास्त्रीय जगांत त्याला किंमत कांहीं नाहीं.

हिंदुस्थानांत जातिभावना ही सर्वांच्या रक्तांत भिनली आहे. आपण जाति सोडल्या किंवा सोडल्या पाहिजेत असें कोणीं बुद्धीनें कितीहि म्हटलें तरी, प्रत्यक्ष जातिभावना अजिबात विसरले असें क्वचितच एखाद्याविषयीं निर्बाधपणें म्हणतां येईल. कितीहि संयम केला तरी एखाद्या वेळीं तरी शेंडींतील बट जशी अवचित कोठें बाहेर यावी, त्याप्रमाणें रक्तांत भिनलेली जातिभावना थोडीतरी बाहेर डोकावल्या-शिवाय राहत नाहीं. असें झालें म्हणून त्यांत निसर्गाला किंवा स्वभावाला कांहीं दोष देतां येत नाहीं. उदाहरणार्थ, राजवाडे यांचा गागाभट्ट व चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंसंबंधींचा लेख भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील चतुर्थ-संमेलनवृत्तांत प्रसिद्ध झाल्यावर त्यावर अनेक बाजूंनीं भयंकर मारा झाला हें सांगावयास नकोच. चां. का. प्रभु समाजातर्फे मारा करणारे मुख्य वीर रा. केशव सिताराम ठाकरे हे होते. ह्यांनीं 'कोदंडाचा टणत्कार' वगैरे पुस्तकें लिहून आपल्या जोरदार भावना, आपल्या दणकेबाज भाषेमध्यें प्रतिपादन करून राजवाडे यांचें म्हणणें खोडण्याचा प्रयत्न केला. असल्या जातिवादविषयक वाङ्मयाचें परिगणन येथें एवढ्याकरितांच केलें आहे कीं, कधीं कधीं वादांच्या निमित्तानें कांहीं नवीन व अप्रसिद्ध अशी जातिविषयक ऐतिहासिक माहिती व पुरावे नवे शोधले जाऊन अशा ग्रंथांतून प्रसिद्ध होतात. शास्त्रीय इतिहासकाराला त्यामुळें तेवढ्या अंशानें फायदा होतो. एरवीं भावनांच्या पोकळ खणाखणीपलीकडे असल्या ग्रंथांपासून कांहीं निष्पन्न होत नाहीं. जातिविषयक समर्थनपर अथवा विरुद्ध अशा विषयांची सप्रमाण चर्चा आपणांमध्यें अत्यंत आवश्यक आहे. परंतु उभयपक्षांच्या विवेकी विद्वानांनीं, भावनांचा व पूर्वग्रहांचा साज मनावरून काढून ठेवून, केवळ तर्कप्रमाणवश होऊन उघड्या अंगानें वाग्युद्धें करावीं, असें आम्हांस

वाटतें. रा. ठाकरे यांच्या वर उल्लेखिलेल्या पुस्तकांत, भारत-इतिहास-संशोधक-मंडळाला सरकार दरसाल ५०० रुपयांचा मलिदा चारतें, अशीं धडधडीत खोटीं विधानें भावनेच्या आधारें, आवेशानें व आक्रोशपूर्वक पुढें मांडिलेलीं पाहून हसूं येतें! रा. चौबळ व रा. के. टी. गुप्ते यांचींहि राजवाड्यांची गागाभट्टी इत्यादि ग्रंथांच्या रूपानें राजवाडे यांस प्रत्युत्तरें प्रसिद्ध झालेलीं आहेत. या ग्रंथांतून शास्त्रीय विवेचन अल्प आहे किंबहुना नाहीं असें म्हटलें तरी चालेल. असाच वाद सारस्वत ब्राह्मणांसंबंधानें कै. गुंजीकर व कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या दरम्यान बऱ्याच वर्षांपूर्वी (१८८४) झाला होता. त्या वेळचीं 'सरस्वतीमंडळ' वगैरे पुस्तकें उपलब्ध आहेत. या पुस्तकांतील वाद विद्वानांच्या वाचावाचीसारखा भासतो.

ब्राह्मणाब्राह्मणांतील जाति-वादापेक्षांहि ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांतील जाति-वाद फार पुरातन आहे. उपनिषद्कालापासून किंवा त्यापूर्वीपासूनहि त्याचे पुरावे उपलब्ध होतात. 'ब्रह्मक्षत्रं यत्र विरुद्धतीह अन्वग्बलं दस्यवस्तद् भजन्ते।' असा इषारा व्यासांनीं दिला असूनहि असल्या वादाची तीव्रता कमी झाली नाहीं. खऱ्या इतिहासकाराला जी निरंजन व निर्लेप दृष्टि ठेवण्याबद्दल राजवाड्यांनीं आपल्या सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेंत शास्त्रशुद्ध प्रतिपादन केलें आहे त्याची आवश्यकता राजवाड्यांसुद्धा सर्वांसच असल्याचें आपणांस दिसून येतें. 'क्षत्रियांची उत्पत्ति,' 'शहाण्णवकुळी' इत्यादि विषयांवर रा. विरजे प्रभृतींचे कित्येक ग्रंथ आहेत. परंतु ब्राह्मण व क्षत्रिय या दोन जातींचा इतिहास हा विषयच इतका मोठा, व्यापक व अवजड आहे कीं, त्याचें संशोधन व प्रतिपादन करणाऱ्याच्या ठिकाणीं व्यापक बुद्धिमत्ता, विस्तृत ज्ञान व तीव्र चिकित्साशक्ति या तिन्हींची अत्यंत आवश्यकता आहे. या जातींचा इतिहास म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासाचा फारच मोठा भाग होय आणि त्याचें संशोधन व विरचन अद्यापि विशेषसें झालेलें नाहीं. जाति-भावनेमुळें—क्वचित् जातिप्रेमानें, क्वचित् अन्यजातिद्वेषामुळें, किंवा मत्सर-क्रोधामुळें, कोणीं कांहीं थोडेंफार लिहिलें आहे, परंतु तें जुजबी म्हणण्यास हरकत नाहीं. युरोपीय भाषांत अर्थातच यासंबंधानें बरीच कामगिरी झाल्याचें आढळून येतें.

प्रांतिक इतिहास

प्रांतिक इतिहास म्हणून ज्यांना म्हणतां येईल असे दोन चांगले मोठाले इतिहास बुलढाण्याचे श्रीयुत यादव माधव काळे यांनीं लिहून प्रसिद्ध केले आहेत. प्रथम त्यांनीं वऱ्हाडचा इतिहास लिहिला व नंतर त्यांनीं अलीकडे नागपूर प्रांताचा इतिहास लिहून प्रसिद्ध केला आहे. हे दोन्ही इतिहास मोठाले असून सरळ भाषेंत सुबोध रीतीनें लिहिलेले आहेत. इतिहासकाराच्या ठायीं लिहितांना जो सावधपणा असावा लागतो आणि जसें नेमस्त लिहिणें त्यानें लिहावें लागतें तसेंच रा. यादवरावजींनीं लिहिलें आहे. प्रपंचाचा व्यवसाय व हौशीचा व्यवसाय असे दोन व्यवसाय सुसंस्कृत म्हणणाऱ्यास असावेत आणि या दृष्टीनें रा. यादवराव यांनीं दोन्ही व्यवसायांत उच्च दर्जाचें यश संपादन केलें आहे. प्रसिद्ध साधनें जशीं त्यांनीं पाहिलीं तशींच अप्रसिद्ध साधनें पाहण्याची खटपटहि त्यांनीं केलेली आहे.

वऱ्हाडमध्यें संशोधनाच्या कामांत परिश्रम करणारे दुसरे प्रमुख गृहस्थ म्हणजे यवतमाळचे श्रीयुत यशवंत खुशाल देशपांडे हे होत. यांनीं तेथें शारदाश्रम नांवाची संस्था कांहीं मित्रांच्या साहाय्यानें काढली आहे. वऱ्हाड हा हल्लीं देखील नांवानें तरी निजामाचा आहे. जुनेपणाचा रंग महाराष्ट्रांतील इतर भागांपेक्षां वऱ्हाडावर अद्यापि अधिक उरलेला आहे. वऱ्हाड महाराष्ट्राचा अति प्राचीन भाग आहे, किंबहुना मूळ महाराष्ट्र तोच आहे. तेथें संशोधन विशेष झालेलें नाहीं. अतिप्राचीन कालापासूनचे अनेक अवशेष तिकडे जागजागीं सांपडतात. तसेंच अलीकडील काळांतील कागदपत्र विपुल प्रमाणांत तिकडे विखुरलेले आहेत. पोथ्याहि पुष्कळच असाव्यास पाहिजेत. त्या सर्वांत एक विशेष असा आहे कीं, महानुभाव पंथ वऱ्हाडांत उदयास आला. या महानुभावपंथाचा इतिहास मोठा अद्भुत आहे. कांहींसे अलीकडील कोड लँग्वेज्प्रमाणें आणि कांहीं शॉर्टहँड्च्या नमुन्यावर बसविलेले संकेत या पंथांतील लेखक पोथ्या लिहितांना वापरतात. गुजराथी लिपीप्रमाणें हे आपल्या पोथ्या ओळीच्या माथ्यावरील रेघ न काढतां लिहितात. अशा शेंकडों पोथ्या गेल्या सहाशें वर्षांत महानुभावपंथीयांनीं लिहिलेल्या उपलब्ध झाल्या आहेत.

या पंथाचा संस्थापक चक्रधर यांचा दंडक असा आहे कीं, पृथ्वीवरील सर्व देशांत महाराष्ट्र पवित्र आहे; म्हणून राहावयाचें असेल तर महाराष्ट्रांत राहावें असें ते सांगतात. 'महाराष्ट्रेषु न्यवसेत्', असें त्यांचें सूत्र आहे. या पंथाचे शेंकडों अनुयायी पंजाब व अफगाणिस्थानांतहि आहेत व तेथले महानुभाव धर्मग्रंथ म्हणून चक्रधराचीं मराठी सूत्रें अद्यापहि पाठ करीत असतात. सूत्रें, भाष्यें, वार्तिकें या प्राचीन व प्रौढ संस्कृत पद्धतीनें महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचे अनेक ग्रंथ रचिलेले आहेत! असा या पंथाचा इतिहास आश्चर्यकारक आहे. पंथांतील महंत हे संकेत गुप्त ठेवितात. दुसऱ्या कोणास कळवीत नाहींत. राजवाडे यांनीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या सभेंत बऱ्याच वर्षांच्या परिश्रमानें हे संकेत लावून दाखविले आणि तेव्हांपासून महानुभाव पंथाचें गुप्त भांडार सर्वांस खुलें होण्यास प्रारंभ झाला. त्यापूर्वी पंथीयां-बाहेर त्याचा प्रसार नव्हता.

नागपूरवऱ्हाडाकडील महानुभाव पंथाच्या वाङ्मयाच्या अभ्यासकांमध्यें यशवंतराव देशपांडे यांच्याखेरीज रा. वामनराव देशपांडे, उमरावतीचे प्रो. कोल्ते, माहूरचे खुद्द महानुभाव महंत दत्तलक्षराज महानुभाव व ऋद्धिपूरचे महंत गोपीराज व त्यांचे पंजाबी शिष्य पंडित बाळकृष्णशास्त्री, तसेच नागपूरचे श्रीयुत बापूसाहेब भवाळकर व हरिभाऊ नेने यांचीं नांवें सांगण्यासारखीं आहेत. कित्येक महानुभावी ग्रंथ यांनीं जमवून प्रसिद्ध केले आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक व वाङ्मयात्मक इतिहासाला महानुभावी वाङ्मय फार उपयोगी पडणारें आहे. त्यांत अनेक प्रकारचे तपशील असे आढळतात कीं, तसे दुसरे कोठेंहि सांपडत नाहींत. या वाङ्मयाच्या शोधाला नुकताच प्रारंभ झाला आहे व पुष्कळ महत्त्वाची माहिती यापुढें बाहेर पडेल अशी खात्री आहे. राजवाडे यांच्या प्रेरणेनें भा. इ. सं. मंडळांत कै. गो. का. चांदोरकर व त्यांचे पुतणे आबा चांदोरकर आणि धुळ्याचे रा. जावडेकर असे त्रिवर्ग महानुभाव वाङ्मयाचे परिशीलक म्हणून काम करीत असत. 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथाचे कर्ते ठाण्याचे प्रसिद्ध काव्येतिहाससंशोधक कै. विनायक लक्ष्मण भावे

यांनीं बराच पैसा खर्चून व बरेच परिश्रम घेऊन महानुभावीय वाङ्मयाचें अज्ञात दालन खुलें केलें. लीळासंवाद, स्थानपोथी, ऋद्धिपूरवर्णन, पूजावसर वगैरे या पंथांतील कित्येक जुने ग्रंथ इतिहासाच्या दृष्टीनेंहि उपयोगी पडण्यासारखे आहेत. रामदेवराव यादवाच्या राज्यांतील घालमेलींचे उल्लेख महानुभावी वाङ्मयांत सांपडतात. तथापि साक्षात् इतिहासोपयोगी असा हा महानुभावी वाङ्मयाचा विषय नसल्यामुळें त्या-संबंधानें अधिक प्रपंच येथें करीत नाहीं.

अन्यभाषीय साहित्य

मराठीप्रमाणेंच फारसी, ऊर्दु, कानडी, गुजराथी, बंगाली, पोर्तुगीज, इत्यादि भाषांत असलेल्या ऐतिहासिक साहित्यांतून मराठीमध्यें कांहीं भाग आणण्याचा जो प्रयत्न झाला आहे त्याचाहि विचार येथें केला पाहिजे. असें साहित्य फार थोडें आलें आहे आणि ही शाखा सर्वथा बाल्यावस्थेंत आहे. त्यांतल्या त्यांत फारसीसंबंधानें थोडें काम अधिक झालें आहे. पण फारसीमध्यें ऐतिहासिक साधनें अति विपुल असल्याकारणानें तेंहि काम अगदीं बाल्यावस्थेंत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ग्रँट् डफ् वगैरे इंग्रजी इतिहासकारांनीं फारसी साधनांचा कांहीं उपयोग केलेला आहे. अर्थात् त्याच्या आधारानें झालेल्या ग्रंथांना साहजिकच त्याचा फायदा मिळालेला आहे. स्वतंत्रपणें फारसी तवारिखा वगैरे वाचून त्यांच्या आधारें लिहिलेले ग्रंथ गेल्या शंभर वर्षांत मराठींत होऊं नयेत, ही गोष्ट दुःखदायक असली तरी पुष्कळ सूचक व बोधप्रद आहे. पुण्यांत बंड्नानांच्या पिढीपावेतों चांगलें फारसी ज्ञान असलेली थोडी तरी महाराष्ट्रीय मंडळी होती. पण एकंदरींत महाराष्ट्रांत फारसीचें पांडित्य नाहींच म्हटलें तरी चालेल. या उणीवेमुळें केवळ मराठी साधनांच्या साहाय्यानें इतिहासक्षेत्रांत मारलेली भरारी एकाच पंखानें उडण्याचा प्रयत्न करण्यासारखी लंगडी भासते. कोल्हापुरास कै. प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं दक्षिणेंतील शाह्यांचे इतिहास मराठींत प्रसिद्ध केले आहेत. त्यांत बुसातिने-सलातिन या फारसी इतिहासग्रंथाचा उपयोग केला आहे. बुसातिने-सलातिन या ग्रंथाचें मराठी भाषांतर जुन्या पिढींतच, बहुतकरून इंग्रजी अमलाच्या प्रारंभींच्या खंडांत,

तयार झालें होतें. बुसातिने ही फार उपयुक्त तवारिख आहे. हिचें ऊर्दू भाषांतर बडोदें सरकारांतून प्रसिद्ध झालेलें होतें. त्याची दाद पुढें बडोदें सरकारांतहि राहिली नाहीं. श्री. सौ. मातुश्री महाराणी चिमणाबाईसाहेब यांनीं रावसाहेब सरदेसाई यांचें लक्ष इकडे वेधलें व मग कांहीं प्रतींचा शोध लावण्यांत आला. हें ऊर्दू भाषांतर संग्राह्य आहे व अर्थातच उपयुक्त आहे. बाबरच्या आत्मचरित्रासारखें जगांत सर्वोत्कृष्ट ठरलेलें पुस्तक मराठींत अद्यापि आलें नाहीं. इतकेंच नाहीं, तर इलियट् व डॉलसन् यांनीं अति परिश्रमानें फारसी तवारिखांतील उताऱ्यांनीं रचलेले असे हिंदुस्थानच्या इतिहासाचे आठ विभाग इंग्रजींत निबंधमालेच्या पूर्वी छापलेले असून आणि भरपूर माहितीनें भरलेले असूनहि या बहुमोल खंडग्रंथांचा व्यासंग महाराष्ट्रीय विद्वानांत अल्पतरच दिसतो. वास्तविक घटकोघटकीं ज्याचा उपयोग लागावा असे हे विभाग आहेत, पण ते सारे इंग्रजींत आहेत. एकंदरींत फारसीकडे आणि त्यांतील साधनांकडे आमचें अतोनात दुर्लक्ष झालें आहे हें उघड होतें.

शिवाजीमहाराजासंबंधानें व एकंदरींत त्यांच्या काळासंबंधानें पुष्कळ अप्रसिद्ध माहिती फारसी तवारिखनाम्यांतून उपलब्ध आहे. विद्वानांचें लक्ष या गोष्टीकडे प्रथम वेधण्याचें खरें श्रेय सर यदुनाथ सरकार यांना आहे. परंतु राजवाडे यांनीं आधीं इतिहास किंवा चरित्रें न लिहितां मूळ साधनें शोधून काढण्याचा व प्रसिद्ध करण्याचा जो पायाशुद्ध आणि सशास्त्र रस्ता महाराष्ट्रास दाखविला तो सर यदुनाथ यांनीं अनुसरिला नाहीं. मूळ साधनें आधीं न छापतां फारशी साधनांच्या आधारें त्यांनीं शिवाजी व औरंगजेब यांचीं चरित्रेंच लिहिण्यास घेतलीं, यामुळें त्यांचा पंथ निराळाच झाला. तवारिखनामे वगैरेपेक्षां अखबारा, फर्मानें, सनदापत्रें वगैरे अस्सल साधनेंच जर मिळतील तर त्यांचें केव्हांहि अधिक महत्त्व आहे. हिंदुस्थानामध्यें कित्येक शतकें राजकीय व दरबारी व्यवहार फारसी भाषेच्या द्वारें होत असल्यामुळें साहजिकच पूर्वीच्या राजवटींतील अस्सल कागदपत्र—विशेषतः बादशाही काळांतलें असें—फारसींत पुष्कळच आहेत. शोधाअंतीं अशा कागदपत्रांची संख्या लाखांनीं मोजण्याइतकी भरेल इतकीं हीं साधनें विपुल आहेत. हीं फर्मानें, महजर-

नामे, अखबारा, वगैरे स्वरूपाचीं फारसी साधनें जमा करून प्रसिद्ध करण्याकडे भारत-इतिहास-संशोधक-मंडळानें बरेंचसें लक्ष पुरविलें आणि फारसी मुनशी मुद्दाम नेमून आपल्याकडील कांहीं मंडळींनाहि या विषयाची गोडी लावली. पैकीं पुण्याचे श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं पुष्कळ जुन्या जुन्या घराण्यांतून फारसी साधनें मिळविलीं. खुद्द पुणें दरबारांत पेशव्यांचे पारसनीस असलेलें घराणें, जें सांप्रत त्याच आडनांवानें ओळखिलें जातें, त्यांच्या येथें शोधाअंतीं हजारों अस्सल फारसी कागदांचा भरणा आढळून आला. निजाम व पेशवे, पेशवे व ईस्ट् इंडिया कंपनी इत्यादिकांसंबंधानें या संग्रहांत बहुमोल कागदपत्रें आहेत. इंग्रज कंपनीहि आपला व्यवहार पेशव्यांशीं फारसींत करीत असे. हा सर्व पारसनीससंग्रह प्रसिद्ध होणें जरूरीचें आहे. परंतु हें काम अत्यंत श्रमाचें व खर्चाचें असल्यामुळें त्याची प्रगति खुंटून राहिल्यासारखी आहे.

फारसी साधनें शिवकालीन इतिहासास फारच उपयोगी आहेत. एक तर जसा पेशवेकालीन अस्सल राजकारणी पत्रव्यवहार बराच सांपडतो तसा शिवकालीन पत्रव्यवहार अद्याप सांपडत नाहीं आणि त्या काळाविषयीं आपली जिज्ञासा तर वाढली आहे. जुनीं शिवकालीन घराणीं शोधलीं असतां त्यांच्याजवळ साहजिकच फारसी कागद, सनदापत्रें वगैरे बरींच मिळावीं. राजवाडे यांनीं या शिवकालीन घराण्यांच्या शोधाला जोरानें सुरुवात १९१२ च्या नंतर केली आणि सारी नीरथडी व भीमथडी पुनः धांडोळली. मावळांत गरीबांच्या केंबळी झोपड्यांत त्यांस शेंकडों कुळकटें, करीने, महजर व निवाडपत्रें मिळालीं. यांपैकीं अनेक पत्रांत प्रथम मूळ फारसी व खालीं त्याचा मराठी सारांश किंवा तर्जुमा, असा प्रकार आढळून येई. याप्रमाणें मिळालेले, फारसीची छाया असलेले, शेंकडों कागद अनेक खंडां-तून राजवाड्यांनीं छापले आहेत. मूळ शुद्ध फारसी अस्सल कागद छापण्याचा उपक्रम भारत-इतिहास-संशोधक-मंडळानेंच केला. जेधे घराण्यांतील कागदपत्रांचा जो सांठा मंडळांतील एक उत्साही संशोधक श्री. सखाराम गणेश जोशी मावळणकर यांनीं मिळविला तो पाहून ही प्रथा वाढत गेली. कारी, पेडगांव वगैरे

स्थळांचें वजन संशोधकांत वाढलें. अलीकडील संशोधक आतां फारसी कागद टाकून देत नाहींत. भा. इ. सं. मंडळांत तर रा. गणेश हरी खरे या तरुण व व्यासंगी संशोधकानें फारसी भाषेचा बराच अभ्यास करून तीं साधनें शास्त्रीय रीतीनें प्रसिद्ध करण्याची आपली तयारी सर्वांच्या निदर्शनास आणिली आहे. रा. खरे यांच्या या तयारीमुळें मंडळाचाहि उत्साह वाढून ऐतिहासिक फारसी साहित्याचे लहानमोठे २।३ खंड मंडळानें प्रसिद्ध केले आहेत आणि तें काम मंडळांत रोज वाढत्या प्रमाणांत चालू आहे. पुढेंमागें फारसी संशोधनाची शाखा फारच विस्तृत होईल याविषयीं शंका नाहीं. मागें सांगितलेल्या पेशव्यांच्या पारसनीस घराण्यांतील श्री. सरदार बाळासाहेब पारसनीस यांच्या दप्तरांतील साधनांचा एक खंड मूळ व मराठी भाषांतर असें देऊन सरदार मुजुमदार यांच्याकडून संपादन करून घेऊन मंडळानें प्रसिद्ध केला आहे. त्याचप्रमाणें आदिलशाही फर्मानांचा एक मोठा अपूर्व सांठा रा. शं. ग. दाते यांच्या कृपेनें आमच्या हातीं आलेला मंडळाकडून प्रसिद्ध करविण्याचा योग कधीं येईल, त्याची आम्हीं वाट पाहत आहोंत. हीं सुमारें सातशें फर्मानें आहेत आणि आदिलशाही इतिहासाच्या उद्बोधनास त्यांचा उपयोग विशेषच होईल. हा संग्रह केवळ अद्वितीय आहे.

शिवकालीन मराठी साधनांत व पेशवेकालीन साधनांत पुष्कळ फारसी शब्द मराठी बनून मराठींत शिरलेले आढळून येतात. या शब्दांचा नेमका अर्थ व त्यांचें मूळरूप व्यवस्थित तऱ्हेनें शोधून काढून उदाहरणांसह तयार केलेला त्यांचा एक कोश मंडळानें प्रसिद्ध केला आहे. हा कोश फारसी व मराठी दोन्ही वाङ्मयांतील रसिक विद्वान् प्रो. माधव त्रिंबक पटवर्धन यांनीं तयार केला आहे. प्रो. पटवर्धन यांचा हा ग्रंथ त्यांच्या परिश्रमाची व विद्वत्तेची उत्तम साक्ष देणारा आहे. फारसीप्रमाणें ऊर्दूमध्येंहि तवारिखा वगैरे साधनें सांपडतील व त्यांचाहि असाच परामर्ष घ्यावयाला पाहिजे. परंतु फारसीच्या कामाच्या पोटांतच तें काम येतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उस्मानिया विद्यापीठामुळें निजामशाही मराठवाड्यांतील

व्यासंगी मंडळींना या कामीं पुढें येण्यास एक नवी सोय झाली पाहिजे. त्यांच्याकरिता हें काम जणूं वाट पाहत बसलें आहे !

देवस्थानांचे इतिहास

देवस्थानांचे कांहीं इतिहासहि मराठींत प्रसिद्ध झालेले आहेत व कांहीं क्षेत्रांचीं वर्णनेंहि प्रसिद्ध झालेलीं आहेत. शांतादुर्गा (गोवें), पंढरपूर, नाशिक, काशी, करवीर इत्यादि क्षेत्रांची व तेथील देवस्थानांची माहिती असलेलीं पुस्तकें मराठींत आहेत. परंतु तीं सामान्य प्रकारचींच आहेत. इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासकास त्यांचा उपयोग अगदीं प्राथमिक स्वरूपाचाच होण्याजोगा आहे. भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील रा. खरे यांनीं आळंदीवर एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, तें शास्त्रीय दृष्टीचें आहे. रा. कुळकर्णीकृत 'तुळजापूरचें वर्णन' हा ग्रंथ उपयुक्त आहे. नाशिक येथील 'बालाजी संस्थान'चा इतिहास कागदपत्रांसुद्धा श्री. गोसावी बालाजीवाले यांनीं चांगल्या प्रकारें प्रसिद्ध केला आहे. हें त्यांस भूषणावह आहे. पौराणिक पद्धतीचीं क्षेत्रमाहात्म्यें कित्येक प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांचा ऐतिहासिक दृष्ट्या उपयोग आज तरी विशेष होत नाहीं. पुढेंमागें रा. विष्णुपंत करंदीकरासारखा गृहस्थ त्यांतूनहि कांहीं उपयुक्त माहितीचे दुवे उकलून इतिहासास जोडूं शकेल. परंतु या कामीं मोठमोठ्या देवस्थानांच्या पंच मंडळींनीं लक्ष पुरविलें पाहिजे. पैठण, आळंदी, देहू, पंढरपूर, पर्वती, चिंचवड इत्यादि अनेक लहानमोठ्या देवस्थानांची व्यवस्था निरनिराळ्या प्रकारच्या पंच मंडळींकडे आहे. त्यांनीं आपलीं दप्तरें वगैरे नीट शास्त्रीय रीत्या लावून, तज्ज्ञांकडून शोधून, आपापल्या देवस्थानांचे विस्तृत व विश्वसनीय इतिहास प्रसिद्ध केले पाहिजेत. मोरया देव संस्थान चिंचवडसंबंधीं माहिती (ले. द. वा. पोतदार, भा. इ. सं. मं. त्रै. जून १९२२), नींब–सदानंद (राजवाडेकृत म. इ. सा. खंड १५, पृ. १२१-२६७) असे झालेले फुटकळ प्रयत्न या कामीं अधुरे व अपुरे पडतात. राजकीय संस्थानांप्रमाणेंच धार्मिक संस्थानांचेहि इतिहास महत्त्वाचे आहेत. किंबहुना आमच्या देशाच्या इतिहासांत तर तो विशेषच आहे.

शब्दव्युत्पत्तिसंशोधन हाहि एक इतिहासाचा जरा दूरचा म्हटला तरी महत्त्वाचा भाग आहे. शब्देतिहास हें एक इतिहासाचेंच उपांग आहे. हें कामहि मराठींत फारच थोडें झालेलें आहे. राजवाडे, रा. रा. भागवत, शि. म. परांजपे, वि. रा. शिंदे, गो. कृ. मोडक, निलुरे, चिंतामणराव वैद्य, डॉ. भांडारकर, गुणे, कृ. पां. कुलकर्णी प्रभृति विद्वानांनीं याविषयीं कांहीं शोध केलेले आहेत. राजवाडे यांनीं आपला वसाहतकाळचा इतिहास व्युत्पत्तीच्या बळावरच सजविलेला आहे. रा. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांनीं लिहिलेला ' मराठी भाषेचा उद्गम व विकास ' हा संकलनपर ग्रंथ अत्यंत उपयुक्त व उच्च दर्जाचा झालेला आहे. ज्ञानकोशाचे धर्तीवर शब्दकोश-मंडळ स्थापन होऊन मराठीचा बृहत्कोश तयार होत आहे व त्याचे संपादक रा. दाते, कर्वे, चांदोरकर इत्यादिकांचें महत्त्वाचें संकलनपर कार्य चालू आहे. यापुढील काळांत शब्देतिहासाचें मोठें कार्य घडून यावयास पाहिजे आहे व तिकडे विद्वानांचें अधिकाधिक लक्ष्य जाईल अशी उमेद आहे.

स्थलनिश्चय

इतिहासांत स्थलनिश्चयाला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे; किंबहुना कोण-तीच ऐतिहासिक घटना स्थलनिश्चयावांचून निश्चित होणें दुरापास्त आहे. या विद्येंत हिंदुस्थान फारच मागासलेला आहे. देशाची क्षेत्रमोजणी व स्थलांचे दिङ्निश्चय व चित्ररेखन यांविषयीं पूर्वीच्या काळीं राहोच परंतु हल्लींच्या नव्या विद्येच्या काळांतहि आमच्याकडे कांहींच प्रयत्न होत नाहींत. यामुळें हें सदर कोरें आहे म्हटलें तरी चालेल. इंग्रज सरकारानें व कित्येक इंग्रज प्रवाशांनीं व शोधकांनीं या विभा-गांत पुष्कळ माहिती प्रसिद्ध केली आहे व नकाशांची आवश्यक जोडहि त्यास दिली आहे. युद्धेतिहासाला तर भूमिचित्रें, नतोन्नत भागांसुद्धां काढलेलीं, अत्यंत आवश्यक असतात. अलीकडे नवीन तऱ्हेचे खडीचे रस्ते आंखून तयार झालेले आहेत आणि लोखंडी मार्गहि बनलेले आहेत. परंतु जुने मार्ग यामुळें पुष्कळ बदलावे लागले आहेत. पूर्वींचे प्रवासमार्ग कसे होते आणि दळणवळण कसें चालत होतें याचें तपशीलवार ज्ञान इतिहासाभ्यासकास जरूर आहे. साध्या कागदावर स्थूलमार्गानें

रेघोट्यांच्या रूपानें जुन्या काळांत काढलेले कांहीं नकाशे भा. इ. सं. मंडळाच्या संग्रहीं आहेत. परंतु बारीक मोजणीमापणी करून प्रमाण व दिशा बिनचुक दाखविणारे नकाशे युरोपियनांनींच प्रथम तयार केले आहेत. अद्यापिहि कित्येक देशी संस्थानांत क्षेत्रमोजणी व क्षेत्राचित्रण शास्त्रीय रीत्या न झाल्यानें आपल्या ज्ञानांत फारच उणीव राहिली आहे. मराठींत याबद्दल कांहींच लिखाण नाहीं व या विद्येचे अभ्यासकहि कोणी दिसत नाहींत. पूर्वी कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं एक प्राचीन भारतवर्षीय भूवर्णन लिहिलेलें प्रसिद्ध आहे. रा. शेजवलकर व कॅ. मोडक यांनीं कांहीं काम केलें आहे; परंतु या विद्येचा श्रीगणेशा त्यांनीं आम्हांस शिकविला असें देखील म्हणतां येत नाहीं. भूगोलविषयाच्या शिक्षणास हल्लीं अधिकाधिक महत्त्व देण्यांत येत आहे, तेव्हां आतां त्याची इतिहासाशीं सांगड घालून या विषयाचा भरीव अभ्यास करण्याकडे लक्ष लागण्याचे आशादायक दिवस जवळ येत चालले आहेत असें वाटतें.

विषयेतिहास

लष्करी इतिहास

इतिहासाची वास्तविक कल्पना फारच व्यापक असल्यामुळें वाङ्मयिक, आर्थिक वगैरे शाखांचा इतिहासहि त्याच सदरांत येतो. या सर्वांगपरिपूर्ण इतिहासासाठीं लष्करी इतिहास, कलाकौशल्याचा इतिहास वगैरे अनेक प्रकारचे इतिहास व्हावयास पाहिजेत आणि तसें कांहीं वाङ्मय मराठींत झालेंहि आहे. लष्करी इतिहासाची शाखा ग्वाल्हेर आर्मीतील तडफदार विद्वान् कॅप्टन मोडक यांनीं जोरानें हातीं घेतली आहे. 'प्रतापगडचें युद्ध' या नांवाचा त्यांचा मोठा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यांत मुख्यतः लष्करी शास्त्राच्या दृष्टीनें आणि जुन्या कागदपत्रांच्या आधारानें प्रतापगडचें युद्ध सविस्तर रीतीनें वर्णन करण्याचा ग्रंथकारानें फार परिश्रमपूर्वक प्रयत्न केला आहे. या दृष्टीनें लिहिलेला दुसरा ग्रंथ मराठींत नाहीं. कॅप्टन् मोडक यांनी खर्डा, तळेगांव, महाराजपुर वगैरे मराठी रणभूमि प्रत्यक्ष जाऊन, निरीक्षून व कागदपत्रांतील वर्णनाचा मेळ प्रत्यक्षाशीं पाहून, मराठ्यांचें युद्धशास्त्र कसें होतें त्याचें चित्र तयार करून आपल्या

विषयावरील ग्रंथांची कच्ची सामग्री तयार केली आहे. लष्करी इतिहास हा मराठी इतिहासाचा प्राणभूत असा भाग आहे. हिंदुस्थानांत शेंकडों शूर लोकांनीं आणि वीरांनीं जगांतील कोणत्याहि ठिकाणच्या शूर लोकांस अभिमान वाटेल अशा लढाया मारल्या आहेत. इतर अनेक कलांप्रमाणें युद्धकलाहि प्रत्यक्ष पिढी दरपिढीच्या अनुभवानेंच हिंदुस्थानांत जगविली गेली आहे. दुःखाची गोष्ट मात्र अशी कीं, कलेला मूलभूत जें शास्त्र तें उपपत्तिपूर्वक आमच्यामधून मागेंच लुप्त झालें आणि यांतच हिंदुस्थानच्या अधःपाताचें खरें बीज आहे. पुन्हां जेव्हां हिंदुस्थान आपलीं शस्त्रें आपल्यासाठीं निर्माण करील तेव्हांच हिंदुस्थानची परतंत्र स्थिति नाहींशी होईल.

लष्करी इतिहाससंबंधानें दुसरें घेण्याजोगें नांव म्हणजे बडोद्याचे सेनापति श्री. नानासाहेब शिंदे यांचें होय. नानासाहेबांनीं हिंदुस्थानांतील लढायांसंबंधानें एक व पानिपतच्या युद्धासंबंधानें एक, असे दोन ग्रंथ लिहिले आहेत व अधूनमधून लष्करी दृष्टीनें माहिती देणारे व विवेचन करणारे लेखहि ते लिहीत असतात. असे प्रयत्न हे कितीहि अभिनंदनीय असले तरी लष्करी शाखेच्या इतिहासाची भूक अशा फुटकळ प्रयत्नांनीं भागणार नाहीं. हिंदुस्थानचें राष्ट्र हें बिनलष्करी बनविल्यापासून या विषयाकडे आमची सर्वस्वीं डोळेझांक झाली आहे. उदाहरणाकरितां एकच गोष्ट सांगतों. आमचे पूर्वज युद्धाचीं हत्यारें वापरीत त्यांचीं शेंकडों नांवें ग्रंथांत येतात. परंतु त्या नांवांनीं दर्शविलेल्या वस्तु फारच थोड्यांना माहित असतात. आमच्या संस्थानिकांच्या संग्रहीं शेंकडों हत्यारें कोठें कोठें ठेविलेलीं आहेत. परंतु या हत्यारांची सचित्र माहिती देणारा असा एकहि मराठी ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं. इतकेंच नाहीं, तसा ग्रंथ लिहिण्याची भाषाहि कोणी बोलत नाहीं. असा ग्रंथ ताबडतोब तयार करविण्याविषयीं श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्यासारख्यांनीं मनावर घ्यावें, अशी त्यांस आमची आग्रहाची विनंति आहे. बडोद्याचे श्री. माणिकराव यांच्यासारखे या विषयांतील तज्ज्ञ गृहस्थ विद्यमान आहेत. आम्हीं दुर्लक्ष्य केलें तथापि आमचा जणूंकाय सर्व भारच ज्यांनीं आपल्या अंगावर घेतला आहे ते इंग्रज विद्वान् यांनीं ब्रिटिश्

म्युझिअम् नांवाच्या अजबखान्यांतील हिंदी हत्यारांचें एक सचित्र वर्णनपुस्तक प्रसिद्ध केलें आहे आणि आम्हांस लाजविलें आहे. नुसत्या हत्यारांच्या वर्णनाचें पुस्तकच नाहीं, तर लष्करी शास्त्र, यूद्धभूमि, नकाशे, हालचाली, व्यूह, जल, स्थल, आणि आकाशयुद्ध इत्यादि अनेक बिषयांचाहि कांहींच विचार आमच्याकडे होत नाहीं. हा आमच्या बुद्धिमत्तेसहि मोठा कलंक लागला आहे असें समजलें पाहिजे. स्वतंत्र ग्रंथ राहोत, भाषांतरें तरी करणें अवघड नाहीं. पण कै. प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं लिहिलेलें 'मराठ्यांच्या लढायां'वरील पुस्तक सोडलें तर ब्लॅकरच्या मराठी युद्धावरील इतिहासाचा उपयोग करून लिहिलेलें दुसरें इतकें सविस्तर पुस्तक दाखवितां येणार नाहीं. इंग्रजीमध्यें मराठा युद्धासंबंधानें माहिती शास्त्रीय पद्धतीनें ज्यांत दिली आहे असे कितीतरी सरकारी व बिनसरकारी ग्रंथ मिळण्यासारखे आहेत. लष्करी शिक्षणाचा विषय विद्यापीठांतील अभ्यासक्रमांत दाखल झाल्याशिवाय लोकांचें लक्ष जावें तितकें इकडे जाणार नाहीं आणि लष्करी शिक्षणांत लष्करी इतिहासाशिवाय जिवंतपणा येणार नाहीं. असा हा लष्करी इतिहास हिंदुस्थानच्या रणक्षेत्रांचाच इतिहास असला पाहिजे, हें कोणासहि सहज पटण्यासारखें आहे.

महाराष्ट्राच्या लष्करी इतिहासांत किल्ल्यांचें महत्त्व विशेष आहे. परंतु महाराष्ट्रांतील किल्ल्यांचें फक्त एकच वर्णनपुस्तक कै. गोगटे यांनीं केलेलें प्रसिद्ध आहे. किल्ल्यांची माहिती क्रमवार जमवून देण्याचा आणखी एक प्रयत्न मुंबईच्या श्रीशिवाजी-त्रिशत-सांवत्सरिक ग्रंथावलीच्या ग्रंथांत करण्यांत आला आहे.

आर्थिक इतिहास

आर्थिक इतिहासाविषयीं वस्तुतः पुष्कळ साहित्य उपलब्ध आहे, परंतु त्याचे अभ्यासकच अजून कोणी पुढें आले नाहींत. राजवाड्यांचे आक्षेपक ज्याला तेलातुपाचीं पत्रें म्हणत ती वास्तविक आर्थिक इतिहाससंशोधनाची साहित्यसामग्री होती. पेशवे दप्तरासारख्या दौलती दप्तरांतून (State Records) आर्थिक प्रश्नांच्या अभ्यासाला लागणारी सामग्री अफाट पडलेली आहे. युरोप्मध्यें हॉलंड्, इंग्लंड् वगैरे देशांतील

ईस्ट् इंडिया कंपन्यांचे दप्तरखानेहि या प्रकरणीं पुष्कळच माहिती पुरवतील. अशी कांहीं माहिती विलायतेंत इतिहास, अर्थशास्त्राच्या पदवीप्रबंधांच्या निमित्तानें आमच्याकडील कांहीं तरुण विद्वानांनीं अभ्यासली आहे; परंतु देशी भाषांतील माहितीशीं तिचा पडताळा कोणीं पाहिलेला नाहीं. महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाल्याशिवाय इकडे पाहिजे तेवढें लक्ष पुरविलें जाण्याची आशा नाहीं. जर्व्हिस्च्या वेळीं वजनामापाच्या ज्या चौकशा झाल्या त्यांचीं कांहीं कोष्टकें मराठींतहि प्रसिद्ध झालीं आहेत. तदनंतर न्या. रानड्यांनीं पेशवेदप्तरची पहाणी करून जीं टिपणें प्रसिद्ध केलीं त्या इंग्रजी टिपणांत पेशवाईतील आर्थिक प्रश्नांविषयीं कांहीं विचार व माहिती ग्रथित केलेली आहे. डॉ. मॅन् व त्यांचे मदतनीस प्रो. कानिटकर यांनीं कांहीं गांवांची पाहणी करतांना ऐतिहासिक व आर्थिक माहिती व तुलनात्मक विचार इंग्रजींत प्रगट केलेले आहेत. त्यांचा अनुवाद मराठींत सविस्तर व संपूर्ण झालेला नाहीं. अलीकडे रावसाहेब चापेकर यांनीं 'आमचा गांव' ग्रंथांत बदलापूरबद्दल कागदपत्र शोधून ऐतिहासिक व आर्थिक विभागाची माहिती मुद्दाम दिली आहे. खाजगीवाले यांचे जमाखर्च व चिपळुणकर सावकारांचे जमाखर्च भा. इ. सं. मंडळाचे संग्रहीं आहेत. त्यांचा अल्प परामर्ष रावसाहेब चापेकर यांनीं निरनिराळ्या लेखांतून घेतलेला आहे व हे लेख 'पेशवाईच्या सावलींत' या नांवानें संकलित ग्रंथरूपानें स्वतंत्रपणें छापत आहेत. प्रो. वा. गो. काळे, व प्रो. चिं. ब. जोशी यांनीं मंडळासमोर आर्थिक विषयावर कांहीं निबंध वाचले आहेत.

आर्थिक विषयाच्याच पोटांत चलनाचा प्रश्न येतो. त्या दृष्टीनें नाण्यांचा विचार आर्थिक विचार करणारास करावाच लागतो. परंतु नाण्यांच्या अभ्यासापासून प्रत्यक्ष इतिहासाला कालस्थलादिकांची जी निश्चिती आणतां येते त्या दृष्टीनें नाण्यांच्या अभ्यासाचें महत्त्व स्वतंत्र आहे. मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, नाणकशास्त्राचा अथवा मुद्राशास्त्राचा अभ्यास महाराष्ट्रीय संशोधकांनीं प्रायः केला नाहीं म्हटलें तरी चालेल. एवढे अनेकविषयपरामर्षी राजवाडे परंतु त्यांनींहि नाण्यांचा अभ्यास दुर्लक्षिला हें आश्चर्य होय. बरींच नाणीं जमा करून त्यांचा संग्रह आपण

आपल्या एका मित्राच्या हवालीं केला असें राजवाडे आमच्याजवळ हळहळत असत. पुढें तो संग्रह नाहींसाच झाला म्हटलें तरी चालेल. नाणीं, चित्रें, हत्यारें, वगैरे वस्तूंचा संग्रह राजवाडे, खरे किंवा साने यांनीं केलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. पारसनीस मात्र इकडे थोडें लक्ष देत असत. मावजीशेट यांनीं दुर्मिळ वस्तूंचा संग्रह बराच केला होता. हरगोविंद पारख यांनीं वस्त्रांचा अपूर्व संग्रह केला होता. जमखंडी येथें नाण्यांचा संग्रह बराच मोठा आहे; अक्कलकोटास हत्यारांचा संग्रह अपूर्व आहे; प्रिन्स ऑफ वेल्स् म्युझियम्, मुंबई, मध्येंहि नाण्यांचा व हत्यारांचा मोठा संग्रह आहे. महाराष्ट्राबाहेर ज्या ऐतिहासिक संग्रहशाळा आहेत त्यांत व तसेंच कलकत्ता, दिल्ली, लाहोर वगैरे ठिकाणीं, मराठयांच्या इतिहासास उपयोगी पडेल असें पुष्कळ साहित्य मिळण्याचा बराच संभव आहे. अनेक युरोपियन लोकांनीं लक्षावधि वस्तु परदेशीं नेल्या आहेत, त्यांचा शोध तिकडील संग्रहालयांतून बारकाईनें केला पाहिजे. परदेशांत जाणाऱ्या हिंदी लोकांनीं विशेषतः विद्यार्थिवर्गानें ही कामगिरी करण्यासारखी आहे.

पुनः भा. इ. सं. मंडळाचेंच नांव घेण्याचा प्रसंग येत आहे त्याला इलाज नाहीं. नाण्यांचा संग्रह मुंबईस रॉयल एशियाटिक सोसायटींत मोठा आहे आणि गुप्तधनप्राप्ति (Treasure Trove Act) च्या कायद्याअन्वयें सरकारहि या संग्रहास मदत करीत असतें. मुंबईस नाणकसंशोधनमंडळ म्हणजे न्युमिस्मॅटिक असोसिएशन आहे. तिच्या मार्फत नाण्यांचा संग्रह व अभ्यास इंग्रजींतून चालतो. प्रो. होडीवालाप्रभृति मुंबईकडील तज्ज्ञ विद्वान त्यांत लक्ष घालीत असतात; परंतु मागें सांगितल्याप्रमाणें मराठी विद्वान् मात्र नाणकशास्त्र[१] अस्तित्वांत तरी आहे किंवा नाहीं इतके त्यासंबंधानें बेफिकिर दिसतात.

कै. रामभाऊ गाडगीळ

पण महाराष्ट्राचा असा एक चमत्कारिक पायगुण आहे कीं, येथें एखाद्या विषयाचें वेड घेऊन दारिद्र्यादि आपत्तींस न जुमानतां आपला जन्म त्या वेडाच्या मागें लाग-

१. रा. गोखलेकृत व्यवहारदर्पण यांत नाण्यांविषयीं थोडी सचित्र माहिती आलेली आहे (सुमारें सन १८५४).

ण्यांतच घालविणारे लोकविलक्षण पुरुष आढळून येतात. मुंबईस पोष्ट खात्यांत काम करणारे कै. रामभाऊ गाडगीळ हे गृहस्थ अशाच कोटींत पडतील. नाणीं जमा करण्याचा नाद या गृहस्थांस सहज क्षुल्लक कारणानें लागला. पुढें तोच अत्यंत बळावून तांब्याच्या नाण्यांचा एवढा अपूर्व संग्रह त्यांनीं केला कीं, तसा संग्रह साऱ्या हिंदुस्थानांत कोणाजवळहि नसेल. हा संग्रह त्यांनीं मोठ्या व्यवस्थेनें ठेवला होता, परंतु राष्ट्रार्पणबुद्धीनें त्याची व्यवस्था करण्याविषयीं आम्हीं अनेकवार घातलेली गळ त्यांनीं स्वीकारिली नाहीं आणि त्यामुळें तूर्त तरी आपलें मोठें नुकसान झालें आहे. त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट इतकीच कीं, आपल्या संग्रहांतील नाण्यांच्या सचित्र हस्तरेखित पुस्तकांचे दोन बांधीव बहुमोल खंड त्यांनीं भा. इ. सं. मंडळास अर्पण केले आहेत. तेवढ्यानें त्यांच्या नाण्यांच्या संग्रहाविषयींचें ज्ञान आपल्या पदरांत पडण्याजोगें आहे.

मंडळांतील नाणीं

रा. गाडगीळ यांची माहिती होण्यापूर्वी भा. इ. सं. मंडळांत रा. बा. सी. बेंद्रे यांनीं नाण्यांच्या अभ्यासास प्रारंभ केला होता. परंतु मंडळसंग्रहांतील सर्व नाणीं व्यवस्थित रीतीनें अभ्यासून त्यांच्या शास्त्रीय परामर्षाचें स्वतंत्र पुस्तक तयार करण्याचें महत्वाचें कार्य मंडळांतील संशोधक रा. गणेश हरि खरे यांनींच चांगल्या रीतीनें शेवटास नेलें आहे. ‘ मंडळांतील नाणीं ’ हा ग्रंथ या दृष्टीनें अगदीं अपर्व आहे. नाण्यांच्या सशास्त्र अभ्यासास या ग्रंथामुळें प्रारंभ झाला तरी मोठें कार्य झालें असें म्हणतां येईल.

शिल्पसंशोधक वझे

जीवनांत शिल्पाचें महत्त्व अपरंपार आहे. शिल्पाची आमच्याकडील प्राचीन व्याख्याहि व्यापक आहे. परंतु मराठीमध्यें शिल्पसंशोधनासंबंधानें विषयाच्या महत्वाच्या आणि व्यापाच्या मानानें सांगण्यासारखें असें महत्वाचें कांहींच झालें नाहीं. या सामान्य विधानाला एका महनीय नांवाचा अपवाद केला पाहिजे. तें नांव म्हणजे कै. कृष्णाजी विनायक वझे यांचें होय. कै. वझे हे एल्. सी. ई. असून सरकारी नोकर

होते. हे नोकरींत असल्यावेळेपासून त्यांना शोधाची आवड होती. प्राचीन शिल्पाचे आश्चर्यजनक नमुने सर्व हिंदुस्थानभर पसरलेले आहेत आणि त्यांची अनेक परकीयांनीं स्तुति केलेली आहे. परंतु आमच्या अक्षम्य दुर्लक्ष्यामुळें आणि परकीय शिल्पाचा झपाट्यानें प्रसार झाल्यामुळें आमचें सर्व शिल्प हळुहळू बुडालें. इतकें कीं, आतां त्याचें पुनरुज्जीवन करणें ही फार खर्चाची व त्रासाची गोष्ट होऊन बसली आहे.

प्राचीन शिल्पांत केवळ प्राचीन कालच्या लोकांनाच सुख देण्याची शक्ति होती असें नाहीं, तर अर्वाचीन कालच्या सुधारलेल्या शिल्पालाहि त्यापासून कांहीं शिकण्यासारखें आहे, असें त्या शिल्पाच्या अभ्यासावरून हळुहळू प्रत्ययास येत आहे. आग्रा, वेरूळ, मदुरा, अजंठा, कार्ले, वगैरे स्थळीं जे हिंदी शिल्पाचे सर्वस्तुत नमुने अद्यापहि उभे आहेत ते त्याच्या वैशिष्ट्याची साक्ष देत आहेत. युरोपियन लोकांनीं त्यांचा अभ्यास करण्यांत आणि आमच्या लोकांनीं त्याचा अभ्यास करण्यांत साहजिकच पुष्कळ अंतर पडणार. काठेवाड, पंजाब वगैरे प्रांतांत अद्यापहि जुनें शिल्प जीव धरून आहे; परंतु त्याचा लक्षपूर्वक अभ्यास आमच्या महाराष्ट्रांत तरी पहिल्या प्रथम रा. वझे यांनींच सुरू केला. कश्यप, मय आणि भृगु यांच्या संहिता शोधून काढून आणि एकंदरींनें जुन्या शिल्पाची सरहस्य माहिती जनतेपुढें यावी या दृष्टीनें, कै. वझे यांनीं इंग्रजी आणि मराठीमध्यें पुष्कळ लेख प्रसिद्ध केले. एक शिल्प ग्रंथमालाच मराठींत व इंग्रजींत प्रसिद्ध करावी असा त्यांचा विचार होता. पुन्हां भा. इ. सं. मंडळाचा उल्लेख केला पाहिजे. कारण त्या संस्थेनें वझे यांच्या प्रयत्नांचा पुरस्कार करून हिंदी शिल्पशास्त्र खंड १ ला हा ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढें दुर्दैवानें कै. वझे हे वारल्यामुळें तूर्त तरी शिल्पसंशोधनाचें कार्य महाराष्ट्रांत थांबल्याप्रमाणेंच आहे. खुद्द मराठी अमलांतील शिल्पाविषयीं अद्यापपर्यंत कांहींहि प्रयत्न झाला नाहीं. यादवांच्या वेळेपासून तों आतांपर्यंत मराठी शिल्प कसकसें वाढत, बुडत किंवा बदलत गेलें तें पाहणें उद्बोधक होईल. मंदिरशिल्प, गृहशिल्प, दुर्गशिल्प, नाविकाशिल्प वगैरे अनेक शाखांतील मराठी अमलांतील शिल्पांचे नमुने अजूनहि प्रयत्न केला तर

जतन करतां येतील. अभ्यास मागाहून होईल. पण आधीं ते जतन तरीं व्हावयास पाहिजेत. आमच्या संस्थानिकांचें याकडे अक्षम्य दुर्लक्ष आहे. ते रक्षण तर करीत नाहींतच, परंतु जुन्या शिल्पाचे नमुने मोडून टाकीत आहेत व मोडून टाकूं देत आहेत. महाराष्ट्रांत, येथल्याच भूमींतील वाढलेलें शिल्प विशेष कुसरीचें नाहीं; पठाणांच्या शिल्पाप्रमाणें तें साधें, भक्कम व ओबडधोबड आहे, विलासी व नाजूक नाहीं. शिल्पाचीं अनेक अंगें आहेत आणि हा विषय फार मोठा आहे. शिल्पाचा व्यवसाय करणारे लोक काव्यादिकांचा व्यवसाय करणाऱ्या लोकांपेक्षां द्रव्यदृष्ट्या अधिक संपन्न आहेत. त्यांच्या कर्तव्याची जाणीव देऊन त्यांस तदुन्मुख करण्याचा प्रयत्न करणारे एक वझे गेले, दुसरे केव्हां पुढें येतील ?

ज्योतिर्विदग्रणी कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित

ज्योतिषशास्त्राच्या शाखेंत कै. केतकर, कै. श्री. कृ. कोल्हटकर प्रभृतींनीं चांगलें कार्य केलें. परंतु कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं 'भारतीय ज्योतिष-शास्त्राचा इतिहास' प्रसिद्ध करून चिकित्सक विद्वत्तेचा जो झगझगीत आदर्श पुढें ठेविला त्याला क्वचितच तोड सांपडेल. पाश्चात्य विद्वानांनींहि तो पाहून माना डोलाविल्या. हा ग्रंथ म्हणजे मराठी संशोधकांच्या कर्तृत्वाची एक वंदनीय ध्वजा आहे.

चित्रकला

चित्रकलेचा अभ्यास हा नाण्यांच्या अभ्यासाप्रमाणें मराठी लेखकांनीं उपेक्षिलेला प्रांत होता. परंतु औंधच्या सुविद्य अधिपतींच्या प्रोत्साहनानें तेथील एक तरुण श्री. दाभाडे यांनीं भारतीय चित्रकलेवर एक लहानसा परंतु सुंदर प्रवेशक ग्रंथ तयार केला आहे. आरंभ झाला हें उत्तम झालें.

पद्धतिग्रंथ

इतिहासशास्त्रावर मराठींत विशेष वाङ्मय निर्माण झालें नाहीं. पूर्वी ग्रंथमालेंत (१९०५) रा. के. मो. पंडित यांनीं ऐतिहासिक पद्धतीवर एक लहानसा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. तदनंतर रा. बा. सी. बेंद्रे यांनीं 'साधनचिकित्सा'

नांवाचा ग्रंथ भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत ग्रंथमालेंत प्रसिद्ध केला. हा ग्रंथ नवीनास निःसंशय मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

लौकिक व प्राकरणिक इतिहास

अव्वल इंग्रजींत झालेलें ग्रँट् डफ्चें मराठी भाषांतर सोडून दिलें तरी बाळशास्त्री जांभेकर आणि रावसाहेब मंडलिक यांच्यासारख्या पट्टीच्या बुद्धिवान् माणसांनीं एल्फिन्स्टन्साहेबांच्या पुस्तकांवरून शालोपयोगी इतिहास रचण्याचेंच कार्य केलें. असे शालोपयोगी ग्रंथ त्या वेळीं नवीन पद्धतीचें शिक्षण सुरू झालें होतें, त्यासाठीं अवश्य होते. पुढें दुर्दैवानें शिक्षणांत इंग्रजी माध्यमाचा अवलंब करण्यांत आला, त्यामुळें बरेच दिवस शालोपयोगी इतिहासहि फारसे कोणीं लिहिले नाहींत. परंतु देशी भाषांचाच माध्यम या नात्यानें पुरस्कार लोकपक्षानें जोरानें केल्यावर अलीकडील पंधरा वीस वर्षांत शालोपयोगी इतिहासाचे बरेच ग्रंथ तयार होत आहेत. या ग्रंथांची रचना अर्थातच शालेय अभ्यासक्रमास अनुसरून केलेली असते. यामुळें हिंदुस्थानच्या इतिहासाबद्दल ठोकळ माहिती देणारे ग्रंथ कित्येकांनीं लिहिले आहेत. परंतु महाराष्ट्राचा इतिहास स्वतंत्रपणें शालेय अभ्यासक्रमांत समाविष्ट नसल्यामुळें तिकडे ग्रंथकारांची दृष्टि वळावी तितकी वळल्याचें दिसून येत नाहीं. शाळांत ज्यांचा इतिहास फार दिवस चालत होता ते कै. चिं गं. गोगटे यांनीं अकबर, औरंगझेब, नानासाहेब पेशवे, शाहू यांचीं चरित्रें प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांवरून व त्यांच्या किल्ल्यांच्या वर्णन-ग्रंथावरून त्यांस इतिहासव्यासंग प्रिय होता एवढें स्पष्ट म्हणतां येतें. स्वतंत्रपणें जेव्हां राष्ट्रीयशाळा स्थापण्याचा उपक्रम करण्यांत आला तेव्हां आमच्या शिक्षणक्रमांतील हें व्यंगहि दुरुस्त करण्याची साहजिकच खटपट झाली. तळेगांवच्या समर्थविद्यालयांतील रा. गोविंद अनंत मोडक यांनीं महाराष्ट्राचा एक लहानसा पण स्फूर्तिदायक इतिहास प्रसिद्ध केला. त्यांचा हा ‘ मुलांचा महाराष्ट्र ’ या नांवाचा ग्रंथ पुष्कळ लोकप्रिय झाला आहे. हा ग्रंथ लिहून रा. मोडक यांनीं मोठी उपयुक्त कामगिरी केली आहे.

साधारण लोकांच्या ज्ञानांत भर टाकावी आणि त्यांस आपल्या पूर्वजांच्या इतिहासाची गोडी लावावी या दृष्टीनें काम करणाऱ्यांत कै. धनुर्धारी ऊर्फ टिकेकर यांचा येथें उल्लेख केला पाहिजे. 'जवानमर्द ब्राह्मणभाई' व 'जवानमर्द मराठे गडी' या मालेंत लहान लहान पुष्कळ पुष्पें गोवून त्यांनीं आपल्या जोरदार लेखणीनें पूर्वजांबद्दल अभिमान जागृत केला. ऐतिहासिक चरित्रग्रंथांचा सविस्तर विचार येथें करावयाचा नसल्यामुळें रा. नागेश जिवाजी बापट प्रभृतींनीं 'थोरले बाजीरावसाहेबांचें चरित्र', 'संभाजी चरित्र' वगैरे जे ग्रंथ लिहिले त्यांचें ओझरतें स्मरण तरी वाचकांस देणें आमचें कर्तव्य आहे. धनुर्धारींच्याप्रमाणेंच 'मराठी आरमार', 'मराठे सरदार' इत्यादि कांहीं लहान लहान पुस्तकें रा. पारसनीस यांनींहि लिहिलीं होतीं. रा. पारसनीस यांस इतिहासाचा विशेष व्यासंग असल्यामुळें त्यांत माहितीचा भरीवपणा अधिक आढळतो. उलटपक्षीं धनुर्धारी व बापट यांच्या पुस्तकांत इतिहासापेक्षां भाषेचेंच सौंदर्य अधिक खुलून दिसतें. 'मराठ्यांचे बुंदेलखंडांतील पराक्रम', 'अयोध्येचे नबाब' अशीं रा. पारसनीस यांनीं लिहिलेलीं दोन पुस्तकें अद्यापहि वाचनीय आहेत. एखादा लहानसा ऐतिहासिक विषय घेऊन त्याचें सांगोपांग विवेचन करण्याचें काम आपल्याकडे जरी फारसें कोणीं केलें नाहीं, तरी 'मराठ्यांचा दरारा' किंवा 'श्रीरंगपट्टणची मोहिम', किंवा रा. पारसनीस यांचीं वर उल्लेखलेलीं पुस्तकें हीं ह्या सदरांतच घालावीं लागतील. कै. वासुदेव गोविंद आपटे यांनीं 'मराठ्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या' वर्णन करून त्यांचा दरारा बाहेरप्रांतीं कसा बसला होता, त्याचें मनोवेधक चित्र आपल्या पुस्तकांत काढलें आहे. कै. पारसनीस यांचें 'सवाई माधवराव यांचा दरबार' हें पुस्तक फार सरस उतरलें आहे. कांहीं नवीन अस्सल पत्रांची जोडहि त्यांनीं या छोट्या पुस्तकास दिली आहे. परंतु अशा प्रकारच्या पुस्तकांत रा. द. बि. आपटे यांनीं लिहिलेलें श्रीरंगपट्टणच्या मोहिमांचें पुस्तक ऐतिहासिक दृष्टीनें सर्वांत वरचढ ठरेल.

मुलांचा महाराष्ट्र प्रसिद्ध होण्यापूर्वीं प्रो. विजापूरकर यांच्या ग्रंथमालेंत निबंधमालाकारांचे धाकटे बंधु कै. लक्ष्मणराव चिपळूणकर यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाचा

एक भाग लिहून प्रसिद्ध केला होता. ह्या 'अभ्युदय' खंडांत ताराबाईच्या कारकीर्दीपावेतों हकिगत आलेली आहे. आमच्या बखरींच्या प्रसिद्धीमुळें डफच्या कृतीविषयीं जो असंतोष आमच्या नवीन विद्वानांस वाटूं लागला होता, त्यामुळें या ग्रंथाची रचना झाली. अस्सल कागदपत्रांचें युग सुरू होण्यापूर्वी बखरींच्या युगाच्या अमलांत तयार झालेला हा ग्रंथ लक्ष्मणरावांच्या प्रौढ व रोचक भाषेचा आपणांस प्रत्यय आणून देतो. कै. द. बा. करकरे यांच्याहि मनांत अनेक विभागात्मक असा एक मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची इच्छा होती. त्यांचा जो खंड प्रसिद्ध झाला आहे तो पाहिला असतां तो अगदींच सुमार उतरला आहे, म्हणून विसरून जाण्यास योग्य आहे. फेरिस्ताच्या आधारें कै. माधवराव लेले यांनीं लिहिलेला एक इतिहासहि प्रसिद्ध आहे. कै. विनायक कोंडदेव ओक यांनीं अनेकविध ग्रंथ लिहिले त्यांत 'हिंदुस्थानकथारस' आणि 'इतिहास-तरंगिणी' कैक पिढ्या विद्यार्थ्यांस अभ्यासावीं लागत असत. कै. ओक यांची बालबोध लेखनपद्धति हाच या ग्रंथांचा लक्षणीय विशेष होय.

कै. ओकांनीं मुलांच्याकरितां, तर लोकहितवादी कै. देशमुखांनीं प्रौढांकरितां विपुल वाङ्मय निर्माण केलें. दोघेहि दीर्घायुषी असून दोघांसहि लिहिण्याचा कंटाळा नसे. लोकहितवादी यांनीं टॉड्च्या 'ॲनल्स ऑफ राजस्थान' या ग्रंथावरून मराठींत राजस्थानचा एक मध्यम इतिहास लिहून प्रसिद्ध केला. तो अत्यंत वाचनीय झाला आहे. कारण वीर्यशाली रजपूत लोकांचा स्फूर्तिदायक इतिहास टॉड्नें मुळांतच समरसतेनें वर्णिला आहे, आणि लोकहितवादी यांनींहि तो तितक्याच सहृदयतेनें मराठींत उतरला आहे. हें खरें कीं, टॉड्चा इतिहास कथामय आहे; डफ्च्या पद्धतींत ही अद्भुतरम्यता नाहीं. राजस्थानचा नवा इतिहास प्रसिद्ध करण्याचें काम पंडित गौरीशंकर ओझा यांनीं धिम्मेपणानें चालविलें आहे. लोकहितवादींचा ग्रंथ हल्लीं मिळत नाहीं. एक मोठा सविस्तर परंतु 'वास्तविक' पद्धतीनें लिहिलेला राजस्थानचा इतिहास मराठींत व्हावयास हवा आहे.

लोकहितवादींनीं 'गुजराथचा इतिहास', 'लंकेचा इतिहास', 'सुराष्ट्र देशाचा इतिहास' हीं पुस्तकेंहि लिहिलीं आहेत आणि त्यांतील माहिती वाचनीय

आहे. गुजराथचा एक इतिहास मॅक्डोनल्ड्च्या पुस्तकावरून हि मराठींत झालेला आहे. रा. गणेश बळवंत मोडक यांनीं 'सौराष्ट्राचा इतिहास' मराठींत लिहिलेला आहे.

लोकहितवादींच्या ऐतिहासिक पुस्तकांत सर्वांत जास्त प्रसिद्धी त्यांनीं लिहिलेल्या 'ऐतिहासिक गोष्टीं'ची आहे. जातील तेथें लोकहितवादी हे अनेक विषयांवर माहिती गोळा करावयाचे हें ठरलेलेंच होतें. अशी गोळा केलेली ऐतिहासिक माहिती, 'ऐतिहासिक गोष्टी' या नांवानें तीन खंडांत प्रसिद्ध झालेली आहे. सरळ भाषा आणि सांगण्याची हौस, त्यांतून शेंकडों निरनिराळ्या प्रकारचे विषय—यामुळें ऐतिहासिक गोष्टींचे हे भाग वाचण्यास फार मनोरंजक वाटतात. रा. दामले, भावे, बर्वे, आपटे, वगैरेंनींहि कांहीं ऐतिहासिक गोष्टींचीं बारीकबारीक पुस्तकें लिहिलेलीं आहेत, परंतु लोकहितवादींच्या पंक्तीस यांतल्या कोणासहि बसवितां येत नाहीं. अलीकडे 'भाऊंच्या वीरकथा' या नांवाचें एक पुस्तक रा. जोशी यांनीं प्रसिद्ध केलें आहे. स्वतः हिंडून या उत्तरेकडे प्रचलित असलेल्या आख्यायिका जमा करण्याचा प्रयत्न खरोखर अभिनंदनीय आहे. जुन्या आख्यायिकांचा संग्रह करणें उत्तरोत्तर दुरापास्त होत आहे. जुनीं माणसें बहुतेक मेलीं, त्यामुळें आख्यायिका मिळविण्याचा तो मार्गहि बंद होत चालला आहे, आणि माहिती लिहून ठेवण्याची प्रथा आमच्या लोकांत विरळाच आढळते. अजून कोणी जर नवे लोकहितवादी पुढें येतील तर आम्हांस पाहिजे आहेत.

महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग

सेवेल्वरून रा. लेले यांनीं लिहिलेल्या विजयानगरच्या इतिहासाचा उल्लेख अन्यत्र केला आहे. विजयानगरच्या इतिहासाकडे महाराष्ट्राच्या दृष्टीनें पाहण्याचा एक अभिनव प्रयत्न कै. नारायण कृष्ण गद्रे यांनीं एका ग्रंथांत केलेला आहे. त्यांच्या ग्रंथाच्या नांवावरूनच त्यांच्या विचारांची दिशा कळून येण्याजोगी आहे. 'महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग' हें नांवच सांगतें कीं, महाराष्ट्रांत जी स्वराज्य-स्थापना झाली तिच्या उदयाची पार्श्वभूमि चित्रित करणें हा रा. गद्रे यांचा उद्देश आहे. विजयानगरचें अस्तंगत साम्राज्य आणि महाराष्ट्रांतील स्वराज्याचा उदय हीं

दोन्हीहि अदृश्य कार्यकारणभावानें निगडित असल्याचें प्रतिपादन रा. गद्रे यांनीं केलें आहे, तें सर्वथा समर्थनीय नसलें तरी तसेंच तें सर्वथा उपेक्षणीयहि नाहीं.

हिंदुपद्पादशाही

भिन्नभिन्न मतांचे आणि पंथाचे लोक यांनीं आपल्या मताच्या किंवा पंथाच्या दृष्टीनें गत इतिहासाचें समालोचन करणें, हें मनुष्यस्वभावास धरून आहे. मराठ्यांचा मुसलमानांनी लिहिलेला इतिहास किंवा इंग्रजांचा फ्रेंचांनीं लिहिलेला इतिहास–असे इतिहास साहाजिकच एकांगी असणार. आपला आपण लिहिलेला इतिहासहि एकांगीपणाच्या दोषापासून मुक्त होणें कठिण असतें. इतिहासकाराची निरंजन, निर्मल व निर्लेप दृष्टि ज्यास फुटली आहे असा दिव्यदृष्टि इतिहासकार महात्मा दुर्मिळच असतो. भिन्न भिन्न दृष्टि स्वीकारून लिहिलेले इतिहास एकांगी असले तरी उपयोगी असतात. ‘ हिंदुपदपादशाही ’ या नांवाचा जो ग्रंथ बॅ. सावरकर यांनीं लिहिला आहे, तो त्यांनीं हिंदूंचे एक पुढारी या नात्यानें लिहिला आहे. तो एक पूर्वपक्ष समजला पाहिजे.

मराठे व इंग्रज

मराठी राज्य गेल्याची शतसांवत्सरिक श्राद्धतिथि पाळण्याच्या निमित्तानें ‘ मराठे व इंग्रज ’ या नांवाचा जो विवेचक व ‘ दार्शनिक ’ ग्रंथ रा. न. चिं. केळकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला आहे, तो ज्यानें वाचला नाहीं असा सुशिक्षित महाराष्ट्रीय विरळाच सांपडेल. केव्हांना केव्हां तरी जो मनांत आल्याबांचून राहत नाहीं असा चटका लावून जाणारा विषय, चतुरस्त्र आणि विवेचक बुद्धि, प्रमाणबद्ध व मार्मिक विवेचनशैली आणि हृदयंगम, प्रौढ परंतु सुबोध भाषापद्धति, असा चोहों-बाजूंनीं मेळ बसल्यामुळें या ग्रंथाचा परिपाक अत्यंत स्वादिष्ट उतरला असल्यास नवल नाहीं. हा ग्रंथ इंग्रजींत लिहिला गेला असता तर अधिक उपयोगी झाला असता.

राहिलेंसाहिलें

वर ज्यांचा उल्लेख केला आहे त्यांखेरीज, ज्यांचा उल्लेख करावयास पाहिजे अशा आणखी कित्येक ग्रंथांचा व ग्रंथकारांचा येथें उल्लेख करतों.

इतक्यानेंहि लहानमोठ्या झाडून सर्व ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख केल्याचें श्रेय मिळवितां येणार नाहीं आणि तसा प्रयत्नहि येथें करावयाचा नाहीं. हें काम स्वतंत्र यादीचें आहे. कै. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं 'कोल्हापूर आणि कर्नाटकांतील राज्यें आणि संस्थानांचा इतिहास' चार भागांत प्रसिद्ध केला आहे; त्याचप्रमाणें रा. लिमये यांचे 'एतद्देशीय संस्थानांचा इतिहास,' व 'नेटिव्ह राज्यांचा इतिहास' आणि कृ. ब. गोडबोले यांनीं केलेला 'एतद्देशीय विद्यमान राज्यें, संस्थानें व जहागिरी यांचा इतिहास,' अशीं छोटीं छोटीं पुस्तकें मराठींत प्रसिद्ध झालीं आहेत. ती उपयुक्त असलीं तथापि ली वॉर्नर् प्रभृतींचीं इंग्रजी पुस्तकें आणि एचिसन्कृत तहनाम्यांचे खंड वगैरे या विषयावरील उपयुक्त सामग्री इतकी भरगच्च आहे कीं, तिचा उपयोग करून जर कोणी उद्योगी लेखक लिहावयास बसेल तर देशी संस्थानांच्या इतिहासाचे अनेक वाचनीय खंड तो प्रसिद्ध करूं शकेल. हैद्राबादसंस्थानासंबंधानें रा. शर्मा यांनीं प्रसिद्ध केलेलें पुस्तक अलिकडील काळाबद्दलच माहिती देणारें आहे. पण निदान तेवढें तरी पुस्तक निजाम राज्याच्या इतिहासावर व्हावयास पाहिजे आहे. 'भोपाळ संस्थानचा इतिहास' कै. माधव व्यंकटेश लेले यांनीं लिहिलेला आहे. 'जंजिरा संस्थानचा इतिहास' रा. बाळाजी केशव भोसले यांनीं लिहिल्याला बरींच वर्षे झालीं. जंजिरा संस्थानचे संग्रहीं पुष्कळ महत्त्वाचें कागदपत्र असण्याचा संभव आहे. मुंबई सेक्रेटरियट् आणि पुणें रेसिडेन्सी रेकॉर्ड् यांतील अप्रसिद्ध साहित्य जमेस घेऊन हिंदुस्थानांतील या एकमेव हबसाणी सत्तेचा मनोरम इतिहास तयार करतां येईल. 'बडोदें येथील राज्यकर्ते' या नांवाचें रा. परांजपे यांनीं लिहिलेलें पुस्तक प्रसिद्ध आहे. बडोदें संस्थानचे संग्रहींहि कागदपत्रांचा मोठा सांठा आहे. त्यांतील माहिती तपासून खंड प्रसिद्ध करण्याचें काम चालू आहे. कलकत्ता युनिव्हर्सिटीमार्फत कै. भाईसाहेब गुप्ते यांनीं रावजी आप्पाजीबद्दलची जी माहिती प्रसिद्ध केली आहे, तिचा व इतर माहितीचा उपयोग करून बडोदें राज्याचा नवा व मोठा इतिहास लिहिण्याजोगा आहे.

बडोद्याचे रा. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं 'अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें' या नांवाचें उपयुक्त माहितीचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. शिवाजीच्या

शहाण्णव कलमी बखरीचें सटीक पुनर्मुद्रण रा. वाकसकर यांनीं केलें आहे. रा. वाकसकर हे एक मार्मिक चिकित्सक आहेत आणि जरी सांप्रत शिवकालीन ऐतिहासिक मूल साहित्याच्या प्रामाण्याविषयीं व इतर आनुषंगिक प्रश्नांविषयीं त्यांचा आमचा तीव्र मतभेद आहे तरी त्यांचे परिश्रम केव्हांहि आदरणीयच ठरतील. सर यदुनाथ सरकार यांच्या पुस्तकावरून ' शिवाजी व शिवकाल ' या नांवाचें पुस्तक रा. वाकसकर यांनीं लिहिलेलें प्रसिद्ध आहे.

आमच्या मतें जगाच्या इतिहासाकडे दुर्लक्ष्य केल्यामुळें आमचें अपरिमित नुकसान झालें आहे. अद्यापहि नांव घेण्याजोगा असा जगाचा एकहि इतिहास मराठींत कोणीं लिहिला नाहीं, हें आमचें दुर्दैव होय. विंचूरकर घराण्याचा इतिहास लिहिणारे रा. हरि रघुनाथ गाडगीळ यांनीं जगाचा एक संक्षिप्त इतिहास मागें प्रसिद्ध केला होता. रा. जनार्दन बाळाजी मोडक यांच्याहि नांवावर एक जगाचा छोटा इतिहास मोडतो. आमच्या मतें कॉलेज्च्या पहिल्या वर्षांत जगाचा इतिहास सक्तीनें शिकवावा आणि या विषयावर विद्वानांनीं विशेष लक्ष्य पुरवावें. प्राचीन, मध्ययुगीन, व अर्वाचीन असा जगाचा इतिहास समोर असल्याशिवाय त्या त्या काळचा जगाचा कोणत्याहि भागाचा इतिहास लिहिला तर त्यांत मानवी प्रगतीचें योग्य मोजमाप आपणांस आढळणार नाहीं. मानवी प्रगतीवर एक चिमुकलें परंतु साध्या, सोप्या आणि सरळ पद्धतीनें लिहिलेलें पुस्तक रा. चिं. ग. कर्वे यांचें झालेलें आहे. मोठ्या पुस्तकाची मोठी जरूरी आहे. ' महाराष्ट्र संस्कृती'चा परिचय करून देणारें प्रो. शं. दा. पेंडसे यांचें पुस्तक वाचकांस अतिशय आवडलें आहे. या हि विषयावर विस्तृत ग्रंथ व्हावयास पाहिजे.

मागें संस्थांचा उल्लेख केला त्यांत श्रीसंभाजी-चरित्र-कार्यालय व श्रीशिव-चरित्र-कार्यालय या संस्थांचा उल्लेख करावयाचें राहिलें. पुण्यश्लोक श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचा त्रिशत सांवत्सरिक उत्सव एकदां जुन्या तिथीप्रमाणें व एकदां नव्या तिथीप्रमाणें असा दोन वेळ महाराष्ट्रानें साजरा केला. या दोन्ही प्रसंगीं ग्रंथप्रसिद्धि हें एक उत्सवाचें प्रधान अंग ठरविलें होतें. मुंबईस रा. सरदेसाई

यांनीं संपादकीय काम आपणांवर घेऊन इंग्रजी-मराठी शिवस्मृति-ग्रंथ प्रसिद्ध केला. पुढें पुण्यास मागाहून उत्सव झाला त्यासाठीं रा. दत्तोपंत आपटे यांनीं रा. न. चिं. केळकरांच्या साहाय्यानें श्रीशिवचरित्र-कार्यालयाची स्वतंत्र स्थापना केली. या कार्यालयाच्या संशोधनी व संकलनी कार्याला भारत-इतिहास-संशोधक-मंडळ व रायगड-स्मारक-मंडळ या उभय संस्थांचा आत्मिक पाठिंबा होता. शिवचरित्र-कार्यालयानें 'पत्र-सार-संग्रहा'चे दोन खंड प्रसिद्ध करून सर्व विश्वसनीय पत्र-व्यवहारी साहित्य—कीं ज्याचा संबंध शिवाजी व त्याचे पूर्वज यांशीं आहे—त्याचप्रमाणें त्याची कालक्रमवार सारांश-जंत्री अभ्यासकांस उपलब्ध करून देऊन शिवचरित्राचा शास्त्रीय व सप्रमाण अभ्यास करण्याचा चोख मार्ग घालून दिला. डॉ. सेन यांचा शिवचरित्रात्मक इंग्रजी खंड, डॉ. बाळकृष्ण यांचें सचित्र इंग्रजी शिवचरित्र श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांचें सचित्र शिवचरित्र, शिवाय शिवचरित्र निबंधा-वलीचे महत्त्वाच्या संकलनपर निबंधांचे दोन मोठाले खंड आणि शिवचरित्र-साहित्याचे नवे खंड असे फार बहुमोल ग्रंथ प्रसिद्ध केले. पण सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन् शिवाजी' हा होय. यांत शिवाजी व शिवकाल या बाबतींची इंग्रजी दप्तरांतील समकालीन माहिती विलायतेंतून मुद्दाम आणवून प्रसिद्ध केली आहे. हा बारीक अक्षरांचा हजार पानांचा ग्रंथ प्रत्येक शिवचरित्र-जिज्ञासूच्या संग्रहीं असावयास पाहिजे.

श्रीशिवचरित्र-कार्यालयानंतर रा. वा. सी. बेंद्रे यांनीं 'श्रीछत्रपति संभाजी कार्यालय' हें कंपनीरूपानें स्थापन केलें. कैक वर्षे भा. इ. स. मंडळांत रा. बेंद्रे आपलें संशोधनकार्य मेहनतीनें करीत होते. संभाजी-चरित्रापुरता विशेष अभ्यास करण्याचें निश्चित करून त्यांनीं सर्व संभाजीविषयक साहित्य कसून अभ्यासण्यास सुरुवात केली. ते त्यांचे परिश्रम आश्चर्यकारक आहेत. केशव पुरोहिताच्या 'राजाराम चरितम्' या समकालीन ग्रंथाचा शोध लावून आणि 'गोवळकोंड्याची कुतुब-शाही'सारखे चिकित्सात्मक सूक्ष्म प्रस्तावनेचे मुख्य ग्रंथ प्रसिद्ध करून रा. बेंद्रे यांनीं आपली सूक्ष्म दृष्टि, प्रमाणपरीक्षणशक्ति आणि विलक्षण परिश्रम यांची भरपूर साक्ष

दिली आहे. ते सरकारी नोकरींत विद्याखात्यांत परंतु कारभारी शाखेंत आहेत असें असून त्यांनीं संशोधकांत एवढा दर्जा प्राप्त करून घेतल्याबद्दल सरकारासहि आतां कौतुक व अभिमान वाटत असून रा. बेंद्रे यांस मोठी पगारी रजा मंजूर करून सरकार त्यांस परदेशांत संशोधनाभ्यासासाठीं जाण्यास साहाय्य करण्यास सिद्ध झालें आहे. संशोधनाकडे सरकारची कृपादृष्टि अनुकूल झाली आहे हें पेशवे दप्तर, सातारा संस्था व बेंद्रे यांच्या उदाहरणांवरून व अखिल भारतीय आधुनिक परिषदेस त्यांनीं दाखविलेल्या हार्दिक सहानुभूतीवरून प्रत्ययास येऊं लागलें आहे. हें सुचिन्ह जर असेंच वाढीस लागलें तर भरघोंस सुफळें पदरांत पडतील अशी आशा करण्यास चिंता नाहीं. ‘ आनंदवन-भुवन-ग्रंथमाला ’ या नांवानें आमचे मित्र रा. आबा चांदोरकर व श्री. आबासाहेब बावडेकर इनामदार या उभयतांनीं जें कार्य चालविलें आहे तेंहि उपयुक्त आहे. या उभयतांनीं ‘ लेखनालंकार ’ नांवाचें एक सुंदर व उपयुक्त पुस्तक काढलें आहे तें प्रत्येक महाराष्ट्रेतिहास-भक्तांत संग्राह्य झालें आहे. यांत आपल्या अनेक संस्मरणीय थोर मराठे पूर्वजांचीं दर्शनें हस्ताक्षररूपानें आपणांस मिळावींत अशी सोय केली आहे. यांतील श्रीशिवाजी महाराजांचें हस्ताक्षर अद्यापि कायम झालें असें मानतां येत नाहीं. आम्हांस तरी कांहीं बाबतींत संपादकांचें मत ग्राह्य वाटत नाहीं.

ग्रामसंशोधनाला उपयोगीं असा एक ग्रंथ कै. अत्रे यांनीं ‘ गांवगाडा ’ नांवाचा लिहिलेला प्रसिद्ध आहे. तो एक मराठींत अपूर्व नवाईचा ग्रंथ आहे. अत्रे हे एन्थोवेन्चे मदतनीस होते. परंतु हा ग्रंथ म्हणजे मराठी वातावरणाचा शुद्ध नमुना आहे. खाजगी प्रयत्नांत जुनें साहित्य जमविण्यांत महाराष्ट्रीयांत तरी रा. थत्ते व रा. शं. ग. दाते यांचे प्रयत्न कौतुकावह म्हणून नमूद करण्यासारखे आहेत. रा. थत्ते यांचे वडील रा. प. ह. थत्ते यांस संशोधन व ग्रंथलेखन यांचा नाद फार जुना आहे. वेदकालोत्पत्ति हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. आणखी पुष्कळ ग्रंथ लिहून पडले आहेत. श्री. सरदार आंग्रे यांचे योजनेवरून ‘ मराठ्यांचा आरमारी इतिहास ’ रा. थत्ते यांनीं लिहून ठेवलेला आहे. लेखक इतके वृद्ध व परिश्रमी आहेत तथापि त्यांचा उत्साह वर्णनीय आहे.

पूर्वी कै. त्र्यं. गु. काळे हे एक चांगले संशोधक आमच्यांत होऊन गेले. त्यांचा विषय पुराणसंस्कृति. त्यांनीं लिहिलेले पुराणनिरीक्षण, रामायणनिरीक्षण वगैरे ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेची व व्यासंगाची साक्ष देतात. आतां 'पुराणें संशोधण्याचें कार्य.' रा. विष्णु रघुनाथ करंदीकर यांनीं अंगावर घेऊन नर्मदासंस्कृतिची उपपत्ति पुढें मांडून नर्मदा व्हॅली रिसर्च संस्थाहि त्यांच्या परिश्रमानें अस्तित्वांत आली आहे. पुराणसंस्कृति शाखेंत रा. चिं. वि. वैद्य यांच्या रामायणाच्या कोड्यावरील ग्रंथ भाषांतरित झाला आहे. कै. काशीनाथशास्त्री लेले यांनीं धर्म-मासिकांतून जे कित्येक लेख लिहिले होते ते संशोधनास कांहीं अंशीं उपयुक्त आहेत. शिवाय ऋग्वेदांत आफ्रिकेचे उल्लेख व नीलनदीचें वर्णन आढळतें, इत्यादि कांहीं महत्वाचे शोध कै. लेलेशास्त्री यांनीं केले होते. ते फार बुद्धिवान् व कर्ते होऊन गेले यांत शंका नाहीं.

वेदसंहिता संशोधनाचें कार्यहि पुण्यास वैदिक संशोधक-मंडळामार्फत चालू आहे. विद्वद्वर्गांत या कामाची प्रतिष्ठा चांगली लागेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. टिळकांच्या 'आर्यांचें मूलस्थान' विषयक शोधांचें पुस्तक मराठींत रा. ओगले यांनीं केलें आहे. पण कुंट्यांचा 'व्हिसिसिट्यूड ऑफ आर्यन सिव्हिलिझेशन'वरील ग्रंथ मात्र मराठींत आला नाहीं. त्यांची 'षट्दर्शनचिंतनिका' किंवा पंडितांचा 'वेदार्थयत्न' हे लक्षांत ठेवण्यासारखे प्रयत्न झाले. आपल्या पुराणसंस्कृतिभागांत सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं केलेलें काम मात्र फार वाखाणण्यासारखें झालें आहे. त्यांनीं 'चरित्रकोशमंडळ' स्थापून प्राचीन चरित्रकोशाचा खंड प्रसिद्ध केला आहे. असा कोश मराठींत काय परंतु युरोपियन भाषांतहि झाला नाहीं अशी ग्वाही तज्ज्ञ देतात! आतां चित्रावशास्त्री यांचें लक्ष मध्ययुगीन खंडाकडे वळलें आहे! मोठें कार्य आहे. परंतु चित्रावशास्त्रींची निष्ठा, उत्साह व प्रयत्न दांडगे आहेत, यश त्यांतच आहे.

पंचांगसंशोधनाचे निमित्तानें मराठी वर्तमानपत्रांतून, मासिकांतून व कांहीं पुस्तक-पुस्तिकांच्या द्वारां पुष्कळच संशोधन झालेलें आहे व नवीन करणग्रंथहि रा. दप्तरींसारख्या नाणावलेल्या अनेक शास्त्रकोविदांकडून करविण्यांत आलेले आहेत. रा. पटवर्धनद्वय, प्रो. नाईक, प्रो. आपटे (उज्जयिनी) वगैरे लेखक

यांनीं मराठी वाङमयांत अनेक लेखद्वारें भर घातली आहे. याच शोधाच्या मार्गांत बियावर येथील मिद्मलाल व्यासांच्याकडील जुनाट कुंडलीसंग्रह मिळून श्रीशिवछत्रपतींची समकालीन जन्मकुंडली मिळाली !

ज्योतिषशास्त्राप्रमाणें आयुर्वेद संशोधनहि महाराष्ट्रांत बरेंच चालू आहे. या विषयाचीं स्वतंत्र मासिकें आहेत. वर्तमानपत्रांतूनहि वादचर्चा होतात. वैद्यक मंडळेंहि आहेत. परंतु पुण्यास वे. नानलशास्त्री यांनीं एक आयुर्वेदीय रुग्णालय व एक औषधी शाळा काढून जे प्रयत्न चालविले आहेत त्यांचें योग्य संवर्धन केल्यास शास्त्रीय दृष्टीची चांगली कामगिरी होईल. वे. गंगाधरशास्त्री जोशी यांनीं 'धमनी संशोधना'चा वाद उपस्थित करून जें कार्य चालविलें आहे तें उपयुक्त व अधिक संशोधनास चालना देणारें आहे.

जंत्री

इतिहासाचा एक डोळा म्हणजे काळ! त्याच्या निश्चितीच्या पायावर पुढली इमारत. काल-निश्चयासाठीं फार श्रम पडतात. त्याला सूक्ष्म गणिताची आवश्यकता असते. ती सर्व मेहेनत करून जे गाणितिक 'जंत्र्या' वगैरे रचतात त्यांचे समाजावर व विशेषतः संशोधकांवर अगणित उपकार होतात. आपल्याकडे ज्योतिषाचा व्यासंग प्राचीन काळापासून आहे. अव्वल मराठींत घराऊ दप्तरांत कांहीं जंत्र्यांचीं पानें सांपडतात. पुढें इंग्रजींत पटेलची जंत्री वगैरे मराठी इंग्रजी जंत्र्या झालेल्या आहेत. पण सर्वांत प्रसिद्ध जंत्री प्रो. मोडक यांची; पण ती शिवकालीन कालाला उपयोगी पडत नाहीं. कारण ती शके १६५० पासून सुरू होते. म्हणून शके १५५० ते १६५० या शंभर वर्षांचें सूक्ष्म गणित तिथि किंवा पर्वावरून करण्यासाठीं कै. गणेश सखाराम खरे हे सतत दोन हजार तास खपले! जंत्रीचा दीपस्तंभ त्यांनीं उभा केला! रा. ब्रेंदे यांनीं 'तारीख इ इलाही', जी इंग्रजींत प्रसिद्ध केली आहे, ती त्यांच्या परिश्रमाची साक्ष देत आहे. रा. दत्तोपंत आपटे यांची छोटी जंत्री त्यांच्या गणिती डोक्याची व कल्पकतेची साक्ष पटवीत आहे. अलीकडे दि. ब. स्वामिकन्नूपिले यांची एफिमिराज् इंग्रजींत झाल्यापासून जुन्या

जंत्र्या मार्गे पडल्या आहेत. तथापि सेवेल व शं. बा. दीक्षित यांचीं नांवें जंत्री-अभ्यासक केव्हांहि आदरानेंच घेतील.

सिद्धेतिहास

घटित व घटना

इतिहासाचें[१] संशोधन झाल्याशिवाय इतिहासाचें विरचन करतां येत नाहीं. ऐतिहासिक घटितें कार्यकारणभाव दाखवून पूर्वापरसंबंधपूर्वक यथातथ्य वर्णन करणें हें इतिहासविरचकाचें प्राथमिक काम होय. हें योग्य प्रकारें बजाविण्यास परिश्रमाची अत्यंत आवश्यकता असते. या कार्याला पायाभूत जें संशोधन तें जर उच्च दर्जाचें झालें असेल आणि कालस्थलव्यक्तिविषयक निश्चिती सुदृढ स्वरूपाची तयार झाली असेल तर या निश्चित घटितांचें वृत्तसंकलन करणें बरेंच सुसाध्य होतें. परंतु साधनांच्या आणि संशोधनाच्या अभावीं ती घटित-सामग्री पुष्कळदां अधुरी असते. म्हणून ज्यांच्याविषयीं ही निश्चिती बरीच परिपक्व दशेला गेली असेल अशा घटना निवडून त्यांचें संकलन आधीं करण्याचा संप्रदाय आहे. अनेक घटितें[२] मिळून एक घटना[३] बनत असते व अनेक घटनांचें संकलन करून इतिहास रचावयाचा असतो, असें सामान्यपणें म्हणतां येईल.

व्यवहारांत घटितांची व घटनांची स्थलकालव्यक्तिनिश्चिती एकीकडे चालू असते, त्याच वेळीं सिद्ध निश्चितींच्या साहाय्यानें त्यांचें संकलन करण्याचें कामहि चालू ठेवावें लागतें. निश्चितींचा संग्रह वाढेल तसतसें संकलनहि पुनः पुनः करावें लागतें. येणेंप्रमाणें संशोधन आणि संकलन हीं दोन्ही कार्यें एकसमयावच्छेदेंकरून चालत असतात.

संकलन

संकलनांतहि स्थूल, सूक्ष्म असे दोन प्रकार असतात. स्थूलाला राजवाड्यांच्या भाषेंत ‘ भौतिक ’ आणि सूक्ष्माला ‘ आत्मिक ’ अशीं नांवें आहेत. (म. इ.

---

१. म. सा. संमेलन, बडोदें, इतिहासविभागाध्यक्षांचें भाषण पाहा.

२. घटितें=Facts. ३. घटना= Event.

साधनें खं. १, प्रस्तावना, पृ. २८). भौतिक संकलन करणाऱ्यापेक्षां आत्मिक संकलन करणाऱ्याच्या ठायीं तीव्र व कुशाग्र बुद्धीची फारच आवश्यकता असते, किंबहुना आत्मिक संकलन करणारा द्रष्ट्याच्या कोटींतील असावा लागतो. वास्तविक त्याच्या कार्यास संकलन हा शब्द लावण्यापेक्षां दर्शन हा शब्द लावणें अधिक समुचित होईल. सुदृढ अशा भौतिक संकलनाच्या पायावर आत्मिक दर्शनाची उभारणी जेथें आढळते तो इतिहास 'आगम' पदवीप्रत पोहोंचतो आणि असा दार्शनिक इतिहासकार धन्य समजला जातो.

असा सर्ववंद्य द्रष्टा इतिहासकार आपणांमध्यें अजून व्हावयाचा आहे. राजवाडे आणि रानडे यांच्या ठिकाणीं या कोटीची पात्रता स्पष्ट दिसून आली होती. रानड्यांनीं 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या आपल्या इंग्रजी प्रबंधांत आपल्या बुद्धीची चुणूक दाखविली होती. ग्रंथमालेमध्यें रानड्यांच्या या प्रबंधाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें आहे. राजवाड्यांच्या प्रस्तावनांतून त्यांच्या सामर्थ्याचा प्रत्यय येतो. तथापि महाराष्ट्र इतिहासाच्या भौतिक संकलनाचाच पाया अद्यापि निरुंद व डळमळीत आहे. राजवाड्यांनीं, तोच रुंद, खोल व व्यापक करण्याची कामगिरी आधीं केली पाहिजे, हें ओळखून तसे प्रयत्न केले. तथापि मागें सांगितल्याप्रमाणें तेवढ्याकरितां संकलनाचें काम अगदीं बंद ठेवतां येत नाहीं. आपल्या रोजच्या गरजा 'यथामीलितोपचारैः' भागवून घेतल्या पाहिजेतच. मोठा दगडी बंगला तयार होईपावेतों ज्याप्रमाणें आपणांस उघड्यावर राहतां येत नाहीं, तर कांहीं तरी निवाऱ्याची सोय करावी लागते, तसेंच येथें आहे. नुसतें संशोधनच चाललें आणि संकलन कोणींच केलें नाहीं तर आपली स्थिति फारच अनुकंपनीय होईल. वर्तमान काळावर नजर दिली तर संशोधकापेक्षां संकलनकारच आपल्या रोजच्या सृष्टींत अधिक उपयोगाचा असतो.

रियासतकार सरदेसाई

महाराष्ट्राच्या समग्र इतिहासाचें संकलन करण्याचें अत्यंत जबाबदारीचें व परिश्रमाचें कार्य हें आपलें जीवितकार्य मानून तदर्थ आज सुमारें चाळीस वर्षे

ज्यांनीं आपले प्रयत्न चिकाटीनें चालू ठेवले आहेत ते रावसाहेब गोविंद सखाराम सरदेसाई यांचें नांव साक्षर महाराष्ट्रास सर्वश्रुत आहे. त्यांच्या 'रियासत'मालेवरून 'रियासतकार' ही सार्थ पदवी लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें त्यांस दिली आहे. मुसलमानी रियासत, मराठी रियासत व ब्रिटिश रियासत यांप्रमाणें आपल्या इतिहासाचे तीन विभाग रा. सरदेसाई यांनीं पाडले आहेत. मुसलमानी विभागांत सर्व मुसलमान-शाह्यांचा इतिहास संकलित केला आहे, आणि ब्रिटिश रियासतीचा पूर्वार्धच पुरा झाला आहे. अलीकडे रा. सरदेसाई यांचें लक्ष विशेषेंकरून मराठी रियासतीवरच खिळलेलें आहे. एकीकडे संशोधन अनेक अंगांनीं जोरानें पुढें सरकत आहे व दुसरी-कडे सरदेसाई हेहि आपला उद्योग नेटानें पुढें चालवीत आहेत. मध्यंतरीं मराठी कागदपत्रांचा सर्वांत मोठा सांठा असलेलें जें पेशवे दप्तर त्यांत प्रवेश मिळण्याची संधि रा. सरदेसाई यांस मिळाली. तिचा फायदा घेऊन रा. सरदेसाई यांनीं मुंबई सरकारच्या मार्फत पेशवेदप्तरांतून ऐतिहासिक सामग्रीचे पंचेचाळीस खंड प्रसिद्ध करविले आणि सांप्रत रेसिडेन्सी दप्तरांतील साधनांचे खंड सर यदुनाथ यांच्या पुरस्कारानें प्रसिद्ध करण्याच्या खटपटींत ते व्यग्र आहेत. सत्तरी ओलांडल्यावरहि रा. सरदेसाई यांचा उद्योग प्रत्यहीं वाढतच आहे. सरदेसाई यांच्या रियासतींनीं त्यांचें नांव महाराष्ट्राबाहेरहि मशहूर झालें आहे. त्यांच्या मराठी रियासतीची नवी आवृत्तिहि तयार होत आहे. महाराष्ट्राचा समग्र इतिहास म्हणून रा. सरदेसाई यांची रिसायत एवढी एकच निर्देशण्यासारखी आहे.

रा. सरदेसाई यांच्या रिसायतींत प्रायः राजकीय घडामोडींचेंच संकलन आहे. हिंदुस्थानच्या इतिहासाबद्दल उपलब्ध सामग्रीच्या मानानें हें संकलन आणखीहि विस्तृत करण्यास पुष्कळ वाव आहे, असें आम्हांस वाटतें आणि तसें स्वास्थ्य लाभलें तर रावसाहेब सरदेसाई हे देखील तसा उद्योग करतील. मागें सुचविल्याप्रमाणें घटितनिश्चिती आणि घटनासंकलन हीं कार्यें आपणाकडे अजून व्हावयाचींच आहेत. यामुळें रावसाहेब सरदेसाई यांच्यासारख्यांस नुसत्या 'भौतिक' घटनांचें संकलन करतांना स्थल-काल-व्यक्ति-निश्चयासाठीं स्वतंत्र परिश्रम करावे

लागतात. नुसत्या साधनांच्या प्रसिद्धीनें संकलनाचें काम बरेंच अवघड होतें. लहानलहान संशोधनपर खंडग्रंथ आजहि पुष्कळ व्हावयास पाहिजे आहेत. म्हणजे साधनविचिकित्सा बरीच आकाराला येईल आणि तसें झालें म्हणजे व्यापक इतिहासाचें संकलन कमी त्रासाचें होईल. निरनिराळ्या कालखंडांचें अधिकारी संकलन जर आधीं तयार होईल तर भावी इतिहासकारांस आपलें काम पुष्कळच सोपें जाईल आणि त्यांच्या हातून होणाऱ्या पुष्कळ चुका टळतील.

डॉ. श्री. व्यं. केतकर

प्राचीन इतिहासाचें संकलन रा. सरदेसाई यांनीं विशेषसें केलें नाहीं. तें काम हल्लीं डॉ. केतकर यांनीं अंगावर घेतलें आहे. भौतिक व आत्मिक दोन्ही पद्धतींनीं इतिहासाचें विरचन करण्यास लागणारें बुद्धिवैभव, चिकाटी, व चिकित्सा डॉ. केतकर यांजपाशीं भरपूर आहेत. त्यांच्या 'प्राचीन महाराष्ट्रा'चा एक खंड प्रसिद्धहि झाला आहे, व पुढील खंडांची तयारी चालू आहे. सरदेसाई यांनीं घेतलेल्या कालखंडापेक्षां डॉ. केतकर यांनीं घेतलेल्या कालखंडाच्या इतिहासांत निश्चितीचें प्रमाण अल्पतर आहे. तथापि त्यांचें एकंदर लिहिणें विचारप्रवर्तक आहे. मराठींत ज्ञानकोश रचण्याचा जो प्रचंड उद्योग डॉ. केतकर यांनीं केला त्यांत बरेंच फुटकळ ऐतिहासिक संकलन झालें आहे. जातिविषयक, स्थलविषयक, व्यक्तिविषयक वगैरे पुष्कळ माहिती अनेक ग्रंथांतून संकलित करून ज्ञानकोशांत देण्यांत आली आहे. या ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडांत बुद्धकालीन व वेदकालीन संस्कृतीचें विस्तृत संकलन करण्यांत आलें आहे.

डॉ. भांडारकरांच्या दख्खनच्या इतिहासाचें एक बटबटीत मराठी भाषांतर रा. बापटशास्त्री यांनीं केलेलें प्रसिद्ध आहे. 'प्राचीन भरतभूमि' या नांवाचें एक पुस्तक पाहण्यांत आहे. त्याची रचना बहुतेक कै. बाबू रमेशचंद्र दत्त यांच्या ग्रंथास अनुसरून केलेली आहे. प्रो. कोसंबी यांनीं बुद्ध, बुद्धसंघ, व बुद्धकाल यांसंबंधीं छोटे परंतु मननीय ग्रंथ लिहिलेले आहेत. डॉ. आळतेकर यांनीं 'नवभारतमाले'साठीं

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीवर एक ग्रंथ मराठींत लिहिला आहे. काथवटे यांचा एक 'भरतखंडाचा प्राचीन इतिहास' प्रसिद्ध आहे.

श्री. चिंतामणराव वैद्य

महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास लिहिण्याचें काम श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं तीन मोठाल्या खंडांत उत्तम तऱ्हेनें पार पाडलें आहे. बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि परिश्रम यांच्या जोडीला चिंतामणरावांच्या ठिकाणीं न्यायनिपुणता हा दुर्लभ गुण असल्यामुळें त्यांच्या मध्ययुगीन इतिहासाची योग्यता बरीच मानण्यांत येते. येणेंप्रमाणें प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासाच्या संकलनाची मराठींतील परिणति वर उल्लेखिली आहे; आणि या तिन्ही ग्रंथकारांनीं मिळून केलेली कामगिरी पुष्कळ श्रेष्ठ प्रतीची आणि मराठी भाषेंतील ज्ञानवैभव वाढविणारी अशी आहे.

भारतीय साम्राज्यकर्ते पावगी

येथेंच कै. रावसाहेब नारायण भवानराव पावगी यांच्या 'भारतीय साम्राज्य' मालेचा उल्लेख करणें योग्य होईल. रावसाहेब पावगी यांनीं आपलें बहुतेक आयुष्य या मालेचे ग्रंथ रचण्यांत व्यतीत केलें. त्यांचे इंग्रजी ग्रंथ सोडले तरी पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून त्यांच्या भारतीय साम्राज्यमालेचे १०।१२ खंड आहेत. आर्यसंस्कृतीचा नितांत अभिमान व ग्रंथकाराची बाणेदार वृत्ती हे या मालेचे विशेष म्हणून सांगतां येतील. वेद, वेदांगें, पुराणें, प्राचीन कला, शास्त्रें, गृहस्थिति वगैरे आर्यसंस्कृतीच्या विविध अंगांविषयीं माहिती देऊन अभिमान उत्पन्न करणें हा या मालेचा उद्देश आहे. शके १८१५ पासून ४० वर्षें श्री. पावगी यांनीं आपला उद्योग एखाद्या वानप्रस्थ ऋषीप्रमाणें शांतपणें व बाणेदारपणें एकट्याच्या हिमतीवर चालविला. वैद्य, सरदेसाई व पावगी या सततोद्योगी वानप्रस्थ मुनींना त्रिवार धन्यवाद असोत.

संघीकरणाचें युग

भा. इ. सं. मंडळाची स्थापना

व्यक्तींच्या कामाचें वर्णन येथवर यथामति केलें आहे. या व्यक्तींपैकीं राजवाडे यांचा संशोधन हा केवळ हौशीचा (hobby) विषय नसून राष्ट्रसेवेचें आणि राष्ट्रो-

द्धाराचें एक साधन या दृष्टीनें या कामींच त्यांनीं आपलें आयुष्य वाहिलें होतें. आपल्या राष्ट्राच्या उद्धाराविषयीं ते अहर्निश तळमळत असत आणि उद्धारक उपायांसंबंधानें चिंतन करीत असत. या चिंतनाच्या योगानें आपल्या राष्ट्रास "नियंत्रणेचें" (organisation) बळ आपल्या अंगीं आणिलें पाहिजे आणि यास्तव निरनिराळ्या शाखांत देशोद्धाराची खटपट करण्यास संस्था स्थापिल्या पाहिजेत, हें मत कळकळीनें प्रतिपादून त्यांनीं आपल्या विषयासंबंधानें त्यांतील शोधक, धनिक, जिज्ञासु व अभ्यासक या सर्वांची नियंत्रणा करण्यासाठीं पुण्यास कै. श्रीमंत सरदार तात्यासाहेब मेहेंदळे यांच्या मदतीनें आषाढ शु. १ शके १८३२ या दिवशीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळाची स्थापना पुणें येथें केली. या गोष्टीला आज पंचवीस वर्षें झालीं. इतक्या वर्षांत या संस्थेनें आपल्या मालकीची मोठी इमारत व वस्तुसंग्रहालय बांधून त्यासाठीं आज पंचवीस वर्षांत सुमारें एक लाख रुपये खर्च केले आहेत. एवढा मोठा प्रयत्न केवळ लोकाश्रयावर केला. असें उदाहरण आमच्या माहितींत हिंदुस्थानांत इतिहास-विषयांत दुसरें नाहीं. सरकार, विद्यापीठें व राजेरजवाडे यांच्या उदार मदतीशिवाय अशीं कामें क्वचितच सिद्धीस जातात. राजवाडे यांनीं इतिहासविषयाची जी व्यापक कल्पना महाराष्ट्रसमाजापुढें मांडिली आहे त्या धोरणास अनुसरून महाराष्ट्राच्या पूर्व-जीवनाच्या ज्या ज्या शाखांचें जें जें साहित्य उपलब्ध होईल त्याचा त्याचा संग्रह करून आणि सत्य-मिथ्या-परीक्षण करून तद्वारां काल-स्थलादि निर्णय करणें हा जो संशोधनाचा प्राथमिक पाठ तोच राजवाडे यांनीं केवळ मराठी शिकलेल्या शाळामास्तरांपासून तों तहत चुकूनमाकून इकडे वळलेल्या पाश्चात्य विद्याविभूषितांपर्यंत सर्वांस दिला. हें बीं हळुहळू व चांगलें रुजून वाढीला लागत आहे आणि त्यामुळें पुरावा आणि प्रमाण शोधण्याची हौस आणि पारखण्याची कुवत ही महाराष्ट्रांत उत्पन्न झाली असून या गुणांची दूर दृष्टीनें पुढील जोपासना केल्यास सर्व हिंदुस्थानाला एक आदर्श होईल. आणि इतरांनीं अनुकरण करून दाखविण्याचें एक आदरणीय क्षेत्र महाराष्ट्रांत तयार झालें असें होईल. 'तेलातुपाचीं पत्रें' अशी ज्यांची मोठमोठ्या विद्वानांनींहि हेटाळणी केली तीं छापीत छापीत आणि टीकाकारांचे आघात मुकाट्यानें सोशीत सोशीत

राजवाड्यांनीं आपल्या विद्वत्तेचें आणि प्रतिभेचें खतपाणी घालून त्याच पत्रांचें महत्त्व व उपयुक्तता अप्रत्यक्षपणें लोकांना पटवून देऊन तो अभ्यास वाढीला लाविला. हें त्यांचें जीवनकार्य संस्मरणीय असेंच झालें आहे. खरे, साने, पारसनीस, सर्वांनीं परिश्रम केले, पण इतिहाससंशोधनाची जागती परंपरा निर्माण करण्याचें श्रेय एकट्या राजवाड्यांसच आहे; आणि अखिल हिंदुस्थानापुढें अभिमानानें ठेवण्याजोगा आणि अनुकरणीय असा हा प्रयत्न झाला आहे असेंच विचारांतीं दिसेल. खुद्द हा लेखक या परंपरेंतीलच असल्यामुळें आणि मंडळाच्या कार्याशीं त्याचा निकटचा संबंध असल्यामुळें तिऱ्हाईत मीमांसकाची भूमिका वठवून दाखविणें त्यास अवघड पडत आहे हें उघड आहे. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या द्वारां प्रसिद्ध झालेल्या लहान मोठ्या पुस्तकांची संख्या सुमारें पाऊणशें असून पन्नास हजार कागद, चार पांच हजार पोथ्या, एक हजार नाणीं, एक हजार बहुमोल चित्रें आणि पांच सहा हजार पुस्तकें असा संग्रह आज मंडळाजवळ झाला आहे. पटावर सालोसाल प्रेमानें वर्गणीच्या रूपानें साहाय्य पाठविणारे ५०० पावेतों सभासद आहेत.

केवळ मराठी शाळामास्तर असतां ज्यांनीं दृढाभ्यासानें मराठी कागदपत्रांचा सूक्ष्म व्यासंग धरून तज्ज्ञांनींहि पाठ थोपटावी असें यश मिळवून दाखविलें ते रा. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे हे आज संशोधन क्षेत्रांत चांगली प्रख्याति पावलेले आहेत. ‘ पुरंदरे दप्तर ’ मालेंतील खंड हे त्यांच्या एकट्याच्या श्रमाचें काम असून ‘ शिवचरित्रसाहित्य ’हि त्यांनीं पुष्कळ जमविलें आहे. मंडळांतील दुसरे संशोधक रा. शंकर नारायण जोशी वाईकर हेहि कांहीं पदवीधर नाहींत; तथापि यांनींहि आपल्या व्यासंगानें आपली योग्यता सर्वांच्या निदर्शनास आणली आहे. मंडळांत हौसेनें काम करणारे तर पुष्कळच आहेत. त्यांत श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार यांची संग्रह जमा करण्याची कामगिरी केवळ अपूर्व गणली पाहिजे. रावसाहेब बाबासाहेब देशपांडे यांनीं मोठ्या हौसेनें लिहिलेले इतिहासग्रंथ त्यांची दृढ इतिहासभक्ति दर्शवितात. महाराष्ट्रांतील सर्वच संशोधकांचा व इतिहासप्रेमी जनांचा मंडळास पाठिंबा आहे.

याच वर्षी मंडळ आपला पंचविशीचा रौप्यमहोत्सव करीत असून आजवरच्या कार्याचें एका प्रकारें उद्यापन करावें या हेतूनें त्यानें पहिली अखिल-भारत-आधुनिक-इतिहासपरिषद भरविण्याचा महदुद्योग यशस्वी रीतीनें शेवटास नेला आहे. मंडळाच्या स्थापनेनंतर संशोधनार्थ संघटना करण्याच्या दृष्टीनें महाराष्ट्रांत आणखी कित्येक प्रयत्न झाले आहेत, त्यांची माहिती यापुढें देऊं.

सातारा हिस्टॉरिकल म्युझियम

रावबहादुर पारसनीस यांचे आमरण जे प्रयत्न चालू होते त्यांचें एक सुफल म्हणजे त्यांनीं सरकारची मदत संपादन करून स्थापन करविलेली सातारा हिस्टॉरिकल म्युझियम ही संस्था होय. यांत पारसनीस यांनीं जमा केलेल्या संग्रहापैकीं, ग्रंथ, चित्रें, कागद, वगैरे बराच बहुमोल साधनसंभार सांठविलेला आहे. दुर्दैवानें पारसनीस व सरकार यांच्यामध्यें चालू असणाऱ्या वाटाघाटी परिपूर्ण व कायम होण्याच्या किंचित् पूर्वी रावबहादुर वारले आणि त्यामुळें त्यांची संपूर्ण कल्पना सिद्धीस गेली नाहीं. प्राचीन चित्रांचा पारसनीस यांनीं श्रमानें जमा केलेला व दरबारी थाटानें जतन करून ठेवलेला महत्त्वाचा चित्रसंग्रह त्यांच्या खाजगीकडेच राहून आज तो त्यांचे चिरंजीव काळजीनें सांभाळीत आहेत. रावबहादुर आणखी कांहीं वर्षें जगते तर महाराष्ट्र इतिहासाचा फारच फायदा झाला असता. पारसनीस-वस्तुसंग्रहालयांतील वस्तू अभ्यासकांस आतां बिनहरकत मिळण्याची सोय झाली आहे. तथापि हा संग्रह सरकारच्या द्वारां विश्वस्त मंडळाच्या देखरेखेखालीं ठेविला असल्यामुळें पूर्णपणें सार्वजनिक संस्थेचें स्वरूप त्याला अर्थातच नाहीं. पण मर्यादित रीत्या तो सार्वजनिक आहे.

ही अडचण दूर व्हावी म्हणून साताऱ्यांतील कित्येक विद्वानांनीं मेहेरबान सातारा कलेक्टर यांस अध्यक्ष करून त्यांच्या पुढाकारानें सातारा हिस्टॉरिकल सोसायटी या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे, आणि सातारा म्युझिअमच्याच प्रशस्त मंदिरांत या संस्थेची कचेरी ठेवण्यांत आली आहे. नेटानें काम झाल्यास या संस्थेमार्फत सातारा जिल्ह्यांत चांगली जागृति होईल. सातारा-संग्रहा-

ल्यांतील कागदपत्रांचा एक खंड नुकताच छापून प्रसिद्ध झाला आहे व पुढेंहि इतर महत्त्वाच्या साधनांचे खंड प्रसिद्ध करण्याची खटपट तेथें चालू असल्याचें कळतें. मराठ्यांच्या जुन्या राजधानींत व साताऱ्यासारख्या टुमदार शहरांत रा. ब. पारसनीस यांच्या प्रेमानें, प्रेरणेनें आणि प्रयत्नानें घडून आलेली ही कामगिरी सर्व महाराष्ट्रियांस अभिमानास्पद वाटेल अशीच घडलेली आहे. सातारा हें गांव जरा दूर पडत असल्यामुळें या संग्रहाचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं ही गोष्ट मात्र कबूल केली पाहिजे.

धुळ्याच्या जुन्या संस्था

राजवाडे यांनीं पुण्यास भारत-इतिहास-संशोधक-मंडळाची स्थापना करविली. तथापि त्यानंतर सुमारें पांच वर्षें झाल्यानंतर कामहि वाढीला लागलेलें पाहून आणि जागजागीं इतिहासमंडळें निघतील तितकीं चांगलींच असें त्यांचें मत असल्यामुळें, राजवाड्यांच्या प्रेरणेनें ज्यांनीं संशोधनाच्या कामास आपणांस लावून घेतलें होतें आणि भिम्मेपणानें, चिकाटीनें व व्यवस्थेनें तें चालू ठेविलें होतें अशा कित्येक शिष्यांच्या साहाय्यानें खानदेशांत धुळें मुक्कामीं एक इतिहासाच्या अभ्यासाचें केंद्र निर्माण करण्याचा राजवाड्यांनीं प्रयत्न केला. इ. स. १८९३ पासून रा. शंकर श्रीकृष्ण देव प्रभृति कित्येक तरुण मंडळी धुळ्यास या कामाकडे लक्ष देत होती. रामदासी संशोधन हें आपलें जीवितकार्य ठरवून रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं आपले प्रयत्न आज बेचाळीस वर्षें चालविले आहेत. देवांचे एक प्रमुख सहकारी गोविंद काशीनाथ चांदोरकर यांनीं ताम्रपट, प्राचीन ग्रंथ व प्राचीन शिलालेख यांचेंहि संशोधन चालविलें होतें.[1] सत्कार्योत्तेजक सभा या नांवानें प्रारंभिलेला हा या छोट्या मित्रमंडळाचा प्रयत्न हळुहळू वृद्धिंगत होत गेला. सभेला तशी कांहीं घटना नव्हती. तरीपण सर्व भार या मित्रमंडळानें अंगावर घेऊन डोमगांव येथील, कल्याणांनीं लिहिलेली व श्रीरामदासस्वामींनीं स्वतः शुद्ध केलेली म्हणून परंपरेनें

१. चांदोरकरांचा 'संतकविकाव्यसूचि' हा एक बहुमोल संदर्भ ग्रंथ आहे.

पूज्य मानलेली दासबोधाची शुद्ध प्रत प्रसिद्ध केली (शके १८२५). जुने मराठी ग्रंथ शक्य तर मूळ कवींनीं जसे लिहिले असतील तसेच प्रसिद्ध करावे ही जी राजवाडे यांनीं शास्त्रीय संपादनाची घोषणा केली होती आणि जिचा आविष्कार रामदासावरील आपल्या एका निबंधांत त्यांनीं करून दासबोधाच्या प्रचलित पाठांतील अनर्थ दाखवून दिले होते त्या घोषणेला अनुसरून वरील डोमगांवची प्राचीन रामदासी संहिता प्रसिद्ध झाली आणि प्राचीन कवींच्या ग्रंथाभ्यासास त्यामुळें नवें व इष्ट असें वळण लागलें. देव यांनीं दरसाल सुट्टीचे मिळणारे दिवस रामदासी मठांचा शोध करण्यांत व तेथें संचार करून संशोधन करण्यांत नियमानें व्यतीत केले. याप्रमाणें काम अव्याहत बेचाळीस त्रेचाळीस वर्षें त्यांनीं चालविलें व अद्यापहि त्यांचा हा सदुद्योग पुढें चालू आहे. या संचारांत आणि संशोधनांत त्यांनीं अनेक जुने ग्रंथ, बाडें व पोथ्या मिळविल्या; मठ शोधून काढले; मठपतींच्या परंपरा जुळविल्या; कालस्थलनिर्णय केले; आणि सत्कार्योत्तेजक सभेच्या द्वारें त्यांतील निवडक संग्रहाचें प्रकाशनहि चालू ठेविलें. रामदास आणि रामदासी या नांवाचें स्वतंत्र मासिक आज वरींच वर्षें त्यांनीं चालविलें असून त्यांतून गिरिधर, वेणाबाई, दिनकरस्वामी, राजाराम प्रासादी, मेरुस्वामी प्रभृति अनेकांचे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. विविध विषयांवर शोधांचीं टांचणेंहि पुष्कळ लिहिलीं आहेत. श्रीसांप्रदायाच्या कागदपत्रांचे एक दोन महत्त्वाचे खंडहि प्रसिद्ध केले आहेत. यांतील गिरिधरांचा समर्थप्रताप हा फार महत्त्वाचा असून त्याच्यायोगें रामदासस्वामींच्या चरित्रावर पुष्कळच नवीन प्रकाश पडला आहे. किंबहुना समर्थांच्या चरित्राला आज तोच मोठा आधारग्रंथ आहे. दिनकरस्वामींची कविता हाहि ग्रंथ महत्त्वाचाच आहे. श्रीसमर्थांची कविता, पदें व पदांतरें हे ग्रंथ तर या लेखकासारख्या कित्येकांस दासबोधापेक्षांहि जास्ती चटका लावणारे असे ठरले आहेत. 'समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें' हा सत्कार्योत्तेजक सभेचा ग्रंथहि उपयुक्त आहे. 'करुणाष्टकें' हें पुस्तक समर्थांचें अंतरंग उत्तम तऱ्हेनें प्रगट करून दाखवितें. वेणाबाईचें 'सीतास्वयंवर' हें विरल अशा जुन्या महिला-वाङ्मयांत मुद्दाम नमूद करण्यासारखें आहे.

सत्कार्योत्तेजक सभेच्या इतर ग्रंथांत कै. चांदोरकर यांनीं प्रसिद्ध केलेला त्रिंबक कवीचा 'बालबोध' हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. या शिवपूर्वकालीन ग्रंथांतील विद्वत्तेची चमक, सांप्रदायिक ज्ञान, व ग्रंथकाराचें व्यक्तित्व हीं तिन्हीहि अंगें प्रशंसनीय अशीं आहेत. येणेप्रमाणें सत्कार्योत्तेजक सभेचें काम प्राचीन मराठी सारस्वताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें झालेलें आहे. तंजावर येथील बृहदीश्वर प्राकारावरील भोसलेशाहीचा कोरीव इतिहास राजवाडे यांनीं 'प्रभातां'[1]त प्रसिद्ध केला आहे. हा दगडी शिलालेख हिंदुस्थानांत तरी बहुधा सर्वांत मोठा शिलालेख असावा. पुण्याचा संबंध कमी करून राजवाडे अखेरीअखेरीस धुळ्यास गेल्यावर 'इतिहास आणि ऐतिहासिक' या नांवाचें एक मासिक सत्कार्योत्तेजक सभेनें कांहीं वर्षे प्रसिद्ध केलें. राजवाडे यांनीं लिहिलेला 'महाराष्ट्राचा वसाहतकाळचा इतिहास' व राजवाडे यांचे भाषाविषयक व इतर अत्यंत महत्त्वाचे लेख या मासिकांत प्रसिद्ध झाले आहेत. देव व चांदोरकर यांच्या जोडीला धुळ्याच्या वकिलांपैकीं रा. भास्कर वामन भट हेहि राजवाड्यांच्या प्रेरणेनें संशोधन करूं लागले होते. 'महाराष्ट्रधर्म' या विषयावरील रा. भट यांनीं लिहिलेला विस्तृत, चर्चात्मक व महत्त्वाचा ग्रंथ सभेनेंच प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्रधर्म हा शब्द व त्यानें दर्शित केलेली विशिष्ट कल्पना हिचें संशोधन व उपबृंहण हें महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासकास आवश्यक आहे. या अभ्यासास रा. भट यांचा ग्रंथ मार्गदर्शक होईल, यांत शंका नाहीं. रा. देव यांचें रामदासी संशोधन, रा. चांदोरकर यांचें विविध प्रकारचें लिपिवाचनादि संशोधन आणि रा. भट यांचें विशेषेंकरून व्यवहार ऊर्फ लॉ या संबंधाचें संशोधन असें या त्रिवर्गाचें संशोधन स. सभेच्या द्वारां प्रसिद्ध झाल्यामुळें सभेची कामगिरी फार महत्त्वाची झाली आहे. रा. भट यांनीं धर्मशास्त्रविषयक कागदपत्रांवरून व जुने महजर, निवाडे वगैरेंच्या साहाय्यानें मराठेशाहींतील न्यायदानपद्धतीसंबंधानें विस्तृत विवेचन केलेले कित्येक लेख प्रथम भारत-इतिहास-

१. 'प्रभात' नांवाचें एक मासिक रा. चांदोरकर कित्येक महिने चालवीत होते. त्यांत ताम्रपट वगैरेंच्या आधारें बरीच ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झाली आहे.

संशोधक-मंडळासमोर वाचले आणि तेव्हांपासून क्रमाक्रमानें संशोधनाच्या विषयास आपणांस अधिक अधिक वाहून घेतलें.

राजवाडे यांच्या पश्चात्, विशेषतः रा. भट यांच्या प्रयत्नामुळें आणि मुख्यतः राजवाडे यांचे शिलकी निबंध व शिलकी साहित्य योग्य तऱ्हेनें जतन करून प्रसिद्ध करण्यासाठीं **राजवाडे-संशोधनमंदिर** स्थापन झालें. या मंडळास व सत्कार्योत्तेजक सभेस श्री. सौ. मातुश्री इंदिराबाई महाराणीसाहेब होळकर यांचा उदार आश्रय लाभलेला आहे. रा. भट हे राजवाडे-संशोधन-मंदिराचे चिटणीस आहेत. या मंडळानें राजवाडे मंदिर या नांवाची एक सुंदर, अदाह्य अशी इमारत सुमारें १५ हजार रुपये खर्च करून धुळयास मध्यवर्ती ठिकाणीं बांधली आहे व तेथें राजवाड्यांच्या जुन्या कागदपत्रांचा वगैरे संग्रह करून ठेविला आहे. राजवाड्यांनीं रचलेला एक प्रचंड मराठी धातुकोशहि प्रसिद्ध करण्याचें काम सांप्रत राजवाडे संशोधक मंडळानें. हातीं घेतलें आहे. या मंडळाच्या योगानें खानदेशांत इतिहासविषयाविषयीं उत्तम जागृति होऊन मोठें नमुनेदार कार्य घडून येईल अशी आशा करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. एक सहकारी पेढी काढून तिच्या नफ्याचा कांहीं वांटा राजवाडेमंदिरास कायमचा वांटा म्हणून देण्याची एक स्पृहणीय योजनाहि रा. भट प्रभृतींनीं अमलांत आणिली आहे.

रा. शंकरराव देव यांनीं श्रीसमर्थांच्या कार्यासाठीं महाराष्ट्रभर व बाहेरहि दौरे काढून जांब येथें श्रीसमर्थांच्या जन्मस्थळीं त्यांच्या नांवानें मंदिर उभारलें आहे, आणि तदनंतर महान् प्रयासानें जमविलेला रामदासी मठांतील जुन्या मराठी बाडांचा व ग्रंथांचा हस्तलिखित संग्रह सुरक्षित ठेवण्यासाठीं **श्रीसमर्थ वाग्देवता-मंदिर** (धुळें) या नांवाचें एक छोटेंसें पण सुबक व प्रेक्षणीय असें दगडी मंदिर उभारून गेल्या ज्येष्ठ शुद्ध १३ स मोठ्या समारंभानें तें सर्व जनतेस खुलें केलें आहे. या मंदिरांत पोलादी कपाटांत जमविलेला सर्व जुन्या लिखितांचा संग्रह व्यवस्थेनें ठेवण्यांत आला असून रा. देव यांनीं तो महाराष्ट्रांतील तेरा विश्वस्थांच्या ताब्यांत दिला आहे. येणेंप्रमाणें रा. भट व रा. देव यांनीं राजवाडे यांचें कार्य

चालवून व त्याला चिरस्थायी स्वरूप देऊन सर्वांस कायमचे ऋणी केलें आहे, यांत शंका नाहीं.

दोन नव्या संस्था

वऱ्हाडांत यवतमाळ येथें शारदाश्रम स्थापन झाला आहे. व नागपुर मुक्कामीं मध्यप्रांत संशोधन मंडळ स्थापन झालें आहे. शारदाश्रमाचे निष्ठावंत व निरलस कार्यकर्ते श्री. अप्पासाहेब देशपांडे पापळकर व नागपुरांतील प्रो. मिराशी यांच्यासारखे उदयोन्मुख संशोधक यांच्या सारख्यांचा लाभ ज्या संस्थांस झाला आहे त्या संस्था आज लहान दिसत असल्या तरी लवकरच बाळसें धरतील व नांव गाजवितील याविषयीं आम्हांस संदेह नाहीं.

देशांतराचे इतिहास

मोठ्या उद्वेगानें व लज्जेनें असें कबूल केलें पाहिजे कीं, जरी मराठी भाषेंत पांचशें वर्षे ग्रंथ होत होते तरी हिंदुस्थानच्या पलीकडील देशांविषयीं एक ओळ सुद्धां ब्रिटिश अमलापूर्वीच्या मराठी वाङ्मयांत सांपडत नाहीं. युरोपांत चाललेल्या पेनिन्शुलर युद्धासंबंधानें उल्लेख असलेलीं एक दोन बातमीपत्रें रायरीकर दप्तरांत आम्हीं पाहिलीं होतीं. तथापि अगदीं शपथ वाहण्याला अडचण करण्यापलीकडे त्यांची मातबरी कांहीं नाहीं. बाहेरचें जग हिंदुस्थानकडे डोळे फाडफाडून पाहत होतें, तर हिंदुस्थानानें आपले चर्मचक्षुच नव्हे, तर आपले ज्ञानचक्षुहि गच्च आवळून धरून, बाहेरच्या जगावर एक प्रकारचा बहिष्कारच घातला होता म्हटल्यास चालेल !

अव्वल इंग्रजीच्या आरंभीं मॅडम् वुइल्सन या विदुषीच्या नांवावर ग्रीक, मिसरी, व प्राचीन ख्रिस्ती लोकांचीं वृत्तकथनें आणि मेदी व पार्शी लोकांचें वृत्त अशीं चारपांच पुस्तकें आढळून येतात. धर्मप्रसाराची हौस ही या ग्रंथांच्या मुळाशीं उघड दिसून येते. विद्यावृद्धि करावी आणि ज्ञानसंग्रह वाढवावा, हा हेतु तितकासा प्रबळ नसल्यामुळें या उपयुक्त शाखेंत पुढें पुष्कळ वर्षेपावेतों भर पडलेली दिसत नाहीं. रा. धोंडसारख्या कांहीं लेखकांनीं ग्रीसचा इतिहास वगैरे ग्रंथ लिहिलेले, त्यांच्या नांवावर आढळतात, तरी त्यांची एकूण संख्या कांहीं फार भरणार नाहीं.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं जीं अनेक संस्मरणीय कृत्यें केलीं, त्यांत **राष्ट्रकथामाला** या नांवाची ग्रंथमाला काढून तींतून इंग्रजींतील 'स्टोरी ऑफ् दी नेशन्स' या ग्रंथमालेच्या धर्तीवर मराठींत वाचनीय ग्रंथ तयार करण्यासाठीं केलेला प्रयत्न पाहिला असतां फार कौतुक वाटतें. इ. स. १८९२ मध्यें या मालेंतील 'इराण' वरील रा. पुराणिक यांचें पुस्तक प्रथम प्रसिद्ध झालें आणि तदनंतर क्रमानें 'कार्थेज' (कर्ते रा. नागेश आबाजी काथवटे), 'तुर्कस्थान' (कर्ते रा. रावजी भवानराव पावगी), 'फ्रान्सचा जुना इतिहास' (कर्ते रा. कृष्णा अर्जुन केळूसकर), 'स्पानिश व मूर लोक' (कर्ते रा. रामचंद्र सखाराम आठवले), 'जर्मनी' (कर्ते रा. हरि सदाशिव बेलवलकर), 'असिरीया' (कर्ते रा. सीताराम रामचंद्र गायकवाड), 'रोम' (कर्ते रा. विनायक कोंडदेव ओक), अशीं सुमारें नऊ दहा पुस्तकें या मालेंत प्रसिद्ध झालीं. मोठ्या आकाराचीं तीनतीनशें चारचारशें पानें या मालेंतील प्रत्येक ग्रंथांत आहेत. त्यांतील कित्येक ग्रंथ मूळ इंग्रजीवरून भाषांतरित केलेले आहेत. तथापि कित्येकांत लेखकांनीं स्वतंत्रपणें संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. विपुल टीपा वगैरे देऊन हे ग्रंथ मराठी वाचकांस समजतील असे करण्याविषयीं दक्षता घेतली आहे. छपाई उत्तम आहे. असा हा प्रयत्न अत्यंत योग्य दिशेनें सुरू झाला होता. परंतु पुढें ही माला बंद करण्यांत आली, हें आमचें दुर्दैव होय! त्या वेळीं जर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्याची कल्पना पुढें आली असती तर बहार झाली असती! एका अर्थानें अकालीं झालेले हे ग्रंथ वाया गेलेले पाहून फार हळहळ वाटते! श्री. सयाजीरावांसारखा उदार प्रभुहि या कार्यापासून विमुख झाला, निदान हिरमुसला, हें शल्य हृदयाला खचित टोंचीत राहील!

'राष्ट्रकथामाले'बरोबरच 'महाराष्ट्रग्रंथमाला' म्हणून एक उद्योग श्री. सयाजीराव महाराज यांनीं या वेळीं चालविला होता. वरील दोन्ही माला चालविण्याच्या कामीं त्यांस पदरीं असलेले रा. गोविंद सखाराम सरदेसाई यांचें साहाय्य बरेंच झालेलें आहे. 'महाराष्ट्र ग्रंथमालें'त, मॅकिएव्हेलीचा 'प्रिन्स्' (राजधर्म) व प्रो. सीलीचा 'एक्सपॅन्शन ऑफ् इंग्लंड' यांसारखे इतिहासशास्त्राभ्यासकास

उपयोगी असे मोठाले ग्रंथ प्रसिद्ध झाले. 'इंग्लंड देशाचा विस्तार' या रा. सरदेसाई यांच्या एकाच ग्रंथाचीं पानें सुमारें पांचशें आहेत. मेन्च्या 'ग्रामसंस्थे'वरील सर्वमान्य ग्रंथाचेंहि विस्तृत भाषांतर रा. महादेव राजाराम बोडस यांच्याकडून या मालेंत करून घेण्यांत आलेलें प्रसिद्ध आहे.

राजानें केलेल्या या प्रयत्नांप्रमाणें प्रजाजनांपैकीं एका धाडसी व ज्ञानलोलुप हस्थानें केलेला असाच दुसरा प्रयत्नहि कौतुकास्पद गणावयास पाहिजे. पुण्याचे रा. बळवंत गणेश दाभोळकर यांनीं एकट्याच्या हिंमतीवर अनेक सुंदर ग्रंथ मराठींत प्रसिद्ध केले. त्यांत प्रो. वासुदेवराव पटवर्धन व प्रो. धोंडोपंत कर्वे यांच्याकडून सिज्विक्च्या एलेमेंट्स ऑफ् पॉलिटिक्सचें भाषांतर करवून 'राजनीतीचीं मूलतत्त्वें' हा राजनीतिशास्त्रावरील एक ग्रंथ प्रसिद्ध केलेला आढळतो! १८९६ त तो प्रसिद्ध झाला. तिसरी उसळी राजवाडे यांनीं या वेळीं मारलेली आढळते. 'भाषांतर' नांवाचें स्वतंत्र मासिकच काढून त्यांतून त्यांनीं प्लेटोचें 'स्वराज्य' (रिपब्लिक्), मॉंट्स्कचें 'एस्प्रित् द् लॉज्', गिबन्चें रोमन पातशाहीचा ऱ्हास, इत्यादि पुस्तकांचीं भाषांतरें प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला, परंतु तो त्यांसहि लवकरच सोडून द्यावा लागला व मग ते इतिहाससंशोधनाकडे वळले, राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे कित्येक शास्त्रें इतिहासाच्या व्यापक अभ्यासास उपकारक होतात. या सुंदर प्रयत्नांचीं रोपटीं वाढीला लावण्यास जर मायेचें महाराष्ट्र विद्यापीठ असतें तर? आजमितीला प्रो. काळे, कर्वे, गाडगीळ, जावडेकर, पुणतांबेकर यांनीं लिहिलेल्या पांच चार ग्रंथांऐवजीं पांचचारशें ग्रंथ मराठीचें वैभव वाढविण्यास सज्ज असते! आगरकर, टिळक, गोळे किंवा गणेश व्यंकटेश जोशी असे खंदे विद्वान् आमच्यांत होते, पण त्यांचा पोशिंदा कोठें होता? आणि अजूनहि कोण आहे? एक समाजाचाच तेवढा अखेरचा आधार आहे!

दाभोळकरांप्रमाणेंच विजापूरकरांनीं स्वार्थत्यागानें चालविलेल्या 'ग्रंथमाले'नेंहि 'युरोपचें संक्षिप्त इतिवृत्त' (विजापूरकर,-फ्रीमन्वरून), 'जपान' (गोरे), 'इंग्लंडचा इतिहास' (ना. ल. फडके), 'जगांतील क्रांतिकारक लढाया' (ज. स. करंदीकर,

क्रीसीवरून), असे कांहीं गणनीय ग्रंथ प्रसिद्ध केले. हौसेनें करावें व सोसावें एवढेंच त्यांच्या हातीं होतें !

परवाचें महायुद्ध झालें तेव्हां पुनः कांहीं उचल झाली व ' आधुनिक जर्मनीची उत्क्रांति 'सारखे ग्रंथ कै. ना. कृ. आगाशे वगैरेंनीं प्रसिद्ध केले. शाळांतून वाव मिळाला त्यामुळें, रा. बर्वे, रा. मोडक, रा. मराठे प्रभृतींनीं युरोपचे व इंग्लंडचे इतिहास अलीकडे लिहून प्रसिद्ध केले आहेत. इंग्लंडचा एक मोठा इतिहास रा. बापट यांचाहि यापूर्वीं प्रसिद्ध झालेला होता. ' जर्मन साम्राज्याची पुनःस्थापना ' (प्रि. वि. ग. आपटे, मॅलेसन्‌वरून) हा भाषांतरित ग्रंथ गायकवाडांच्या श्रीसयाजीसाहित्यमालेंतून सन १९२८ त प्रसिद्ध झाला आहे.

परंतु या सर्वांत नांवाजण्यासारखा प्रयत्न म्हणजे रा. न. चिं केळकर यांचा ' आयर्लंडाचा इतिहास ' हा होय. हा ग्रंथ अनेक इंग्रजी ग्रंथांचा व ग्रंथकारांच्या दीर्घ राजकारणी अनुभवाचा परिपाक आहे. तथापि ' मराठे व इंग्रज 'इतकी लोकप्रियता त्यास लाभली नाहीं !

पाश्चिमात्य थोरांचीं चरित्रें मात्र मराठींत बरींच झालेलीं आहेत. वॉशिंग्टन् (बाळवेकर), क्लाइव्ह् (भागवत), एल्फिन्स्टन् (नाटेकर), बर्क् (चापेकर), ग्लॅड्स्टन् (ओक व वि. पां. नेने), फ्रँक्लीन् (टिपणीस) इत्यादि चरित्रें एकएकवार प्रसिद्ध झालेलीं आहेत. तथापि अशा चरित्रग्रंथांत कै. विनायकराव भावे यांनीं लिहिलेलें ' नेपोलियनचें चरित्र ' मुद्दाम वाचण्यासारखें आहे. भावे यांच्या भाषेचा व निरीक्षणाचा एक निराळाच थाट आहे. मराठींत या ग्रंथाची भर हें भूषण आहे. रा. बा. दा. मुंडले यांनीं काव्हूर, थामस् पेन् , मॅडम् रोलंड, वुइल्यम् दि सायलेंट, नेपोलियन् इत्यादि वाचनीय पुस्तकें लिहून या शाखेंत महत्त्वाची भर टाकली आहे. कै. वि. कों. ओक यांचीं बालबोधांतलीं दुपानी, तिपानी तीन चारशें चरित्रें एकत्र केलीं तर चांगला ग्रंथ तयार होईल. परंतु त्यांनीं ग्लॅडस्टन् , अमीर अब्दुर रहिमान् , इत्यादि स्वतंत्र चरित्रें व फ्रान्स्च्या राज्यक्रांतीचा इतिहास असे कांहीं स्वतंत्र ग्रंथहि लिहिलेले आहेत. त्या सर्वांत ग्लॅडस्टन् चरित्र वाचण्यासारखें आहे. ओकांची बालबोध भाषा

व सरळ मांडणी सुपरिचित आहे. रा. ताम्हणकरांचा 'मुसोलिनी आणि फाशिस्मो' आणि प्रो. फडके यांचें डी व्हॅलेरा चरित्र हे ग्रंथहि चटकदार उतरले आहेत. रा. वा. कृ. भावे यांनीं लिहिलेला 'तुर्कांचें साम्राज्य' हा ग्रंथहि येथें नमूद केला पाहिजे.

भारत गौरव ग्रंथमालेंत प्रिन्स बिस्मार्कचें प्रसिद्ध झालेलें मोठें चरित्र व नुकताच रा. ना. ह. आपटे यांनीं 'नवभारत ग्रंथमालें'त प्रसिद्ध केलेला अमेरिकेचा इतिहास हे ग्रंथ मराठींत ज्ञानप्रद वाङ्मयाची भर घालणारे आहेत. परंतु एकंदरींत या शाखेची फलश्रुति यथातथाच आहे !

प्राचीन काव्यसंशोधनाच्या ठळक प्रयत्नांचा उल्लेख अन्य निमित्तानें मागें कोठेंकोठें येऊन गेलाच आहे. ज्ञानचंद्रोदय, सर्वसंग्रह, तेंडुलकर, बेळगांवचे सावंत, निर्णयसागर वगैरे अनेकांचे प्रयत्न या कामीं उल्लेखनीय आहेत. सर्वांत 'काव्य-संग्रहा'चा प्रयत्न दांडगा. कै. वामन दाजी ओक व नंतर कै. ना. चिं. केळकर या दोघां संपादकांकडे या कार्याचें मुख्य श्रेय द्यावयास पाहिजे. पुढें भावे यांनीं 'महाराष्ट्र कवी' मासिकांत दासोपंत, कृष्णदास मुद्गल, सामराज वगैरे अनेक कवींचे ग्रंथ, पंचतंत्रासारखा एखादा प्राचीन गद्य प्रबंध असे अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले; आणि जुन्या 'महाराष्ट्र सारस्वताचा' एकमेव प्रमाण इतिहास लिहून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ भावे यांचें जीवनकार्यच समजावयास हरकत नाहीं. दोनतीन तपांच्या परिश्रमांचें व संशोधनाचें परिपक्व फळ म्हणजे हें महाराष्ट्र सारस्वत ! भावे यांची भाषा-पद्धति विशिष्ट ठशाची परंतु आकर्षक आहे. पदवी परीक्षा देण्यापूर्वीपासूनच हा पोथ्या धुंडण्याचा नाद विनायकरावांस लागला व तो त्यांच्या जीवाचा मुख्य विसावा होऊन राहिला ! पदवी भौतिकशास्त्राची, नाद पांखरें उडविण्याचा, धंदा मीठ विकण्याचा आणि संशोधन प्राचीन मराठी काव्याचें, असा फक्कड मेळ भावे यांच्या चरित्रांत दिसून येतो ! ! ते मोठ्या अभिमानानें याचें वर्णन करीत ! पैशाचें व बुद्धीचें बळ यांस अनुकूल होतें तथापि कळकळ व महत्वाकांक्षा असल्याशिवाय असले श्रम होत नाहींत. आपली प्रकृति खालावली असतांहि मानभाव महंतांस आपल्याकडे खेंचून आणून त्यांनीं महानुभावी वाङ्मयाचें अज्ञात दालन महाराष्ट्रास खुलें केलें तें एरवी कसें घडलें असतें ?

श्री. रा. द. पंत पराडकर यांनीं मोरोपंती कवितेच्या ग्रंथाचे नऊ भाग कविलिखित प्रतींवरून छापले, ही त्यांची कामगिरी एका दृष्टीनें अपूर्व झाली. आणखी तीन भाग राहिले आहेत तेवढे हातावेगळे करून रा. पराडकर यांनीं काम तावडतोब पुरें केल्याचें श्रेय घ्यावें. नाहीं तर थोड्यासाठीं त्यांनीं पुण्य गमावलें असें होईल !

जनूकाका आठल्यांनीं मागें रत्नागिरीस ' यथार्थदीपिका ' छापली, किंवा कृष्णदयार्णवांची हरिवरदा स्वतंत्र पोथीरूपानें प्रसिद्ध झाली, किंवा बेळगांवचे नाईक व आंबेवाडी यांनीं अनेक गीता-टीकांचा एखादाच भाग प्रसिद्ध केला, किंवा कै. गजाननराव देवांनीं अनेक जुने ग्रंथ छापले, किंवा गोंधळेकर, चित्रशाळा, गणपत कृष्णाजी, आवटे, यंदे, ढवळे, गुर्जर इत्यादिकांनीं अनेक ग्रंथ छापले त्या सर्वांचा येथें उल्लेख करण्यास अवकाश नाहीं व त्याची येथें आवश्यकताहि नाहीं.

ज्ञानेश्वरी, तुकोबा गाथा वगैरेंच्या अनेक प्रति निघालेल्या आहेत. कित्येक सार्थ आहेत. परंतु संशोधन, किंवा चिकित्सादि दृष्टि पुढें ठेवून होणारे प्रयत्न विरळा. खपतात म्हणून छापा हाच प्रकार फार. नगर वाङ्मयोपासक मंडळातर्फे श्रीज्ञानेश्वरांसंबंधानें संशोधनप्रकाशन करण्याचे उद्योग श्री. सरदार मिरीकर प्रभृति नाथपंथसंशोधक करीत आहेत. ' श्रीज्ञानेश्वरदर्शन ' या नांवाचा जो दोन भागांत प्रसिद्ध झालेला या मंडळाचा ग्रंथ आहे त्याचा येथें आदरानें उल्लेख केला पाहिजे.

रा. लक्ष्मणरावजी पांगारकर यांची कामगिरी संतचरित्रकार म्हणून सर्वश्रुत आहे. रा. आजगांवकर यांची कविचरित्रमालाहि उपयुक्त झाली आहे. संतचरित्रांची संख्या पुष्कळच मोठी आहे. तथापि या वाङ्मयांत चिकित्सक वाङ्मय थोडें; भाविक वाङ्मय फार. तरी पण नुसत्या आख्यायिकांच्या दलदलींतून आपण बाहेर पडत चाललों आहोंत यांत शंका नाहीं. रा. पांगारकर यांनीं बरीच संतकविता शोधूनहि काढली आहे व मुमुक्षूंत कांहीं प्रसिद्धहि केली आहे. निरंजन माधवाची बरीच नवी सुंदर कविता त्यांनीं उजेडांत आणली. श्री. गुब्बी यांनीं छापलेला मध्वमुनीश्वर गाथा

प्रथम मुमुक्षूंतच प्रसिद्ध झाला होता. सांप्रत पांगारकर मराठी वाङ्मयाचा विस्तृत इतिहास लिहिण्यांत गुंतले असून पहिला विभाग त्यांनीं प्रसिद्धहि केला आहे. दुसरा लवकरच प्रसिद्ध होईल. श्री. पांगारकरांचें लिहिणें बोलणें अतिशय प्रेमळ व रसाळ असतें व त्यांचे ग्रंथ यामुळें लोकप्रिय झाले आहेत.

चिकित्सक काव्य टीकाकार म्हणून कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांचा यथार्थ लौकिक होता. त्यांनीं महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठीं लिहिलेला मराठी वाङ्मयाचा इतिहास, एक खंड–महानुभाव अखेर–प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या मृत्यूमुळें आपली हानि झाली आहे.

तरुण पिढींत रा. रामचंद्र महादेव आठवले यांचें नांव नामनी चिकित्सक म्हणून चांगलें पुढें आलेलें आहे. नांदेडचे रा. वि. अं. कानोले हेहि शेष घराण्याबद्दल वगैरे चांगलें संशोधन करीत आहेत. मुंबईचे रा. अ. का. प्रियोळकर यांनीं रघुनाथ पंडिताच्या नलदमयंतिस्वयंवराख्यानाची एक सुंदर दरबारी आवृत्ति औंधच्या श्री. पंतप्रतिनिधींच्या औदार्यामुळें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. श्रीनाथसंप्रदाय ग्रंथमाला, पुष्प १ लें म्हणून शिवदिन केसरीकृत ज्ञानप्रदीप आम्हीं नुकताच प्रसिद्ध केला आहे; सेलूचे रा. काटे यांनीं भूषणकवीचे समग्र ग्रंथ कांहीं वर्षांमागें प्रसिद्ध केले; श्रीसोहिरोबा आंबिये यांची कविता पुनः प्रकाशित झाली आहे; चांगदेवांचा ‘ तत्वसार ’ (शके १२३४)—उज्जनी प्राचीन ग्रंथसंग्रहालयांतलें अनर्घ्य रत्न—लवकरच प्रकाशित होणारें आहे; भा. इ. सं. मंडळाच्या अहवालांतून व ‘ रामदास रामदासी ’सारख्या मासिकांतील टिपणांतून अनेक लहान मोठे नवे नवे कवी सारखे माहीत होतच आहेत; शेख महंमदाची चटका लावणारी शुद्ध मराठी बाण्याची कविता प्रसिद्धीची वाट पाहत आमच्याजवळ तयार आहे; दासोपंतांची ऐतिहासिक कागदपत्री माहिती आम्हीं छापण्यासाठीं तयार केली आहे; गेल्या महिन्या दोन महिन्यांत महानुभावी ‘ महदंबेचे धवळे ’ रा. वामनराव देशपांडे यांनीं प्रसिद्ध केले; प्रो. कोलते यांनीं ‘ उद्धवगीता ’ प्रसिद्ध केली, व रा. नेने यांनीं ‘ चक्रधरसूत्रपाठ संहिता ’ छापली; विहंगम-विश्ववाणी वगैरे आमचीं नागपूर वऱ्हाडकडील

नव्या दमाचीं मासिकें महानुभावांच्याविषयीं नवी माहिती किंवा चर्चा प्रसिद्ध केल्याशिवाय एक अंकहि सुना जाऊं देत नाहींत; मयूरमंडळादि मंडळें चर्चा चालवीत आहेत; शालिग्रामादिकांनीं पोवाड्यांचें प्रसिद्धीकरण केलें तें कार्य रा. य. न. केळकर, वर्दे प्रभृति नवे विद्वान् पुढें चालवीत आहेत; नागपूर विद्यापीठाला महानुभावी वाङ्मय-प्रकाशनाविषयीं पुढाकार घ्यावा लागेल अशी आशा मनांत पालवूं लागली आहे; किंबहुना पूर्वीच्या काव्यसंग्रहाप्रमाणें किंवा महाराष्ट्र कवीप्रमाणें एखादें मासिक काढून त्यांत काव्यसंहिता व काव्यचिकित्सा असे विभाग घालून नवाच उद्योग आरंभिण्याची आवश्यकता क्षणोक्षणीं भासूं लागली आहे; येणेंप्रमाणें महाराष्ट्राचें अभिमानाचें 'जुनें ठेवणें' प्रेमानें जतन करून, त्याच्या अभ्यासानें महाराष्ट्राच्या त्या वेळच्या विचारपरंपरेचें, गृहस्थितीचें, तत्त्वज्ञानाचें आकलन करण्याचा व लाभालाभाचा आढावा काढण्याच्या मार्गाला आम्हीं लागण्याचीं सुचिन्हें दृग्गोचर होत आहेत; डॉ. केतकर यांनीं तशा प्रयत्नाचा एक नमुना पुढें ठेवलाहि आहे; असें आशादायक वातावरण तयार होत आहे. पुढें हा अभ्यास वाढणार आणि या प्राचीन वाङ्मयमंथनाचीं अमृतफळें आपणांस चाखावयास मिळत राहणार यांत शंका नाहीं.

निष्कर्ष

महाराष्ट्रांत इतिहासक्षेत्रांत झालेल्या कामगिरीचें समालोचन या लेखांत साधारण विस्तारानें केलें आहे. याहिपेक्षां अधिक सविस्तर परामर्ष घेणें या लेखाच्या मर्यादेंत शक्य नाहीं. या समालोचनाचा स्थूल मानानें निष्कर्ष असा:—

(१) संशोधनाच्या विद्येचें हल्लींचें स्वरूप पाश्चात्य विद्वानांच्या संबंधामुळेंच हिंदुस्थानांत उदित झालें आहे. घटिताच्या वास्तवतेवर आणि त्याचप्रमाणें स्थलकालव्यक्तिनिश्चयावर या पद्धतींत जो भर दिलेला असतो त्यामुळें इतिहास शब्दाचा निश्चित होणारा अर्थ हा त्याच्या मूलार्थाला जुळणारा परंतु पौराणिकपणाकडे जाण्याचा त्याचा रस्ता रोखून टाकणारा असा झाला आहे.

(२) आम्ही तद्विद्यासंपन्न होण्यापूर्वी आमच्या गुरुत्वाचा मान पाश्चात्य संशोधकांकडे जातो.

(३) आधुनिक काळांतील मराठयांचे पहिले इतिहास हिंदुस्थानांतील इतर लोकांच्या इतिहासांप्रमाणें प्रथमतः पाश्चात्यांनींच लिहिले. स्प्रिगेल् यानें जर्मन् भाषेंत व स्कॉट् वेअरिंग् व तदनंतर ग्रँट् डफ्, माल्कम्, एल्फिन्स्टन् यांनीं इंग्रजी भाषेंत लिहिलेले इतिहासग्रंथ हे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापूर्वीच रचून झाले होते.

(४) मराठयांच्या इतिहाससंबंधानें संशोधनाला सुरुवात कीर्तने, लोकहितवादी व रानडे यांच्या पिढीनें केली. या संशोधनांत शास्त्रीय भाग विशेष नव्हता. भिडे यांचा अष्टप्रधानांचा इतिहास व सरंजामे यांचा शिंदेशाहीचा इतिहास हे मराठींतील पहिल्या काळांतील नांव घेण्यासारखे इतिहास होत.

(५) कागदपत्र व बखरी यांच्या संशोधनाला व प्रकाशनाला खरी सुरुवात काव्येतिहाससंग्रहापासून झाली.

(६) अस्सल कागदपत्रें शोधण्याचें काम खरे, पारसनीस व राजवाडे यांनीं फार मोठ्या प्रमाणावर केलें. साने, खरे, पारसनीस व राजवाडे यांस याच कारणासाठीं आम्हीं महाराष्ट्र-इतिहाससंशोधनाचें मुनिचतुष्टय असें संबोधितों. अलीकडे संस्थीकरणाचें युग चालू आहे. त्याचाहि पाया राजवाडे यांनींच घातला. त्यामुळें वरील मुनिचतुष्टयांस त्यांत अग्रस्थान द्यावें लागतें. शके १८३२ मध्यें भारत-इतिहास-संशोधक-मंडळाची स्थापना त्यांनीं घडवून आणली.

(७) राजवाडे यांच्याच प्रेरणेनें सत्कार्योत्तेजक सभा, धुळ्याचें राजवाडे-संशोधनमंदिर व समर्थ-वाग्देवतामंदिर ही जोरदार कार्यपरंपरा व शिष्य-परंपराहि निर्माण झाली. पारसनीसांनीं सरकारचा विश्वास संपादून सातारा वस्तुसंग्रहालय नांवाचें स्वतःचें स्मारक स्वतःच निर्माण केलें.

(८) महानुभावी वाङ्मयाच्या संकेताचें गुप्त भांडार राजवाडे यांनींच प्रथम फोडलें! आतां वऱ्हाड-नागपुराकडे शारदाश्रम, मध्यप्रांत संशोधन मंडळ या संस्थांच्या द्वारां महानुभावी वाङ्मय प्रकाशनाचें कार्य वाढत्या जोमानें चालत आहे.

(९) रावसाहेब सरदेसाई यांनीं संकलनाचें काम एकनिष्ठेनें करून सुसंबद्ध व वाचनीय असे आपल्या रियासतीचे भाग प्रसिद्ध करून रियासतकार म्हणून सर्व महाराष्ट्राकडून मान्यता मिळविली.

(१०) शास्त्रीय इतिहासाला पायाभूत असलेले प्रबंध व चर्चात्मक ग्रंथ सांप्रतच्या संशोधनयुगांत अधिक निर्माण होत असून रा. दत्तोपंत आपटे यांनीं या बाबतींत भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या द्वारें उज्ज्वल कामगिरी केली आहे.

(११) अखिल भारतीय आधुनिक इतिहास परिषद यशस्वी रीतीनें पार पाडून भारत-इतिहास-संशोधक-मंडळानें आपलें भारतोपपदधारित्व सार्थ करून मागील सर्व पायऱ्यांच्या पुढील पायरी गांठली आहे.

(१२) यापुढील युगांत महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाचें जातिवंत कार्य आपली प्रेरकशक्ति निदर्शनास आणून भारताचा जगन्मान्य व चिरस्थायी असा बृहद् इतिहास निर्माण करण्याची सिद्धता करील, असा कयास आहे.

पुरवणी–(१) स्थलवर्णनांत रा. सी. रा. गायकवाड यांच्या पुणें वर्णनाचे दोन भाग, विजापूर वर्णन, जोशी यांचें जुनें पुणें वर्णन, माडगांवकरांचें जुनें मुंबईवर्णन; भाषांतरित ग्रंथांत लाईलच्या ब्रिटिश डोमिनियन् इन् इंडियाचें करकरे यांनीं केलेलें मराठी भाषांतर; जातिविषयक ग्रंथांत कोल्हापूर दरबारासाठीं प्रो. डोंगरे यांनीं छापलेला सिद्धान्तविजय नांवाचा ग्रंथ व छत्रपतींची वंशावळी; तसेंच बडोद्याचे रा. घाणेकर यांचें 'प्राचीन द्रविड' किंवा आम्हीं लिहिलेलें मराठे व इंग्रज याबरील विस्तृत परीक्षण; रा. काथवटे कृत पारशांचा इतिहास, व रा. कुलकर्णी संपादित चिटणीस घराण्याचें कागदपत्र; अशा कित्येक ग्रंथांचा उल्लेख तरी करणें अवश्य वाटतें. हे सर्व ग्रंथ त्या त्या शाखेंत उपयुक्त वर्गांत राहतील.

(२) कै. सदाशिवराव दिवेकर हे एक जुने व अत्यंत परिश्रमी संशोधक होऊन गेले. भर मुंबईंत मुळजी जेठा कापडगंजांत स्वावलंबनानें पेढी चालवून हिंदुस्थानभर हिंडतांना फुरसतीच्या वेळांत त्यांनीं पुष्कळ दुर्मिळ साहित्य मिळविलें. सत्यामळनाथांचा अपूर्व गाथा त्यांनीं एलिचपुरास मिळविला होता. पर्णालपर्वतग्रहणाख्यानहि

त्यांनींच छापलें. तंजावराहून तामीळ 'शिवभारत' आणवून त्याचें महत्त्व त्यांनींच भा. इ. सं. मंडळाचे द्वारा संशोधकांस विज्ञात केलें व मग मूळ संस्कृत शिवभारताची सुपरिष्कृत आवृत्ति काढली! शिवचरित्रप्रदीप हा ग्रंथहि त्यांनींच प्रसिद्ध करविला. अली-बहाद्दराची पत्रेंहि त्यांनींच मिळविली होती.

भा. इ. सं. मंडळाला लाभलेल्या तरुण संशोधकांत कै. पां. न. पटवर्धन यांनीं थोड्या वेळांत आपल्या अंगची चमक दाखवून चांगलें नांव कमावलें. चाणाक्ष बुद्धि, परिश्रम व धडाडी या गुणांवरून 'पांडोबा' मंडळांत फार प्रिय होते. शाळामास्तर मंडळींत मरहूम मिया शिकंदरलाल आतार यांचें नांव विशेष लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

(३) श्री. अज्ञातवासी कवि–दि. गं. केळकर, पुणें–यांनीं ऐतिहासिक चित्रें व नाणीं जमविण्याचा प्रशंसनीय उद्योग आरंभिला असून, त्यांचा चित्रसंग्रह आज लहान पण पाहण्यासारखा आहे.

सूची

बडोदें राज्यदप्तरांतील ऐतिहासिक वेंचे

पुस्तक १ लें

१७२४—१७६८

रॉयल १५० पृष्ठें; किं. ट. हां. सुद्धां १ रु. ३ आ. (व्ही. पी. बंद)

मिळण्याचें ठिकाण—**चिटणीस, राज्यदप्तर कचेरी, कोठी, बडोदें.**

या पुस्तकासंबंधानें

१ रियासतकार रावसाहेब गो. स. सरदेसाई म्हणतातः—

"प्रगतिपर कारभारासंबंधानें बडोदें संस्थानाचा जो लौकिक बाहेर प्रचलित आहे, तो या लहानशा पुस्तकांतल्या संपादनांतहि भरपूर दिसून येतो.... गायकवाड घराण्यांतील पहिल्या दोन प्रसिद्ध व्यक्तींचें चरित्र समजण्यास हे कागद अत्यंत आवश्यक आहेत.... या नवीन ऐतिहासिक साधनग्रंथाचा सर्व अभ्यासक साभारस्वीकार करितील यांत संशय नाहीं. (ज्ञानप्रकाश, ता. ३०-१-३५)

२ केसरीकार म्हणतात—

बडोद्याचे विद्याप्रेमी अधिपति श्रीमंत सयाजीराव यांनीं याहि गोष्टींत नेहमींप्रमाणें आघाडी राखली असें प्रस्तुत पुस्तकावरून म्हणावें लागतें....एकंदर मराठी इतिहासालाहि त्यांनीं (या ऐतिहासिक साधनग्रंथानें) मोठी मदत होईल हें निःसंशय....हा साधनग्रंथ फार उपयुक्त झाला आहे. (केसरी, ता. ३०-७-३५)

आमचें पुढील प्रकाशन

१ अबिसिनीया.

२ मुसलोनी.

३ हिंदुस्थानची नवी राज्यघटना.

वरील तिन्हीं पुस्तकें दिवाळीनंतर तयार होतील.

पत्ता:—नेने बंधू, रावपुरा, बडोदें

अवश्य संग्रहीं ठेवा !

प्रो. द. वा. पोतदार

यांनीं

लिहिलेलें

' मराठे-इंग्रज '

वरील

विस्तृत व वाचनीय

समीक्षण

किंमत चार आणे

मागणी:—भा. इ. सं. मंडळ, पुणें.